१६० ओं ह्रीं लाभांतरायकर्मरहिताय सि. नमः
१६१ ओं ह्रीं भोगांतरायकर्मरहिताय सि. नमः
१६२ ओं ह्रीं उपभोगांतरायकर्मरहिताय सि. नमः
१६३ ओं ह्रीं वीर्यांतरायकर्मरहिताय सि. नमः

॥ इतिकर्मदहनमंत्र संपूर्णम् ॥

अथ सिद्ध जयमाला

त्रैलोक्येश्वरवंदनीयचरणाः प्रापुः श्रियं शाश्वतीं । यानाराध्यनिरुद्धचंडमनसः संतोऽपि तीर्थंकराः ॥ सत्सम्यक्त्वविबोधवीर्यविशदाऽव्याबाधताद्यैर्गुणैः । युक्तांस्तानिह तोष्टवीमि सततं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सिद्धान् विशुद्धोदयान् ॥ १ ॥ विराग सनातन शांतनिरंस । शिरामय निर्भय निर्मल हंस । सुधाम विबोध निधानविमोह । प्रसीद विशुद्ध सुसिद्धसमूह ॥ २ ॥ विदूरितसंस्तुतभाव निरंग । समामृतपूरित देवविसंग ॥ अबंध कषायविहीन विमोह । प्रसीद् विशुद्ध सुसिद्ध समूह ॥ ३ ॥ निवारितदुःकृतकर्मविपाश । सदामलकेवलकेलिनिवास ॥ भवोदधिपारग शांत विमोह । प्रसीद् विशुद्ध सुसिद्ध समूह ॥ ४ ॥ अनंतसुखामृत सागरधीर । कलंकरजोमलभूरिसमीर । विखंडितकाम विराम विमोह । प्रसीद्ध विशुद्ध सुसिद्ध समूह ॥ ५ ॥ विकारविवर्जित तर्जितशोक । विबोधसुनेत्रविलोकितलोक ॥ विहार विराव विरंग विमोह । प्रसीद् विशुद्ध सुसिद्ध समूह ॥ ६ ॥ रजोमलखेदविमुक्त विगात्र । निरंतरनित्यसुखामृतपात्र । सुदर्शनाराजित नाथ विमोह । प्रसीद विशुद्ध सुसिद्ध समूह ॥ ७ ॥ नरामरवंदितनिर्मलभाव । अनंत मुनीश्वर पू-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्य विहाव । सदोदय विश्वमहेश विमोह । प्रसीद विशुद्ध सुसिद्ध समूह ॥ ८ ॥ विदंभ वितृष्ण विदोष विनिंद्र । परापर शंकर सार वितंद्र । विकोप विरूप विशंक विमोह । प्रसीद विशुद्ध सुसिद्धसमूह ॥ ९ ॥ जरामरणोज्झित वीतविहार । विचिंतित निर्मल निरहंकार ॥ अचिंत्य चरित्र विदर्प्प विमोह । प्रसीद विशुद्ध सुसिद्ध समूह ॥ १० ॥ विवर्ण विगंध विमान विलोभ । विमाय विकाय विशब्द विशोभ ॥ अनाकुल केवल सर्व विमोह । प्रसीद विशुद्ध सुसिद्ध समूह ॥ ११ ॥ घत्ता—असमयसमयसारं चारुचैतन्यचिन्हं । परपरणतिमुक्तं पद्मनंदींद्रवद्यम् निखिलगुणनिकेतं सिद्धचक्रं विशुद्धं । स्मरति नमति यो वा स्तौति सोऽभ्येति मुक्तिम्

सूत्र—कायवाङ्मनःकर्मयोगः ।

अर्थः—देह, वचन, आणि मन ह्या तिन्हींच्या चंचळतेनें कर्में येतात जसें—कुंभार घागर करतो परन्तु माती, चाक आणि घागर ह्या पासून कुंभार

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पृथक् आहे. कुंभार आहे तो कुंभार आहे व माती चाक घागर आहे ते माती चाक घागर आहे. तसेंच कर्ता आणि कर्मांत परस्पर भेद आहे. कर्ता तो कर्ता आहे आणि कर्म आहे. तें कर्म आहे. कर्ता आहे ते कर्म होत नाहीं व कर्म आहे तो कर्ता होत नाहीं, कर्ता, कर्म, आणि क्रियास जो पाहतो व जाणतो तें ज्ञान आहे. तें ज्ञान सर्वांचा साक्षी-दार आहे. ज्ञान सर्वांस जाणते परन्तु त्या स्वरूपाचा होऊन जाणत नाहीं. अशी ज्ञानवस्तु आहे. तोंच मी आहे. मी मूळापासून आहे. मी कर्म नाहीं, कर्माचा कर्ता मी नाहीं. कर्माचा बंध व अबंध आहे ते कर्मच आहे. कर्मानें बांधला गेला आहे आणि कर्मानें न बांधला गेला आहे ह्या दोन्हींच्या आदि अंत्य मध्यांत आहे तो मी नव्हे. कर्मानें बद्ध आहे. तो मी नव्हे. व कर्मानें अबद्ध आहे तोही मी नव्हे. ह्या दोन्हीं शिवाय बाकी जो आहे तो मी आहे लोक व अलोक आहे तो ही मी नव्हे. लोकांत व अलोकांत जें कांहीं जीव, अजीव, ज्ञान अज्ञान,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आंकार, निराकारादिक आहेत ते ही मी नव्हे. लोक व अलोकांच्या आदि अंत मध्यांत जें कांहीं आहे ते ही मी नव्हे. विधी व निषेध ही मी नव्हे. बाकी नांव मात्र फक्त राहते. स्वानुभव सम्यक्ज्ञानद्वारा आपल्या स्वस्वरूपास तन मन धन वचनादिकांपासू-न सर्व प्रकार मूळापासून भिन्नपणा आहे असें मनन करावें. सर्वांपासून भिन्न होण्यास साधन आहे. बाकी कांहीं आहे तेंच सोहं-॥. जीव व अजीवाच्या आदि अंत मध्यांत जे आहे तें हीं मी नव्हे. बाकी जे आहे तेंच सोहं. तूं, मी, तो, हा असे चार भेद आहेत तेही मी नाहीं. आणि ह्या चाराचा आदि कोणी आहे तो ही मी नाहीं. आणि चारीचा शेवटी कोणी आह. तोही मी नाहीं बाकी आहे तो सोही सोहं. श्वासोच्छ्वास आहे तो ही मी नाहीं आणि श्वासोच्छ्वासाच्या आदि अन्त मध्ये कोणी आहे तो मी नाहीं बाकी कोणी आहे सोही सोहं. शून्याशून्य कोणी आहे तोही मी नाहीं. आणि शून्याशून्याचे आदी अंत मंध्य कोणी आहे सोही मी नाहीं ज्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चे विधी निषेध होऊं शकत नाहींत ह्या दोहींच्या आदि अंत मध्य कोणी आहे तोही मी नाहीं. आणि विधी निषेध हे मी नाहीं बाकी राहिलेले आहे ते स्वानुभव सम्यग्ज्ञान द्वारा आपल्या स्वरूपांस तन मन धन वचनानें सर्व प्रकारे मूर्छापासून भिन्नपनाला विचार करतो तेच सर्वा पासून अलग झाले ते खाली राहण्यास योग्य आहे—बाकी काय आहे ते ही सोहं.

भोगे रोगभयं सुखे दुखभयं वित्तस्य राज्ञो भयं ।
विद्यावादभंय तपेंद्रियभयं रूपातूभयं योषित :॥
इष्टे शोकभयं रणे रिपुभयं कायंकृतांतेभयं ।
एवं सर्वनिरर्थकं क्षितितले अर्हत्पदं निर्भयं ॥ १ ॥

मन, बुद्धि, चित्त, अहंकार, अंतःकरण, रजोगुण तमोगुण, सत्वगुण आहे तोही मी नव्हे ह्यांच्या आदि अंत्य मध्यांत कांहीं आहे तेही मी नव्हे. बाकी जे आहे तेच सोहं. चार वेद अठरा पुराण आहेत तेही मी नाहीं; आणि ह्यांत ज्या कथा लिहिल्या आहेत तेही मी नव्हे. चार वेद व अठरा पुराणाचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रचना करणारा जो आहे तोही मी नव्हे आणि ह्यांच्या आदि अंत मध्य जें आहे तेही मी नव्हे. बाकी जें कांहीं आहे ते सोऽहं.

हें वेद व पुराण –शास्त्र आहे तें ज्ञान नव्हे किंतु अज्ञान आहे. शब्द संग्रह आहे; शब्द पुद्गलाची पर्याय आहे, करितां शब्द, शब्द––आकार, जड, अचेतन, हें अज्ञान आहे. यांस राहाण्यास जागा देतो तो आकाश आहे. आकाश अमूर्ति निराकार आहे तोही अज्ञान आहे जड, अजीव, अचेतन आहे. ज्ञानगुण आकाशांत नाहीं.

जीवनांव, अजीवनांव, ब्रह्मनांव, अब्रह्मनांव, आत्मानांव, अनात्मानांव, सिद्धनांव, अज्ञाननांव इत्यादि सर्व नांवें व अनावें तेंही मी नव्हे, आणि ह्यांच्या आदि अंत्य मध्यांत जें आहे तेही मी नव्हे. बाकी जें आहे ते सोऽहं मी आहे.

रूप अरूप आहे तेही मी नव्हे आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जें आहे तेंही मी नव्हे. बाकी जे आहे तेंच सोहं. पुद्गलद्रव्य रूपी आहे. धर्मद्रव्य,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अधर्मद्रव्य, आकाशद्रव्य आणि कालद्रव्य हीं चार द्रव्यें अरूपी आहेत

प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग, द्रव्यानुयोग, अकरा अंग, चौदा पूर्व तेंही मी नव्हे, आणि ह्यांत ज्या कथा लिहिल्या आहेत तेंहि मी नव्हे, आणि ह्यांची रचना करणारा जो आहे तो ही मी नव्हे. आणि ह्यांच्या आदि अंत मध्ये जे कांहीं आहे तेंही मी नव्हे ह्या शिवाय बाकी जे आहे तेच सोऽहं

ज्यास जाणणाराही जाणीत नाहीं, अजाणणारा जाणीत नाहीं ज्यास ज्ञानी व अज्ञानी ही जाणीत नहीं आणि तो मात्र ज्ञानी अज्ञानी आदिक सर्वांस जाणतो असा जो आहे तोच सोऽहं.

सांगण्यात येण्यासारखे आहे व सांगण्यात येण्या सारखें नाहीं. असें जे आहे तेंही मी नव्हे, यांच्या आदि अंत मध्यांत ही मी नाहीं बाकी जो आहे तो च सोऽहं

पंचप्रकारची निद्रा, स्वप्न, जागृत, सुशुप्ती, तु–

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

र्यां यांतही मी नाहीं. आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत मी नाहीं.

काल, अकाल, धर्म, अधर्म, आकाश हेंही मी नव्हें आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जें कांहीं तेंही मी नव्हें बाकी जे कांहीं आहे तेंच सोऽहं

जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष, पुण्य आणि पाप आहे तेंही मी नव्हे आणि ह्यांच्या आदि अंत मध्य जें आहे तेंही मी नव्हे बाकी जें कांहीं आहे तेंच सोऽहं

लोक, अलोक, जोग, जुगत, जगत आहे तेंही मी नव्हे, आणि जगतामध्यें जितकी रचना—चंद्र, सूर्य, तारा, मनुष्य, देव, तिर्यंच, नारकी, नाम, धाम, गाम, वाम, जाम, काम इत्यादि रचना जन्म मरण पर्यंत आहे तेंही मी नव्हे. आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जें आहे तेंही मी नव्हे. बाकी जे आहे तेही सोहं, सोहं, सोहं.

चिद्रूपोऽहं अनंतज्ञानोऽहं। अनंतदर्शनोऽहं। अनंतवीर्योऽहं। अनंतसौख्योऽहं। स्वयसिद्धोऽहं। बुद्धोऽहं।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनंतज्ञानगुणसमृद्धोऽहं । देहप्रमाणोऽहं । सदाकालनित्योऽहं । अप्रसंख्योऽहं । प्रदोशोऽहं । अमूर्तोऽहं परमांनदोऽहं । सहजानंदोऽहं । सहजासिद्धोऽहं । चिदानंदोऽहं । निराधारोऽहं । निराहारोऽहं । निराबाधोऽहं । ज्ञानपिंडोऽहं । ज्ञानमूर्तोऽहं । शांतोऽहं । निरजंनोऽहं उदासीनोऽहं । निर्विकल्पोऽहं । टंकोत्कीर्णोऽहं । लोकालोकप्रकाशकोऽहं । रागद्वेषमोहरहितोस्म्यहं कषायरहितोस्म्यहं । निरहंकारोऽहं । क्रोधमानमायालोभरहितोस्म्यऽहं । चैतन्योऽहं । सहजनिर्मलोऽहं । अद्भुतानंदोऽहं । एकोऽहं । त्रिलोकेशोऽहं । भिर्देहोऽहं निरिंद्रियोऽहं । निर्मदोऽहंसप्तभयमुक्तोऽहं । पंचप्रकारसंसाराष्टककर्मरहितोस्म्यहं । मनबुद्धिचित्त अहंकार अंतकरणरहितोस्म्यहं । स्वसंवेद्योहं । द्रव्यकर्मभावकर्मनोकर्मरहितोस्म्यहं । औदारिकवैक्रियकाहारकतैजसकार्माणपंचशरीरहितोस्म्यहं ॥

सोहं आहे तेंही मी नाही. आणि सोहंच्या भिन्न जे आहे तेंही मी नव्हे सोहं आणि असोहंच्या आदि अंत मध्ये जें कांहीं आहे तेंहीं मी नाहीं ह्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शिवाय जे आहे तेच सोऽहं

जीव व अजीव हेही मी नव्हे आणि ह्याच्या आदि अंत मध्य जेंकांही आहे तेंही मी नव्हे बाकी जें आहे तेंच सोऽहं

दोहा

समता रमता उरधता, ज्ञायकता सुखभास ।
वेद्कता चैतन्यता, यह सब जीव विलास ॥१॥
तनता मनता वचनता, जडता जडसे मेल ।
लघुता गुरुता गमनता यह अजीवके खेल ॥ २ ॥

हे मनाचें व अजीवाचे खेळ आहेत. हे आत्म्याचे खेळ नव्हेत.

येथें जीव अजीव सोऽहं असोऽहं तन मन धन वचनादिकापासून आपल्या स्वस्वरूपास सर्वप्रकारें भिन्न मानून जो सदाकाल मनन करतो, तो मुमुक्षु धन्य आहे.

सोहं ओं ततसत्परंब्रह्मपरमात्मनेनमः ॥

इति पूर्णम् ॥ १ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अथ स्वस्वरूपविचारमनन प्रारंभ ॥

दोहा

अजविसैं ज्यो अगल है, जीव जीवतो सार ।
सोही सोहं हूं सदा, निश्चय करि निरधार ॥१॥

अर्थः—जसें अग्नीमध्यें उष्ण आहे तसे ज्याव-स्तुमध्यें ज्ञानगुण तन्मय आहे ह्या वस्तूचा नांव जीव असे आहेः—

प्रश्नोत्तरें

प्रश्नः—तुम्ही कोण आहा.

उत्तरः—मी जीव आहे.

प्रश्नः—तूं एकच जीव आहेस का, आणखी दुसरे कांहीं जीव आहेत.

उत्तरः—जीव द्रव्याच्या अपेक्षेनें जीव एकच आहे परंतु व्यवहार अपेक्षेनें त्यांत भेद आहे

प्रश्नः—किती भेद आहेत.

उत्तरः—बाह्य आत्मा, अंतरात्मा आणि परमात्मा असें तीन भेद आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रश्नः—बाह्य आत्मा कोण आहे.

उत्तरः—जो जीव, शरीरादिक बाह्यवस्तूस आत्मा मानतो, अग्नि व उष्णतेप्रमाणें बाह्यवस्तूस अभिन्न जाणतो (एकस्वरूप जाणतो) तो जीव बाह्य-आत्मा आहे

प्रश्नः—अंतर आत्मा कोण आहे.

उत्तरः—जो जीव, शरीरादिक बाह्य अजीव वस्तूस अनात्मा समजतो. जीव व अजीव यास अग्नि व उष्णताप्रमाणें एकरूप जाणत नाहीं. जीवाचा व अजीवाचा भेद समजतो. तो जीव अंतरात्मा आहे.

प्रश्नः—परमात्मा कोण आहे.

उत्तरः—अनुभवज्ञानगम्य आहे, वचनानें सांगता येत नाहीं. परन्तु कांहीं सांगतो, ज्यास अनुभव घेणें असेल त्यानें श्रवण करून मनांतल्या मनांत अनु-भवज्ञान ध्यावें.

जीव, अजीव, ज्ञान, अज्ञान, चेतन, अचेतन, आकार, निराकार, मूर्ति, अमूर्ति, नाम, अनाम, रूप, अरूप, वर्ण, अवर्ण, लोक, अलोक, जोग, [illegible]

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जुगत, जगत, तन, मन, धन, वचन, बुद्धि, चित्त, अहंकार, अंतःकरण, विद्या, अविद्या, विधि, निषेध, शून्य, अशून्य, द्वैत अद्वैत, बंध, मोक्ष, तूं, मी, हें, तें इत्यादिकापासून जो अलग आहे तोच परमात्मा आहे.

प्रश्नः—परमात्मा जर नांव अनांवाच्या भिन्न आहे तर त्यास परमात्मा हे नांव ही नसले पाहिजे

उत्तरः—प्रथमच मी सांगितले आहे कीं, परमात्मा अनुभव ज्ञानगम्य आहे.

प्रश्नः—ठीक आहे. परन्तु आपण कोण आहा.

उत्तर—मी, अजीव जड मुळापासून नाहीं, आतां मी, जितके अजीव आहेत व अजीवाचे खेळ आहेत त्यांचें वर्णन करितो. तूं मला अजीव समजूं नकोस. अजीवाच्या भिन्न जीव तत्व जाण. जसें-सूर्य व अंधार पृथक् पृथक् आहेत. तसें अजीवापासून जीव भिन्न समज.

प्रश्न—मलाही असाच निश्चय आहे. आपण अजीव तर नाहीं. आपण अजीवाचें वर्णन करा. तर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मी आपणास अजीवापासून भिन्न समजीन.

उत्तर— श्रवणकर, नाटकसमयसारोक्त-दोहा.

तनता मनता वचनता, जडता जडसे मेल।
लघुता गुरुता गमनता, येह अजीवका खेल॥ १॥

हे खेल अजीवाचे आहेत माझे नव्हेत. जसें सूर्य व अंधार पृथक् पृथक् आहे. तसें माझे व अजीवाचे खेल पृथक पृथक् आहेत

(पद्मनंदि आचार्य कृत पंचविंशतिका)

किं लोकेन किमाश्रयेण किमथद्रव्येण कायेन किं।
किं वाग्मी किं मुतेंद्रिय: किमशुभै: किंतैर्विकल्पैरपि

पाताललोकापासून कल्प——महाकल्पापर्यंत जे आहे ते सर्व पुद्गलाची पर्यायें [अजी-—वाचीच] आहेत. कारण—पुद्गल आहे तें अजीवच आहे तर त्याची पर्यायेही अजीवच असली पाहिजे. तर मी, अजीव जड मूळापासूनच नाहीं.

नाटकसमयसारोक्तं.

सद्गुरु कहे भव्य जीवसों तोडो तुरत मोहकी जेल।
समकित रूप गहो अपनो तुम करो सुद्ध अनुभवका

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खेल ॥ पुद्गल पिंड भावरागादिक इन सैं नहीं तुमारो मेल । येह जड प्रगट गुपत तुम चेतन जैसे भिन्न तोय अरु तेल ॥ १ ॥

हें पुद्गल पिंड--रागद्वेष जें आहेत तें ही अचेतन जड अजीव आहेत.आणि मुळापासून मी अजीव-जड नाहीं. पुद्गलपिंडाची व माझी एकी अग्नीउष्णते-प्रमाणें केव्हांही झालेली नाहीं. ह्यांच्यात व माझ्यांत सूर्य व अंधार इतका अंतर आहे.

प्रश्नः--तुम्हीं कोण आहा.

उत्तर–पूर्वीपासूनच सांगत आलो आहे कीं, मी अजीव नाहीं.

प्रश्न--तुम्हीं अजीव नाहीं तर कोण आहा.

उत्तर–मी स्वयंसिद्ध शुद्ध जीव आहे.

प्रश्न-- जिवाचें लक्षण काय आहे तें सांगा.

उत्तर– कुंदकुंदाचार्यकृत गाथा--

अरसमरूवमगंधं अव्वत्तं चेदणागुणमसद्दं ।
जाण आलिंग्गहणं जीवमणिदिट्ठसंठाणं ॥

अर्थ–जिवाचें लक्षण–रसरहित, रूपरहित, गंधरहि-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त आहे आणि चेतन गुण संयुक्त आहे. जसें सूर्य गुणी व प्रकाश गुण हे जसें अभेद आहेत तसें जीव चेतन ज्ञान दर्शनमयी आहे अर्थात् गुण गुणी यांत अभेद असतात त्या न्यायानें जीव व चेतन अभेद आहेत. तसेंच जीव स्त्री, पुरुष व नपुंसक लिंगरहित आहे. श्री उमास्वामीकृततत्वार्थसूत्रांत सांगितले आहे.'रूपिण: पुद्गला:'पुद्गलद्रव्यरूपी आहे. जीवद्रव्य अरूपी आहे. हे जे स्त्री, पुरुष, नपुंसक लिंगरूप आकार दिसत आहे ते सर्व पुद्गलपिंड अजीव आहे. जीव तर रूप, रस, गंध, वर्ण, आणि स्त्री, पुरुष, नपुंसक लिंगरहित आहे.

उक्तंच-श्रीकुंदकुंदाचार्यरचित आत्मख्यातिग्रंथ गाथा

जीवस्स णत्थि वण्णो णवि गंधो णवि रसो णवि
य फासो ।
णवि रूवं ण सरीरं ण वि संठाणं ण संहणणं ॥१॥
जीवस्स णत्थि रागो णवि दोसो णेव विज्जदे मोहो।
णो पच्चया ण कम्मं णोकम्मं चावि से णत्थि ॥२
जीवस्स णत्थि वग्गो ण वग्गणा णेव फड्ढया केई।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

णो अज्झप्पट्ठाणा णेव य अणुभायठाणाणि ॥३॥
जीवस्स णत्थि केई जोयट्ठाणा ण बंधठाणा वा ।
णेव य उदयट्ठाणा ण मग्गणट्ठाणया केई ॥४॥
णो ठिदिबंधट्ठाणा जीवस्स ण संकिलेसठाणा वा
णेव विसोहिट्ठाणा णो संजमलद्धिठाणा वा ॥५॥
णेव य जीवट्ठाणा ण गुणट्ठाणा य अत्थि जीवस्स
जेण दु एदे सव्वे पुग्गलदव्वस्स परिणामा ॥६॥

अर्थ—जीवाला रंग-रूप नाहीं, जीवला, सुगंध—दुर्गंध नाहीं, जीव रूपी-अरूपी नाहीं, जीवाला स्पर्श—हलका, जड, उष्ण, थंड, चिक्कण, कोरडा, नरम, कठोर, नाहीं, संस्थान नाहीं संहनन नाहीं, जीवाला कर्म, नोकर्म, द्रव्य-भावकर्म नाहीं, आणि कर्मवर्णणाही नाहीं, जीवाला कांहीं स्पर्धक नाहींत, जीवाला अध्यात्मस्थान नाहीं. जीवाला अनुभागस्थान, योगस्थान, बंधस्थान, उदयस्थान, मार्गणास्थान, स्थितिबंधस्थान, जीवसमासस्थान, वगैरे नहीं, जीवाला स्पर्श, रस, गंध, नाहीं, जीवाला गुणस्थान ही नाहीं, हें सर्व पुद्गलद्रव्याचे पर्यायभेद--परिणाम

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहेत. हे सर्व अजीव आहेत. या अजीवास आणि जीवास अग्नीउष्णते प्रमाणें जो एकरूप मानतो व जानतो तो मिथ्यादृष्टि बहिरात्मा आहे. व या जीवाचा अजीवापासून सूर्य व अंधार इतका अंतर मानतो व जाणतो तो अंतरात्मा सम्यक्दृष्टी आहे.

उक्तंच उमास्वामीकृत तत्वार्थ सूत्र

सूत्र-जीवाजीवास्त्रवबंधसंवरनिर्जरामोक्षास्तत्वं ।

अर्थः— जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा आणि मोक्ष हें सात तत्व आहेत. ह्यामध्यें प्रथम जीवतत्व आहे तोच जीव आहे बाकीचें सहा अजीव आहेत. ह्या सहा अजीवाला व एक जीवाला जो अग्नीउष्णतावत् एक मानतो तो मिथ्यादृष्टि बहिरात्मा आहे. आणि ह्या अजीवास व जीवास जो सूर्य अंधारा इतका अंतर मानतो व जानतो तो सम्यक्दृष्टि आहे—अंतरात्मा आहे.

जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा, मो-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

क्ष, पाप आणि पुण्य हें नव पदार्थ आहेत. ह्यांत प्रथम जीव आहे तोच जीव आहे. आणि बाकीचें आठ आहेत तें अजीव आहेत

जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, आणि काल हें षट्द्रव्य आहेत, ह्यांत प्रथम जीव आहे तोच जीव आहे. बाकीचे पांच अजीव आहेत. "अजीवकायाधर्माधर्माकाशपुद्गलाः" हेही अजीवकाय आहेत ते अजीवच आहेत.

'रूपिणःपुद्गलाः' हें जितके रूपी पदार्थ दिसत आहेत, तें सर्व पुद्गल आहेत व पुद्गल आहे ते अजीव आहे. 'स्पर्शरसगंधवर्णवंतः पुद्गलाः' हें ही अजीव आहेत.

शब्द, बंध, सूक्ष्म, स्थूल, संस्थान, भेद तम, छाया, आताप, आणि उद्योत हे दहा पुद्गलाचे पर्याय भेद आहेत, हें ही अजीव आहेत. मन, बुद्धि, चित्त, आहार, अंतःकरण, क्रोध, मान, माया, लोभ हें अजीव आहेत. औदारिक. वैक्रियक, आहारक, तैजस कार्माण हें पांच शरीरें आहेत तेही अजीव

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहेत. निद्रा, निद्रानिद्रा, प्रचला, प्रचलाप्रचला, स्त्यानगृद्धि, ह्या पांच आहेंत ह्या ही अजीव आहेत. ज्ञानावरणी, दर्शनावरणी, वेदनीय, मोहनीय, आयु, नाम, गोत्र, आणि अंतराय हें आठ कर्म आहेत. तेंही अजीव आहेत. आणि ह्या आठ कर्मांच्या १४८ प्रकृती आहेत त्यांही अजीव आहेत.

उक्तंच—पंद्मनान्दिंपचविंशतिका ग्रंथांत श्लोक--

नामापीह परं तस्मात् निश्चियात्तयन्नामकं ।
जन्ममृत्य्वादि वा शेषं वपुधर्मं विदु बुंधाः ॥१॥

अर्थ—जन्म, मरणनामादिक जे आहेत ते शरीराचा धर्म आहे. शरीर अजीव आहे. तो मी अजीव नाहीं. जन्म मरण नाम वगैरे माझें नव्हें अजीवाचें आहे. माझें नांव जीव ही नाहीं आणि माझें नांव अजीव ही नाहीं--तन मन धन अजीव आहे-

ज्ञात, लाभ, कुल, रूप, तप, बल, विद्या अधिकार हें आठ मद आहेत तेही अजीव आहेत.

अठरा दोषरहित देव आहे. त्यांत देव तो एक जीव आहे तोंच देव आहे.बाकी अठरा आहेत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तें अजीव आहेत. साडे सदतीस हजार प्रमादाचें भेद आहेत ते ही अजीव आहेत. अठरा हजार शीलाचे भेद आहेत तेही अजीव आहेत. एकसे आठ हिंसाचें भेद आहेत तेही अजीव आहेत. कां म्हणाल तर? हें प्रमाद, कुशील, आणि हिंसादिकाचे भेद आहेत ते भगवान् परमात्मा सिद्धास नाहींत-भगवान् परमात्मा सिद्ध आहे तो जीव आहे. जीवापासून पृथक आहे तो अजीव आहे आणि अजीवापासून पृथक् आहे तो जीव आहे.

प्रश्न-तुम्हीं कोण आहा.

उत्तरः- मी नसेल तर माझ्यावाचून माझी गोष्ट कोण सांगेल. मी अजीव नाहीं आणि अजीवास व जीवास अग्नि उष्णता वत् जो एक मानतो व जाणतो तो ही मी नव्हे.

प्रश्नः- तर तुम्हीं कोण आहा.

उत्तरः—जो अजीवास व आपणास (जीवास) भिन्न भिन्न सूर्य अंधाराप्रमाणें मानतो जाणतो तोंच मी (जीव) आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रश्नः—आपण केव्हां पासून असें आहा.

उत्तरः—मूळापासूनच मी असा आहे.

प्रश्नः—निश्चयानें सांगा तुम्हीं कोण आहात.

उत्तरः—सांगीन परन्तु तुझ्या अंतःकरणांत निश्चयानें पटणार नाहीं.

प्रश्नः—सांगा तर खरे, माझ्या अंतःकरणांत न पटेल तर माझे मजजवळ राहील. सांगा तर खरे.

उत्तरः—मी मनुष्य नाहीं. मी देव नाहीं. मी पशू नाहीं. मी नारकी नाहीं. मी स्त्री नाहीं. मी पुरुष नाहीं-मी नपुंसक नाहीं-मी एकेन्द्रिय नाहीं—मी दोन इंद्री नाहीं-मी तीन इंद्रीं नाहीं-मी चार इंद्री नाहीं मी पांच इंद्री नाहीं—मी ब्राह्मण नाहीं—मी क्षत्रिय नाहीं—मी वैश्य नाहीं—मी नीच नाहीं—मी उच्च नाहीं—मी लहान नाहीं—मी मोठा नाहीं—मी खरा नाहीं—मी लबाड नाहीं—मी पिवळा नाहीं—मी काळा नाहीं-मी गोरा नाहीं—मी हिरवा नाहीं—मी पांढरा नाहीं-रूपरंगाचा मी नाहीं-रूपी अरूपी मी नाहीं मी मूर्ति नाहीं-मी अमूर्ति नाहीं-मला आकार नाहीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मला निराकार नाहीं-मी चेतन नाहीं-मी अचेतन नाहीं-मी जीव नाहीं-मी अजीव नाहीं-मी ज्ञान नाहीं मी अज्ञान नाहीं-मी आत्मा नाहीं-मी अनात्मा नाहीं मी शून्य नाहीं. मी अशून्य नाहीं. मी गुप्त नाहीं. मी प्रगट नाहीं. मी दूर नाहीं. मी निकट नाहीं. मी जीव नाहीं. मी अजीव नाहीं. मी आत्मा नाहीं मी बाह्य आत्मा नाहीं. मी अंतर आत्मा नाहीं. मी परमात्मा नाहीं. मी सकल परमात्मा नाहीं. मी निकल परमात्मा नाहीं. आणि यांच्या पृथक् आहे. तोही मी नाहीं. लोक व अलोक आहे तोही मी नाहीं- तन, धन, मन, वचन आहे तोही मी नाहीं- तूं. मी- हे. ते. अशी चार अक्षरें आहेत तो-ही मी नाहीं- ह्याशिवाय जो आहे तो सोहं मी आहे आतां कांहीं उमजून घेणें असेल तर उमजा.

॥ अत्रमौनं ॥ इतिश्री

प्रश्नः—परमात्म्याचें लक्षण काय आहे.

उत्तरः— जो अनंतज्ञान, अनंतदर्शन, अनंतवीर्य, आणि अनंतसुखादिरूप स्वस्वभावास सोडीत नाहीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आणि काम, क्रोधादिरूप परस्वभावास कधीही ग्रहण करीत नाहीं, सदाकाल जागती जोत असतो, कदापि निद्रा अवस्था नाहीं. तीन लोक आणि तीन कालांतील सर्व पदार्थांना केवल ज्ञानानें प्रत्यक्ष जाणतो व पाहतो नित्य अखंड अविनाशी असा जो आहे तोच निश्चयानें परमात्मा आहे.

प्रश्नः— अशा परमात्माचा पत्ता तुम्हास कसा लागला.

उत्तरः—मला काललब्धि प्राप्त झाली तेणें करून सत्य गुरूचा उपदेश मिळाला त्या द्वारे आणि तन मन वचन धन द्वारें स्वात्मानुभव मनन झाले. जसाचें तसाच तोच मी काय त्या परमात्माच्या भिन्न आहे जसा तो परमात्मा आहे. तसाच मी आहे.

प्रश्नः—तो आणि मी असें बोलणेंच विरुद्ध आहे.

उत्तरः— काय, अग्निच्या ठिणगीस अग्नि म्हणू नये.

प्रश्नः— परमात्म्यांस आणि तुमच्यांत काय अंतर आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उत्तरः—परमात्म्यांत आणि माझ्यांत कांहींहि अंतर नाहीं.

प्रश्नः—कांहीं तरी अंतर असेल ?

उत्तरः—जसें सूर्यास आणि सूर्याच्या प्रतिबिंचास अंतर नाहीं. तसेंच परमात्मांत आणि माझ्यांत अंतर नाहीं.

प्रश्नः—आतां तुम्हास काय निश्चय झाला.

उत्तरः—आतां मला असाच निश्चय झाला कीं मी मूळापासून अजीव नाहीं आणि अजीवास व जीवास अग्नी उष्णते प्रमाणें एक मानत नाही व एक जाणत नाहीं. जीवास व अजीवास जो भिन्न भिन्न मानतो व भिन्न भिन्न जाणतो. तो अज्ञानी होय

मी पांढरा, काळा, तांबडा, पिवळा, नीला ह्या रंगाचा नाहीं.मला सुगंध व दुर्गंध नाहिं. माझ्यामध्यें गोड, आंबट, तिखट, कडु, खारट, वगैरे कोणताही रस नाहीं. सप्तस्वर भाषण शब्द उच्चार हा माझा गुण नव्हें. थंड, उष्ण, मृदु कठीण हलका, जड असा कोणता ही स्पर्श मला नाहीं. मला जन्म,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जरा आणि मरण नाहीं. क्रोध, मान माया, लोभ मला नाहीं. मला जात, लाभ, कुल, रूप, तप, बल, विद्या आणि अधिकार हें आठ गर्व-मद नाहींत आणि मला ध्यानाचे स्थान नाभी, हृदय, ललाट, नेत्र वगैरे कांहीं नाहीं. ध्यान म्हणजे चित्ताचे रोकणें हे ही नाहीं.[मला मनच नाहीं तर निरोध कोणाचा करूं] मला द्रव्यभावरूप पुण्य पाप नाहीं. राग द्वेष रूप हर्ष विषाद नाहीं. तसेंच क्षुधा तृषादिक अठरा दोष नाहींत. कुंभक, पूरक, रेचक वायु धारणा नाहीं. मला ध्येय आदि अंत नाहीं. अक्षर रचना रूप स्थं-भन यंत्र मोहादिकारण नाहीं. नाना प्रकारे अक्षर उच्चाररूप मंत्र नाहीं.

मला जलमंडल, अग्निमंडल, पृथ्वीमंडल, पवनमं-डल वगैरे भेद नाहींत. गरुड मुद्रा वगैरे मला मुद्रा नाहीं. वेद म्हणजे केवलीची दिव्यध्वनि आणि शास्त्र म्हणजे गणधरादिक महामुनीचे वा-क्य ह्यानें मी जाणला जात नाहीं असा मी आहे. कारण वेद शास्त्र जे आहे. तें ज्ञान नव्हे; वेद शास्त्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जें आहे तें शब्द अर्थ आहे आणि मी शब्दातीत आहे. मी इंद्रियानें आणि मनानेंही जाणला जात नाहीं. कां कीं, इंद्रियें व मन हें विकल्परूप आहेत इंद्रियानें आणि मनानें मूर्तीक पदार्थ जाणलें जातात आणि मी निर्विकल्प अमूर्तीक आहे. ह्या करितां मी इंद्रियांच्या व मनाच्या अगम्य आहे-गम्य नाहीं मी स्वतःगम्य आहे. असा आहे. मला परवस्तूचा अश्रय नाहीं. मला कोणी साह्य नाहीं. मी स्वतः सर्व कामांत परिपूर्ण आहे. केवलज्ञान, केवलदर्शन, केवलसुख, आणि केवलवीर्याचा (अनंत चतुष्टयाचा) धारक आहे. औदारिक, वैक्रियक, आहारक, तैजस आणि कार्माण ही पांच प्रकारची शरीरें मला नाहींत. ह्या करितां मी निराकार आहे आणि मी जीवास व अजीवास एक मानीत नाहीं व एक जाणत नाहीं

मी पांच इंद्रियांनें पांच इंद्रियांचें विषयांस जाणतो परन्तु पांच इंद्रियें मला जाणूं शकत नाहींत. द्रव्य, क्षेत्र, काल, भव, भाव, रूप पांच प्रकार परिवर्तनरूप

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संसार आहे. तो माझ्या स्वस्वभावस्वरूपापासून भिन्न आहे. संसाराचें कारण जे प्रकृतिबंध, स्थितिबंध अनुभागबंध, आणि प्रदेशबंध असें जें चार प्रकारचे बंध आहेत. तें मी नव्हें. मी आहे तोच मी आहे. आणि माझ्यापासून पर जें देहादिक आहे तें परच आहे. मी सूक्ष्म नाहीं व स्थूलही नाहीं.

प्रश्नः—तर तुम्ही कसें आहा ?

उत्तरः—मी ज्ञानस्वरूपी आहे मी ब्राह्मण नाहीं, मी क्षत्रिय नाहीं, मी वैश्य नाहीं.

प्रश्नः—तर तुम्हीं कोण आहा ?

उत्तरः—मी केवलज्ञानस्वरूपी आहे मी-वेदक—बोधक आचार्य नाहीं-क्षपणक-दिगम्बर मुनि नाहीं—कोणत्या मताचा गुरु नाहीं—कोणी भेषी नाहीं—एकदंडी त्रिदंडी, हंस, परमहंस वगैरे भेष नाहीं—मी सन्यासी नाहीं—जटाधारी नाहीं—मुंडी किंवा योगदंड रुद्राक्ष-की माला, तिलक, छापा वगैरे जितके भेष—सोंग बाह्यरूप आहेत-त्यापैकीं कोणीही मी नाहीं-मी गुरु नाहीं—मी शिष्य नाहीं-मी मालक नाहीं-मी नौकर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीं-मी सूरवीर नाहीं-मी कायर नाहीं-मी शक्ति-हीन नाहीं–मी बलाढ्य नाहीं–मी उच्चकुली नाहीं मी नीचकुली नाहीं–मी मनुष्य, देव, तिर्यंच नारकी नाहीं–मी मूर्ख नाहीं—मी विद्वान् नाहीं-मी दरिद्री नाहीं–मी धनाढ्य नाहीं-मी समर्थ नाहीं, मी बालक नाहीं—मी तरुण नाहीं–मी वृद्ध नाहीं–मी कृश नाहीं–मी निद्रा नाहीं —-निद्रेमध्यें जितके जंजाल दिसतात तसा मी नाहीं, जागृत अवस्थेंत जसें पहाणें जाणणें आहे, तसेंच स्वप्नांत आाणि सुसुप्तिमध्यें तन-मन, धन वचन तूं, मी, हें, तें वगैरे कांहीं संकल्प विकल्प नाहीं-परन्तु पाहणें आणि जाणणें ह्या कामी जसा-चे तसा आहे. घोरनिद्रेंत कोणी असेल त्यास जागे करील तर तो जाणणारा वचनद्वारें म्हणील फार उत्तम झोंप आली होती, मोठ्या आ-नंदात निजलो होतो अशा प्रकारे तो घोर झोपेंतील गोष्ठी सांगतो. तर घोरनिद्रेंतही पाहणें जाणणें जसेंचे तसेंच आहे ते आहेच. जसें डोळ्या-नीं पाहातो. तसेंच पांचीही इंद्रियांनीं पाहतो जों-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

णेंतो. कां म्हणालतर ज्ञान पदार्थ देहाच्या अंतर्बाह्य आहे. सर्वांग आहे. पाहणें, जाणणें, आणि ज्ञान ही तीन नांवें आहेत. परन्तु वस्तु एकच आहे. जसें अग्नि, उष्णता आणि प्रकाश ही नांवें तीन आहेत परन्तु वस्तु एकच आहे. 'ज्ञान' अज्ञान आणि असें जें जाणतें तेंच ज्ञान आहे. तेंच पाहाते व जाणते.

प्रश्नः— ज्ञान आहे. ते कोणाला पाहतें व जाणतें.

उत्तरः— लोकास, अलोकास, जगतातील संसारास, तुला, मला, तन, मन, धन, आणि वचनाला आणि जितके वचनानीं सांगतां येण्यासारखे आहे त्या सर्वांस ज्ञान पाहातें व जाणतें.

प्रश्नः— ज्ञानांत व अज्ञानांत किती अंतर आहे.

उत्तरः— जितका अंतर सूर्यांत व अंधारांत आहे. तितका अंतर ज्ञानांत व अज्ञानांत आहे.

प्रश्नः— ज्ञान व अज्ञान आहे त्यांत तुम्ही कोण आहा ?

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उत्तरः—मी ज्ञानही नाहीं व अज्ञानही नाहीं कां म्हणाल तर, मी ज्ञान आहे परन्तु अज्ञानाच्या अपेक्षेनें ज्ञान आहे. अपेक्षारहित स्वानुभवगम्यांत जसा आहे तसाच आहे.

प्रश्नः—तर तुम्हीं कोण आहा ?

उत्तरः— तूं तुझ्या तन मन धन वचनास सोडून तूं तुझ्यांत तूं आपल्याला विचारानें निरीक्षण कर—पाहा व जाण समज,तूं आहेस. ह्या ठिकाणीं प्रश्न करणारा मौनावलंबी झाला. तर उत्तर देणाराही मौनावलंबी झाला.

आतां पुनः प्रश्नकरणारानें मौन सोडून बोलणें सुरूं केलें.

प्रश्नः—सद्गुरुमहाराज ! आपण मला सांगितलें कीं, तूं तन,मन,धन, सोडून तूं सूक्ष्म विचार करून पाहा व समज, तू कोण आहेस परन्तु माझा शोध मला लागेना; तर आपण तन मन धन वचन सोडून बोला आपण कसें आहा.

उत्तरः—मी तन,मन, धन,वचन नाहीं,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रश्नः—आपण तन,मन, धन,वचन कसे नाहीं.

उत्तर—तुझा प्रश्न येथें असा आहे कीं, तुम्ही तन,मन,धन,वचन कसें नाहीं येथें ज्याला तूं असे म्हणतोस तोंच मी आहे.

प्रश्न—तुम्ही तन,मन,धन, वचन नाहीं तर कोण आहा?

उत्तरः—तन, मन, धन, आणि वचन आहे तें जड आहे. मी मुळापासून जड नाहीं. आणि तन मन धन व वचनाच्या आदि अंत मध्यांत जो आहे. तो मी नाहीं. बाकी जें राहिलें तेंच मी आहे. तें श्रवणकर—जितने नावाच्या प्रतिपक्षी अनांम आहेत तें मी नव्हें. जितके रूप अरूप आहे. तें मी नव्हें. जितके आकार निराकार आहेत तें मी नव्हें. जितके अमूर्तिक मूर्तिक पदार्थ आहेत-तें मी नव्हें. जितक्या वस्तु पाहण्यांत येतात किंवा येत नाहीत. तेंही मी नव्हें. जितक्या वस्तु वचनानें सांगण्यांत येतात. आणि सांगण्यामध्यें येत नाहींत. तेंही मी नव्हें. नाम,स्थापना,द्रव्य,भाव असे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चार निक्षेप आहेत.तेंही मी नव्हे.आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जें आहे. तेंही मी नाहीं.बाकी जें राहिलें तें मी आहे.प्रत्यक्ष प्रमाण, परोक्षप्रमाण,स्मृतिप्रमाण, प्रत्याभिज्ञानप्रमाण, तर्कप्रमाण अनुमानप्रमाण आणि आगमप्रमाण हें सहा प्रमाण आहेत.तेंही मी नव्हे.आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जे आहे.तेही मी नव्हे. बाकी राहिलें तेंच मी आहे मीच्या आदि जे आहे. तेंही मी नव्हे. मीच्या नंतर—अंत आहे. तेंही मी नव्हे. मी नाहींच. अर्थात् मी आहे ह्याच्या आदि, मी आहे ह्याच्या अंत, आणि तिसरा मी. अशा तिन्हीच्या आदि अंत मध्यांत मी नाहीं-बाकी राहिले ते मी आहे. मी नाहीं आणि मीच्या आदि अंत मध्यांत जे आहे. तें मी होय. ॥ संपूर्ण ॥ सोहं ॥

॥ ॐ तत्सत् परब्रह्मपरमात्मने नमः ॥

अथ आकिंचिन्यभावना.

दोहा.

मेरा मुझसे अलग नहिं, सो परमातमदेव ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ताकूं वंदू भावसे, निसदिन कर्ता सेव ॥ १ ॥
मेरा मुझसे अलग नहिं, सो स्वरूप है मोय ।
धर्मदास क्षुल्लक कहे, अंतर बाहिर जोय ॥२ ॥
जो अपना निजरूप है, जानन देखन ज्ञान ।
इसबिन और अनेक हैं, सो मैं नहीं सुजान ॥३॥
अन्यद्रव्य मेरा नहीं, मैं मेरोही सार ।
धर्मदास क्षुल्लक कहे, सो अनुभव सिरदार ॥४॥

व्याख्या

माझ्या ज्ञानदर्शन स्वरूपाशिवाय अन्य किंचित मात्र ही आमचे कांहीं नाहीं. मी कोणी एक व द्रव्य कोणी दुसरा असा भेदभाव नाहीं–माझे दुसरे कांहीं द्रव्य नाहीं. जो माझ्यापासून भिन्न आहे. त्यापासून मी ही भिन्न आहे. अशा अनुभवाला आ· किंचिन्य ह्मणतात. तोंच अनुभव मला ही आहे· मी आत्मा आहे तोच–माझे मी त्यास समजावितो

हें आत्मन् ! आपल्या आत्म्याला देहापासून भि· न्न. ज्ञानमयी दुसऱ्या पदार्थांची उपमारहित आणि स्पर्श, रस, गंध, आणि वर्णरहित समजा. देह आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तो मी नव्हे. आणि देहाच्या आंत व बाहेर आका-श वगैरे आहे. तेंही मी नव्हे. देह आहे तो जड-अचेतन हाड, मांस, मल, मूत्रानें भरलेला आहे. किंवा तनमनानें बनला आहे. मी मूळापासून अ-लग आहे.जसें-अंधार सूर्यापासून दूर आहे.ब्राह्मण क्षत्री वैश्य शूद्रादिक जात कुल जें आहे तें देहाचे आहे. तथा स्त्री, पुरुष, नपुंसकादि ३ लिंग आहेत. तेंही दे-हाचें आहेत. माझे नव्हे. मला जो कोणी देह सम--जतो. तो बहिरात्मा मिथ्यादृष्टि आहे. आणि गोरा, काळा, राजा, रंक, मालक, सेवक, पंडित, मूर्ख, गुरु, शिष्य वगैरे कृति माझी नव्हे देहाची आहे. मी ज्ञाता आहे-जन्म, नाम मरणादिक देहाचा धर्म आहे. तीन काल आणि त्रैलोक्यांत जितकी नावें आहेत ती माझी नव्हेत. तीन काल आणि तीन लोक माझ्या पासून भिन्न आहे. जसें-सूर्या-पासून अंधार भिन्न असतो. मी जैन व वैष्णव म-तावलंबीचा गुरु व शिष्य नाहीं. कर्ता कर्म क्रिया संपादन अपादन अधिकरण पासून भिन्न आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दोहा—एक अकिंचन भावना, भावै सुरत संभाल ।
धर्मदास साची लिखे मुक्त होय ततूकाल ॥ १ ॥
आपणो आपो देखके, होय आपको आप ।
होय निचंत तिष्ठयो रहै किसका करणा जाप ॥ २ ॥

प्रश्नः—हे सद्गुरु आपणास काय निश्चय झाला आहे.

उत्तरः—गुरु म्हणतात, सांगतो तूं निश्चय कर. मी, मी अशा मी दोन आहेत एक युक्तीने सांगतो १ तोंडात वचन व चुलींत अग्निमध्यें मी आहे तेंही मी नव्हे, मुखांत मी आहे तें मी नाहीं

प्रश्नः—मला समजलें, वचनांत मी आहे ते मी नव्हे. जसें—चुलीत अग्नि आहे असें वचन ऐकून कोणी तोंडात अग्नि पाहील तर तोंडांत आग्नि दिसणार नाहीं-जसें-तो चंद्र माझ्या बोटावर आहे. असे वचन कोणी ऐकून त्याच्या बोटावर चंद्र पाहील तर त्याच्या बोटावर चन्द्र दिसणार नाहीं. करिता मला असा निश्चय झाला आहे कीं, वचनांत मी आहे. तों आपला मी नव्हे. वचनातीत मी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे तो आपला मी आहे.

प्रश्नः—हें सद्गुरु आणखी सांगा आपणास काय काय निश्चय झाला आहे.

उत्तर—मी आहे तेंही मी नव्हे. आणि मीच्या आदि अंतःमध्यांत कांहीं जें आहे. तें मी नव्हे. बाकी जे राहिले आहे तेंच मी आहे. आणखी श्रवणकर माझ्यापासून जितकी रचना भिन्न दिसत आहे. तो मी नव्हे. ती रचना व ती रचना पाहाणारा मी, ह्या दोहीं मध्यें अग्नि उष्णता, सूर्यप्रकाशवत् व सुवर्ण पीतादिगुणवत् एकता नाहीं. आणखी सांगतो—

जसें सूर्याच्या प्रकाशांत सर्व जगत शुभाशुभ—पाप पुण्य कर्म करतात त्याचें फल—सुख दुःखादिक ज्याचा तोंच म्हणजे कर्म करणारा भोगतो. सूर्य भोगत नाहीं तसेंच माझ्या ज्ञान प्रकाशांत आलजंजाल—निद्रा, स्वप्न, घोरनिद्रा जन्ममरण जगत संसार आहे. आणखी सांगतो—

जसें समुद्रावर लाटा उसळतात. तसें माझ्या केवलज्ञान समुद्रावर मन बुद्धि चित्त अहंकार,अंतः-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करणादिक किंवा तन मन धन वचनादिक ह्याची रचना आहे. परंतु ज्ञान आणि तनमनादिक रचना अग्निउष्णताप्रमाणे तन्मय—एकरूप नाहीं.

आनखनि सांगतो—जसा—मी आहे तसा—आनखी कोणी होईल तर त्यांस माझा आणि माझ्या केवलज्ञानाचा निश्चय होईल.

दोहा—धर्मदास यो नाम है, सो शरीरको जान ।
शरीर जैसो मै नहीं, येह तूं निश्चय मान १

समजतो आणि समजावितो ह्या दोन्हींतहीं मी नाहीं. समजत नाहीं. आणि समजावीत नाहीं ह्या दोहींत ही मी नाहीं. समजतो, समजावितो, समजत नाहीं आणि समजावीत नाहीं ह्या चारींत ही मी नाहीं. आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जो आहे तोही मी नव्हें. नाम, स्थापन, द्रव्य, भाव हें चार आहेत . तेंही मी नव्हे. आणि ह्या चारांच्या आदि अंत मध्यांत आहे, तोही मी नव्हें. बाकी राहिले जें तें मी आहे. आणि लोकालोकाच्या आदि अंत मध्य आहे तो मी नव्हें.बाकी जें राहिलें तें मी आहे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रात्र व दिवस आहे तोही मी नव्हें- आणि ह्यांच्या आदि अंत मध्य जें आहे तें मी नव्हें. बाकी जें राहिले आहे ती मी आहे.

अंधकार व प्रकाश आहे तोही मी नव्हें. आणि ह्याच्या आदि अंत मध्य जो आहे तोही मी नव्हें. बाकी राहिले तें मी आहे. ज्यास अपेक्षा लागती व ज्यास अपेक्षा लागत नाहीं. तोही मी नव्हें. आणि ह्याच्या आदि अंतमध्य जें आहे तेंही मी नव्हें. बाकी जें राहिले तें मी आहे. मी आहे मी आहे एकानेक आहे तोंही मी नव्हें.आणि ह्यांच्या आदि अंत मध्य आहे तेही मी नव्हें. बाकी राहिले तो मी आहे. गुप्त व प्रगट जें आहे. तेंही मी नव्हें. आणि ह्यांच्या आदि अंत मध्य जें आहे तेंही मी नव्हें. बाकी जें राहिले तें मी आहे. वचनानें सांगता येतें व वचनानें सांगता येण्यासारखे नाहीं. तेंही मी नव्हें. आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जें आहे तेंही मी नव्हें. बाकी राहिले तें मी आहे. अहाहा ! मला शब्दद्वारें स्वानुभवसम्यक्ज्ञानाचें—परमात्मपूर्णज्ञानाचें मनन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झालें. हींच भावना परमानंत सुखांत तल्लीन करणारी आहे.

जसें मूळापासून अंधार आहे तो अंधारच आहे. आणि सूर्य आहे तो सूर्यच आहे. तसें ज्ञान आहे तें ज्ञान मूळापासूनच आहे व आज्ञान आहे तें अज्ञान मूळापासूनच आहे. ह्या दोन्हींस एक तत्स्वरूप न जाणावें न मानावें, मी आहे ते मीच आहे. आणि अन्य आहे ते अन्यच आहे. ज्यास त्याग व ग्रहण करण्याची इच्छा आहे आणि ज्यास त्याग व ग्रहण करण्याची इच्छा नाहीं तोही मी नव्हें. ह्यांच्या आदि, अंत, मध्यांत जे कांहीं आहे, तेंही मी नव्हें, बाकी जें राहिले तेंच मी आहे जो आपणास मुक्त मानतो व आपल्यास मुक्त मानत नाहीं. तो ही मी नव्हे आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जें आहे तेहीं मी नव्हे. बाकी जें राहिले ते मी आहे. मी आहे आणि मी नाहीं असाही मी नव्हे आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जें आहे तेही मी नव्हे बाकी राहिले तेंच मी होय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तूं, मी, हें, तें. हें आहेत. तेंही मी नव्हें. आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत आहे. तेंही मी नव्हें. बाकी जें राहिले तेंच मी होय.

बंध, मोक्ष, लोक, आलोक, जगत, जुगतादिक जें आहे तें सर्व माझ्या सन्मुख असें आहेत कीं, जसें सूर्याच्या सन्मुख अमावास्याच्या मध्यरात्रीचा अंधार आहे. अर्थात् परस्पर अत्यंत भिन्न आहे.

मी ०००, २, ३, ४, ५, ६, ७. ८, ९, ०० असा नाहीं. आणि ००० २, ३, ४' ५, ६, ७ ८, ९, ००० ह्यांच्या आदि अंत मध्यांत जो आहे तोही मी नव्हें. बाकी राहिले तेंच मी आहे.

ॐ नमः सिद्धेभ्यः।

अआ इई उऊ ऋॠ ऌॡ एऐ ओऔ अंअः। कखगघङ, चछजझञ, टठडढण, तथदधन, पफबभम, यरलवशषसहळक्षज्ञ।

ककाॱ खखाॱ गगाॱ घघाॱ ङङाॱ चचाॱ छछाॱ जजाॱ झझा ॱ ञञाॱ टटाॱ ठठाॱ डडाॱ ढढाॱ णणाॱ तताॱ थथाॱ ददाॱ धधाॱ ननाॱ

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पपा० फफा० बबा० भभा० ममा० यया० ररा० लला० ववा० शशा० षषा० ससा० हहा० ळळा० क्षक्षा० ज्ञज्ञा० इति कका संपूर्ण'

अथ माझ्याद्वारें माझी भावना.

'मी' नाहीं परन्तु मीवाचून माझा अनुभव-मनन होत नाहीं. करितां 'मी' चीज कोणी आहे. हीचा मोठा उपकार आहे. 'मी' चीज नसती तर माझे मला निर्विकल्प—निराबाध ज्ञान अनुभव मनन झाला नसतां.आतां मी ही वस्तु नाहीं परंतु न होणारि मी माझा अनुभव व मनन करतो.

जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, आणि काल ही ६ द्रव्यें सांगणारा सांगतो. परंतु मी सहा द्रव्यें नाहीं ह्या सहा द्रव्याच्या आदि अंत मध्यांत जें कांहीं आहे तें ही मी नव्हें आणि सहा द्रव्यांची लक्षणें जी—आस्तित्व,वस्तुत्व, द्रव्यत्व,प्रमेयत्व,अगुरुलघुत्व, प्रदेशवत्व, चेतनत्व, अचेतनत्व, मूर्तित्व, आहेत ह्या लक्षणानीं युक्त मी नाहीं- आणि ह्यांच्या आदि अंत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मध्यांत ही मी नाहीं. वाकी सांगणें, ऐकणें, पाहाणें, आणि विचार करण्यांत आलें नाहीं, येणार नाहीं, असा कोणी आहे तोंच मीच्या—प्रथमचा प्रथम देखील अन्यवस्तु पासून भिन्न आहे तोंच मी आहे.

अथ निर्वाणदशक.

न भूमि र्न तोयं न तेजो न वायु, र्न पंचेंद्रियं वा न तेषां समूहं । अनैकांतिकत्वात्सुषुप्त्यैकसिद्धस्तदेको वासिष्ठः शिवःकेवलोऽहं ॥१॥ न वर्णा न वर्णाश्रमाचारधर्मा न मे धारणाध्यानयोगादयोपि । अनात्माश्रयोऽहं ममाध्यासहानास्तदेकोवासिष्टः शिवः केवलोहं ॥ २ ॥ न माता पिता वा न देवा न लोका न वेदा नयज्ञानतीर्थं ब्रुवंति । सुषुप्तौनिरस्तातिशून्यात्मकत्वात्तदेको वासिष्ठः शिवः केवलोहं ॥ ३ ॥ न सांख्यं न शैवं न तत्पांचरात्रं, न जैनं न मीमांसकादेर्मतं वा । विशिष्टानुभूत्या विशुद्धात्मकत्वा त्तदेकोवाशिष्ठः शिवः केवलोऽहं ॥ ४ ॥ न शुक्लं न कृष्णं न रक्तं न पीतं न पीनं न कुब्जं न ऱ्हस्वं न दीर्घम् । अरूपं तथा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्योतिराकारतत्वात् तदेको वासिष्ठःशिवःकेवलोऽहं ॥ ५ ॥ न जाग्रं न स्वप्नं को वा सुषाप्तिर्न विश्वो न वा तैजसः प्राज्ञको वा । अविद्यात्मकत्वात् त्रयाणां तुरीयस्तदेको वसिष्ठः शिवः केवलोऽहं ॥ ६ ॥ न शस्त्रं न शास्त्रं न शिष्यो न शिक्षा न च त्वं न चाहं न चायं प्रपंचः। स्वरूपावबोधात् विकल्पासहिष्णुस्तदेको वासिष्ठः शिवः केवलोऽहं ॥७॥ नचोर्ध्वं न चाधो नचांतर्न बाह्यं न मध्यं न तिर्यङ् न पूर्वांपरा दिक् । वियद्व्यापकत्वादखंडैकरूपस्तदेको वसिष्ठः शिवः केवलोऽहं ८ अपि व्यापकत्वात् वितत्वात्प्रयोगात् स्वतःसिद्धभावादनन्याश्रयत्वात् । जगत्तुच्छमेतत् समस्तं तदन्यस्तदेको वासिष्ठःशिवःकेवलोऽहम् ॥९॥ न चैकं तदन्यत् द्वितीयं कुतःस्यात् नचा केवलं त्वं तवाकेवलत्वम् । न शून्यं न चाशून्यमद्वैतकत्वात् कथं सर्ववेदांतासिद्धं ब्रवीमि ॥ १० ॥

अथ निर्वाणषट्कं ।

मनोबुद्ध्यहंकारचित्तानि नाहं न च श्रोत्रजिव्हे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

न च घ्राणनेत्रे । नच व्योमभूमी न तेजो न वायु-श्चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहं ॥१॥ नच प्राण-संज्ञो नच पंचवायुर्न वा सप्तधातुर्न वा पंचकोशः। न वाक् पाणिपादौ न चोपस्थवायुश्चिदानंदरूपः शिवोहं शिवोहं ॥ २॥ न मे द्वेषरागौ न मे लोभ-मोहौ मदो नैव मात्सर्यरूपातिभावः । न धर्मो न चार्थो न कामो न मोक्षश्चिदानंदरूपः ।शिवोहं शिवोहं ॥ ३ ॥ न पुण्यं न पापं न सौख्यं न दु-खं न मंत्रो न तीर्थं न वेदा न यज्ञाः । अहं भोज-नं नैव भोज्यं न भोक्ता चिदानंदरूपः शिवोहं शिवोहं ॥ ४ ॥ न मृत्युः न शंका न मे जातिभे-दाः पिता नैव मे नैव माता न जन्म । न बंधुर्न मित्रं गुरुर्नैव शिष्यश्चिदानंदरूपः शिवोहं शिवोहं ॥ ५ ॥ अहं निर्विकल्पी निराकाररूपी विभुत्वा-च्च सर्वत्र सर्वेंद्रियाणां । नचासंगता नैव मुक्तिर्न मेयं चिदानंदरूपः शिवोहं शिवोहं ॥ ६ ॥

अथ आत्मपंचक ॥

नाहं देहो नेंद्रियाण्यंतरंगं नाहंकारः प्राणवर्गो न

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बुद्धिः। दारावत् ये क्षेत्रवित्तादिदूरे साक्षी नित्यं प्रत्यगात्मा शिवोहं ॥ १ ॥ रज्जुज्ञानाद् भाति रज्जु र्यथाहि स्वात्मज्ञानादात्मनो जीवभावः । आ सोक्तया हि भ्रांतिनाशे स रज्जुर्जीवो नाहं देशिको-क्त्या शिवोहं ॥ २ ॥ आभातीदं विश्वमात्मन्य-सत्यं सत्यज्ञानानंदरूपे विमोहात् । निद्रामोहात् स्वप्नवत्तन्न सत्यं शुद्धः पूर्णो नित्य एकः शिवो-हं ॥३॥ मत्तो नान्यत्किंचिदत्रास्ति विश्वं सत्यं बाह्यं वस्तुमायोपक्लृप्तं । आदर्शांतर्भासमान-स्य तुल्यं मय्यद्वैते भाति तस्मात् शिवोहम् ॥ ४॥ नाहं जातो न प्रवृद्धो न नष्टो देहस्योक्ताः प्राकृ ताः सर्वधर्माः । कर्तृत्वादिश्चिन्मयस्यास्ति नाहं कारःस्याद्धिवज्ञानात्मनो मे शिवोहम्॥५॥नाहं जा तो जन्ममृत्युःकुतो मे नाहं प्राणःक्षुत्पिपासे कुतो मे । नाहं चित्तं शोकमोहौ कुतो मे नाहं कर्ता बंध-मोक्षौ कुतो मे ॥ ६ ॥

अथ प्रश्नाः ।

कस्त्वं शिशो कस्य कुतोऽसि गंता। किं नाम ते त्वं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कुत आगतोसि। एतन्मयोक्तं वद चार्भकत्वं मत्प्रीतये प्रीतिविवर्धनोसि ॥ १ ॥

उत्तरः—

नाहं मनुष्यो नच देवयक्षौ। न ब्राह्मणक्षत्रिय-वैश्यशूद्राः। नच ब्रह्मचारी न गृही वनस्थो भिक्षुर्न चाहं निजबोधरूपं ॥ २ ॥ निमित्तं मनश्चक्षुरादिप्रवृत्तौ निरस्ताखिलोपाधिराकाशकल्पः। रविर्लोकचेष्टानिमित्तं यथायं सनित्योपलब्धिस्वरूपोहमात्मा ॥ ३ ॥ यमग्न्युष्णवत् नित्यबोधस्वरूपं मनश्चक्षुरादीन्यबोधात्मकानि। प्रवर्तंत आश्रित्य निष्कंपमेकं सनित्योपलब्धिस्वरूपोहमात्मा ॥ ४ ॥ मुखाभासके दर्पणे दृश्यमानो मुखत्वात्पृथक्त्वेन नैवास्ति वस्तु। चिदाभासको धीषु जीवोपि तद्वत् सनित्योपलब्धिस्वरूपोहमात्मा ॥ ५ ॥ यथा दर्पणाभाव आभासहानौ मुखं विद्यते कल्पनाहीनमेकं। तथा धीवियोगे निराभासको यः सनित्योपलब्धिस्वरूपोहमात्मा ॥ ६॥ मनःश्चक्षुरादेर्वियुक्तःस्वयं यो मनश्चक्षुरादेर्मन-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्चक्षुरादिः। मनचक्षुरादेरगम्यस्वरूपः सनित्यो-पलब्धिस्वरूपोहमात्मा ॥ ७ ॥ य एको विभाति स्वतः शुद्धचेत्ताः प्रकाशस्वरूपोपि नानेव धीषु। शरावोदकस्थो यथा भानुरेकः सनित्योपल-ब्धिस्वरूपोहमात्मा ॥ ८ ॥ यथानेकचक्षुः-प्रकाशो रविर्न क्रमेण प्रकाशं करोति-प्रकाश्यम् । अनेका धियो यास्तथैकप्रबोधः सनित्योपलब्धिस्वरूपोहमात्मा ॥ ९ ॥ विवस्वत् प्रभातं यथारूपमक्षं प्रगृण्हाति नाभातमेवं वि-वस्वान् । यदा भात आभासयत्यक्षमेकः सनित्यो-पलब्धिस्वरूपोहमात्मा ॥ १० । यथा सूर्य एक-श्चैकशश्चलासु स्थिरास्वप्यनन्यो विभाव्यस्वरूपः। चलासु प्रभिन्ना सुधीष्वेक एव सनित्योपलब्धि-स्वरूपोहमात्मा ॥ ११ ॥ घनच्छन्नदृष्टी घन-च्छन्नमर्कं यथानिष्प्रभं मन्यते चातिमूढः । तथा बद्धवद्भाति यो मूढदृष्टेः सनित्योपलब्धिस्वरूपो-हमात्मा ॥१२॥ समस्तेषु वस्तुष्वनुस्यूतमेकं सम-स्तानि वस्तूनि यन्न स्पृशंति। वियद्वत्सदाशुद्धम-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

च्छस्वरूपः समित्योपलब्धिस्वरूपोहमात्मा ॥१३॥
उपाधौ यथा भेदता सन्मणीनां तथा भेदता बुद्धि-
भेदेन तस्मिन्। यथा चांद्रिकाणां जले चंचलत्वं
तथा चंचलत्वं तवापीह विष्णौ ॥ १४ ॥

इतिश्री

प्रश्न– तुह्मी कोण आहा ?

उत्तर–मी, मी नाहीं परंतु मी वाचून माझी हकीगत कोण सांगेल, कारितां मी सांगतो—

मी आकार निराकार नाहीं आणि ह्याच्या आ–दि मध्य अंतात ही मी नाहीं, रूपी व अरूपीही मी नाहीं व ह्याच्या आदि अंतःमध्यांत ही मी नाहीं. मूर्ति व अमूर्ति ही मी नाहीं व ह्याच्या आदि अंतःमध्यांत ही मी नाहीं जीव व अजीवही मी नाहीं व ह्याच्या आदि अंतःमध्यांत ही मी नाहीं. चेतन अचेतनही मी नाहीं व ह्याच्या आदि अंतःमध्यांत ही मी नाहीं ज्ञान अज्ञानही मी नाहीं व ह्याच्या आदि अंतःम--ध्यांत ही मी नाहीं. नाम अनामही मी नाहीं व ह्या--च्या आदि अंतःमध्यांत ही मी नाहीं. शून्याशून्य-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ही मी नाहीं व ह्याच्या आदि अंतःमध्यांतही मी नाहीं लोकालोकही मी नाहीं.व ह्याच्या आदि अंतःमध्यांत नाहीं. आस्ति नास्तिही मी नाहीं व ह्याच्या आदि अंत मध्यांतही मी नाहीं.आदि अंत मध्यही मी नाहीं व ह्याच्या प्रथम मध्यें अंतांतही मी नाहीं. तन धन मन ही मी नाहीं व ह्याच्या आदि अंत मध्यांतही मी नाहीं. मीच्या आदि अंत मध्यांतही मी नाहीं आणि मूळापासूनच मी नाहीं.

प्रश्नः—हे सद्गुरु आपण कोण आहा?

उत्तरः—तूं आहेस तोच आहेस आणि मी आहे तें मी नाहीं परन्तु मीचा अर्थ सांगतो श्रवणकरः— आर्तध्यान, रौद्रध्यान, धर्मध्यान आणि शुक्लध्यान आहेत हें ध्यानें मी नव्हे. आणि ह्या चार ध्यानाच्या आदि अंत मध्यांतही मी नाहीं. बाकीचें जे राहिलें तेच मी आहे. सांग बरे, तूं कुणाला सद्गुरु म्हणतोस. ऐक—तूं प्रश्न विचारतोस त्याच्या प्रथम तूं आहेस. तूं प्रथम नसतास तर प्रश्न करता आला असता का? आणि उत्तर देण्याच्या अगोदर मी हें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे. मी प्रथम नसतोतर उत्तर कोण देणार, प्रश्न करण्याच्या पूर्वीच तूं कोण आहेस सांग बरे. श्रवण-कर—नैगम, संग्रह, व्यवहार, ऋजुसूत्र, शब्द, स-मभिरूढ आणि एवंभूत असे सात नय आहेत किंवा द्रव्यार्थनय; पर्यायार्थनय आहेत किंवा स्याद्वादनय आहेत किंवा ऐकांत अनेकांतनय आहेत अथवा निश्चयनय व्यवहारवगैरे नय आहेत. तेंही मी नव्हे आणि ह्या नयांच्या आदि अंत मध्यांत जें आहे. तेंही मी नव्हें. बाकी जे राहिलें तेंच मी होय, माझ्यामध्यें आणि परब्रह्म परमात्मामध्यें सूर्य प्रकाशवत् एकपणा आहे. सूर्य व अंधारा-सारखा अंतर नाहीं. पिंडस्थध्यान, पदस्थध्यान, रू-पस्थध्यान, आणि रूपातीत ध्यान. ही चार ध्यानें आहेत. तेंही मी नव्हे. आणि ह्या चार ध्यानाच्या आदि अंत मध्यांत जें आहे तेही मी नव्हे. बाकी जें राहिले तेंच मी होय. सूर्याचें ध्यान सूर्य काय करील, साखर आहे ती मिष्ट रसाचा स्वाद कसा करील, निराकार तर दृष्टीस पडत नाहीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याचें चिंतवन करणें, त्याचा विचार करणें, त्याबद्दल विचार सांगणें आणि त्याचें ध्यान करणें हें सर्व अशक्य आहे. आणि आकार आहे तो दृष्टीस पडतां त्याचें चिंतवन करणें, त्याचा विचार करणें. आणि त्याबद्दल कांहीं बोलणें वगैरे करितां येतेंच. त्याचें ध्यान कसलें करावयाचे. अजीव—अचेतन पदार्थांचें ध्यान धरणें व्रथा आहे. आणि माझ्या पासून जें सूर्य अमावास्याच्या रात्री प्रमाणें प्रथक् आहे परस्पर विरोधी वस्तूंचे ध्यान कसें करता येईल आणि करूं. आणि जसें आकाशामध्यें घटपटादिक (षटद्रव्य) आहेत. तसें माझ्या ज्ञानगुणांत तें सर्व कांहीं झळकत आहेत व तर आतां त्याचें ध्यान आणखी कसलें करावयाचें व करूं. आणि ह्या जगताची मला चांगली खबरही नाहीं कीं, हे जग केव्हां पासून आहे, कोठपर्यंत ह्या जगाचा आदि अंत आहे. ह्यांत अनेक चित्र विचित्र सूर्य, चंद्र, तारे तम, प्रकाश, पहाड, नदी, समुद्र, महल, वृक्षादिक अगणित वस्तु आहेत. त्यांत मी कोणाला जग म्हणूं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाम मात्र जगत बोलण्यांत येतें परन्तु कोणत्या वस्तूचें नांव जगत आहे ही मला खबर नाहीं मला बरोबर जगताची खबर लागली नाहींतर जगताचे ध्यान कसें करूं.

आणि मला माझीही खबर नाहीं की. मी कोठून आलो आहे, कोठें जाणार आहे, केव्हां पासून आहे आणि कोठपर्यंत राहणार व कोठपर्यंत माझा, आदि अंत आहे. हे मला समजत नाहीं तर मी ध्यान काय म्हणून करूं (परन्तु ह्या नावांत मी हें नांव नाहीं.)

तन, मन, धन वचन, बुद्धि, चित्त, अहंकार, अंतकरण, क्रोध, मान, माया, लोभ, मोह ममता, माया, छाया, काया, जाया जन्म, मरण, जरा, रोग, शोक, आकार, निराकार, लोक, अलोक, जगत जुगत जोग, स्त्री, पुरुष, नपुंसक, जीव अजीव, वगैरे जगातील अनेक वस्तु भाषा अनेक नाव आहेत. मला दुसरें नांवही नाही. मला मीच नांव आहे.

मी असा आहे—जितकें पाहण्यांत येतें, समज-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ण्यांत येतें, सांगण्यांत येतें, विचारण्यांत येतें, ऐक-ण्यांत येतें, प्रमाणांत येतें, लिहिण्यांत येतें, धरण्यांत येतें, इत्यादि आहे ते मी नव्हें. आणि ह्यांच्या आदि अंतमध्यांत आहे. तेही मी नव्हें. बाकी जे राहिलें तें मी आहे.

तीनलोकरूप संसार—जगत जडस्वरूप अचेतन आहे ह्यांत चेतन सत्ता जी आहे.ती मात्र परमात्म्याची आहे. जसें पृथ्वीवर सूर्याचा प्रकाश आहे. तसें हे तन, मन, धन, वचन, तूं, मी, हें, तें, ह्यांच्यावर केवलज्ञान स्वरूपी सूर्याचा प्रकाश आहे. ह्या प्रकाशांत तूं, मी, हे, तें, तुझा, माझा, चांगला, वाईट, लहान, मोठा, जन्म, मरण, नांव, स्त्री, पुरुष, नपुंसक, पाप, पुण्य, बंध, मोक्ष, एक, दोय, धर्म, अधर्म, आकाश, काल, जीव, अजीव, शिष्य, गुरु, ज्ञान, अज्ञान, चेतन, अचेतन, मनुष्य, देव, तिर्यंच पशु, नारकी, सुख, दुःख, काळा, पिवळा, पांढरा, लाल, हिरवा, आकार, निराकार, तन, मन, धन, वचन, सांगणें, ऐकणें, पाहणें जाणणें, विचारणें, जी-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष, पुण्य पाप हें सर्व पदार्थ केवल ज्ञानरूप दर्पणांत झळकतात, परमात्मा आहे तो केवल ज्ञानरूप दर्पण आहे. ह्यांत तीन लोक—जगत झळकत आहे परन्तु जगत आणि परमात्मा एक क्षेत्रावगाही आहे परन्तु अग्नि उष्णताप्रमाणें एकरूप नाहीं मूळापासून च भिन्न आहे. केवल ज्ञानस्वरूप परमात्मा दर्पणाचा अनुभव ज्यास घेणें असेल त्यानें असा अनुभव घेऊन परम सुखी व्हावे तें लिहितो—

परमात्म्यास दर्पणाप्रमाणें जाणणें, मानणें, जसें— एका मोठ्या दर्पणासमोर असलेलें अग्नीकुंड व जलकुंड हे दोन्हीं खरोखर दिसतात, परन्तु तें अग्निकुंड दर्पणास उष्ण करीत नाहीं व जलकुंड थंड करीत नाहीं आणि अग्नि व जल दर्पणांत प्रत्यक्ष दिसतात त्यांस खरें म्हणतां येत नाहीं व खोटेंहीं म्हणतां येत नाहीं, खरें म्हणावें तर दर्पणाच्या अंगी उष्णपणा व थंडपणा नाहीं खोटें म्हणावें तर दर्पणांत जलाग्नि वस्तु दिसत आहे. जी वस्तु प्रत्यक्ष दिस

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त आहे त्यास असत्य म्हणावे तर वर्तमान समयांत प्रत्यक्ष मी पाहत आहे तो मी असत्य होईन. परन्तु असत्य ही नाहीं करितां लोकालोक, जीव, अजीव आकार, निराकार. हे ही आहेतच. आणि ह्या सर्वांपासून सर्वथा प्रथम पासून भिन्न आहेत तेंही आहेत वर लिहिलेल्या वस्तु पासून भिन्न व मजपासून भिन्न जें आहे. तें सोहं आहे.

लोकालोकांत जितका व्यवहार आहे तो 'मी'चा आहे. परन्तु तेंही मी नव्हे आणि 'मी'ला सोडून जे भिन्न आहे—मी, तूं, हें, तें, आहें तेंही मी नव्हें. बाकी जें आहे. तेंच मी आहे.

मिथ्यात, वेद, राग, द्वेष, हास्य, रति, अरति, शोक, भय, जुगुप्सा, क्रोध, मान, माया, लोभ, क्षेत्र. वास्तु, हिरण्य, सुवर्ण, धन, धान्य, दासी, दास, कुप्य, भांड हे चोवीस परिग्रह आहेत. तेंहि मी नव्हें. आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जें आहे. तेंही मी नव्हें. बाकी जें राहिलें तेंच मी होय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ह्या सदाकाल जागतीजोत परब्रह्म परमात्मा जसा तूं आहेस तसाच मी ही आहे ही माझी मति आहे. लौकिकांत म्हण आहे कीं, ज्याची जसी मति त्याची तसी गति. तीच ही मति माझी माझ्यांत मला दृढ आहे सदाकाल जागतीज्योत परब्रह्म परमात्मा आहे. तसाच मीं आहे.

ह्या पंचमकाळांत वज्रवृषभनाराचसंहनन होत नाहीं आणि दुर्धरतप व्रत शीलादिक होत नाहीं. तथापि मी तर सदाकाळ जागतीजोत परब्रह्म परमात्मा आहे. तसाच मीही आहे. दृष्टांत—जसें— स्फटि—काच्या मण्याला काळा, पिवळा, लाल, हिरवा, डंक लाबला ह्मणजे त्या डंकाच्या निमित्तानें तो स्फ—टिकमणी त्या डंकाच्या रंगाचा दिसतो, परंतु स्फ-टिकमणी जसाचा तसाच आहे. तसेंच मला, पुद्गल-पिंडभाव रागादिक, अष्टकर्म, द्रव्यकर्म, भावकर्म, नोकर्मादिक विकार होतात तथापि मी तर जसाचा तसाच सदाकाल जागतीज्योत परब्रह्म परमात्माच आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विरोधी पदार्थ एकवट झाल्यासारखा दिसतो परंतु त्यास्वरूपाचा होत नाहीं, हे ज्ञान माझें मी च जाणतो. घायलाचीं गति—दुःख घायलच जाणतो. वेद विचारा काय जाणणार. जें वचनानें बोलण्यांत येण्याजोगे आहे. जें वचनानें सांगण्यांत येण्या सारखें नाहीं, आणि वचन ह्या तीन्हींत मी मूळापासून नाहीं. मन, मनाचा विचार-चिंतवन आणि चिंतवन न करण्यासारखें ह्या तिन्हींत मी मुळा पासून नाहीं. तन मन धन आणि वचनाच्या अगोचर आहे तो मी आहे. मी आहे हें ३ अक्षेर आहेत ती अचेतन जड आहेत. आणि मी अजीव—अचेतन नाहीं. ह्या ३ अक्षराला आणि माझ्या स्वरूपाच्या विचाराला मोठा—भारी अंतर आहे पूर्वी बहिरात्म्यावस्थेमध्यें माझी असी समज होती की मी मनुष्य आहे, कर्ता धर्ता हर्ता आहे. आतां माझ्या अंतरात्म्यांत मजबूत—अवल श्रद्धा झाली आहे कीं, मी आहे. तो शब्द आहे. अचतन—जड आहे करितां मी शब्द नव्हें—तर मनुष्य, देव, पशु, आणि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नारकी कोठून कसा होऊं शकतो. आता मी वचन-द्वारें माझ्यांत मी निश्चय करून घेतला कीं मी केवलज्ञान आहे. इति.

ॐ तत् सत् सर्वातीताय नमः

अथ अपूर्व मनन प्रारंभ ।

दोहाः-कहना सुनना देखना, अर सर्व नामसै भिन्न ।
ऐसा कोई है सही, ताकूं ध्यावै धन्न ॥ १ ॥

मी नाहीं, मी आहे. ह्या दोन्हींत सोहं (मी) नाहीं. आणि ह्या दोन्हींच्या आदि अंत मध्यांतही मी नाहीं. तूं, मी, हें, तें, ह्या चारींतही मी नाहीं, आणि ह्या चारींच्या आदि अंत मध्यांतही मी नाहीं. उत्पाद, व्यय, आणि ध्रौव्य हें तीन ही मी नव्हे. आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जे आहे तेंही मी नव्हे. उत्पाद, व्यय, ध्रौव्य ह्या तीन गुणांनीं युक्त वस्तु एकही आहे. दृष्टांत सुवर्णाचें कुंडल मोडून कडे करणे ह्यांत कड्याचा उत्पाद, व कुंडलाचा व्यय, आणि कुंडलांत व कड्यांत सोनेच आहे हे ३ गुण सुवर्णापासून भिन्न नाहींत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शून्य असून्य हे दोन आहेत. तेंही मी नव्हें आणि ह्याच्या आदि अंत मध्यांत जें आहे तेंही मी नव्हें. लोकालोक आहे तेंही मी नव्हें. आणि ह्याच्या आदि अंत मध्य आहे तेंही मी नव्हें.सर्व आहे आणि सर्व नाहीं हेंही मी नव्हें. आणि ह्याच्या आदि अंत मध्यांत आहे. हेंही मी नव्हें. आस्ति नास्ति आहे. हेंही मी नव्हे आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत आहे हेंही मी नव्हें. विधि निषेध आहे. हेंही मी नव्हें. आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत आहे हेंही मी नव्हें वचनानें जे कांहीं सांगता येतें हेंही सोहं नव्हें. आणि ह्याच्या आदि अंत मध्यांत जें आहे हेंही सोहं नव्हें. जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल हें ही सोहं नव्हें. आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत आहे. हेंही सोहं नव्हें. जीव, अजीव. आस्रव, बंध संवर, निर्जरा, मोक्ष, पुण्य, पाप हेंही सोहं नव्हें. आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत आहे हेंही सोहं नव्हें

सोहं व नसोहं हेंही मी नव्हें. आणि ह्यांच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आदि अंत मध्यांत जे आहे हेंही मी नव्हें. आहे व नाहीं हेंही मी नव्हें. आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जें आहे. हेंही मी नव्हें. ह्या शिवाय जो भिन्न आहे. हें सोहं होय.

जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल, ही द्रव्यें आहेत ती केव्हां सात होत नाहींत व केव्हां पांच ही होत नाहींत. ह्या सहा द्रव्यांत ज्ञानगुण एक जीवद्रव्यांत आहे. (बाकीच्या पांच द्रव्यांत ज्ञानगुण नाहीं.) जे आहे ते सर्व माझेंच आहे तर मग मी कशाचा त्याग तरी करूं आणि ग्रहण काय करूं. आणि बाकी जें आहे. तें मूळापासून माझें नाहीं. तर मग कशाचा त्याग करूं आणि कशाचे ग्रहण करूं. आकाश आहे त्यानें कोणत्या वस्तुचा त्याग करावा व कोणती वस्तु ग्रहण करावी

बंध, मोक्ष, सुख, दुःख, जीव, अजीव, ज्ञान अज्ञान, चेतन, अचेतन, तू, मी, हें, तें, आत्मा, अनात्मा, जोग, जुगत, परमात्मा, सिद्ध, असिद्ध, लोक, अलोक, तन, मन, धन, वचन वगैरे सर्व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

षट् द्रव्यापासून भिन्न नाहीं. ह्या सहा द्रव्यामधून निघून जर सातवें द्रव्य होईल त्याची बलहारी—अलावला आहे. तोच धन्य आहे. तेंच नाम अनामापासून भिन्न आहे. त्याचें काय नांव द्यावें. सर्व नाम व अनामांत अग्निउष्णताप्रमाणें मिळून गेलें आहेत.त्याचें तरी काय नांव द्यावें.

लोक अलोक आहे आणि लोकालोकांत जितकी रचना आहे न्याय, अन्याय, व्यवहार, निश्चय, तो सर्व मी सोहं वस्तूकडे आहे. मी ही वस्तु माझ्या स्वरूपापासून अशी भिन्न आहे कीं, जसें—पूर्व व पश्चिम दिशा दूर आहे. किंवा सूर्यापासून अमावस्याच्या रात्रीचा अंधकार दूर आहे. परंतु लोकालोकांमध्यें मी ह्या वस्तुचा लाख कोटींत—एक एकाच्यावर असा उपकार होतो कीं, ती षट् द्रव्यांतून निघून भिन्न सातवी होतें. ती सातवी झाल्यानंतर पुनः सहा द्रव्यांत यावयाची नाहीं.

ह्या गोष्टीस पंडितलोक तर आपल्यास ज्ञानी समजून वाद विवाद करूंन सप्त समुद्रांत बुडवितील

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आणि आपण कोरडे राहतील.

आणि मूर्ख लोकांस सहा द्रव्य ही नीट समजत नाहींत तर सहा द्रव्यांच्या भिन्न—पृथक् सातवें द्रव्य कोठून कसे जाणणार. आणि हजारों लाखों कोट्याधिशामधून कोणीं एखादा भद्रपरिणामी जीव ह्या अध्यात्मीक विचारास वाचून अकस्मांत चमकेल जाग्रत होईल आणि मुखांतून शब्द काढील ओहो? जीव, पुद्गल, धर्म अधर्म, आकाश आणि काल ह्या षट्द्रव्यास सोडून सातवी भिन्न वस्तु कोण आहे. कशी आहे. वगैरे विचार करीत स्यात्—कदाचित सातवी वस्तु त्यास प्राप्तही होईल षट् द्रव्यास सोडून सातव्या वस्तूंचा खरा विचार झाला म्हणजे सर्व पंडिताईवर पाणी फिरून जाते आणि स्वविचार षट्द्रव्यांत राहतो आणि षट्द्रव्यास सोडून सातव्याचा विचार करणारा आपल्या अपण सातवा होऊन जातो. सातवा झाल्यानंतर जळलेल्या दोरीप्रमाणें थोडे वेळपर्यंत कांहीं विचार राहतो. व त्या विचाराच्या द्वारें सातवा आपल्यास अ-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सा मानतो कीं, मी नाहीं. आणि मीच्या आदि अंत मध्यांतही मी नाहीं आणि षट्द्रव्यही मी नव्हें सर्वांतून बाकी जें राहिलें तें मी सातवें द्रव्य आहे. मी चीज षट्द्रव्यांतून भिन्न नाहीं. मी ची बलिहारी--अलाबला आहे. ती मला माझ्या स्वरूपाच्या प्राप्तीची प्राप्ती झाली. हा सर्व मी (सोहं) चा प्रताप आहे.

प्रश्नः—तुम्हीं 'मी' आहा की नाहीं ?

उत्तर—तूं ज्याला मी म्हणतोस तो मी मूळापासून नाहीं परन्तु मी वाचून माझा परमात्मा अनुभवज्ञानाच्या सूचनेला एक आधार आहे. करितां मी मूळांतून नाहीं.

प्रश्न— तुह्मी मी नाहीं तर कोण आहा ?

उत्तर— मी जीव नाहीं, मी पुद्गल नाहीं, मी धर्म नाहीं, मी अधर्म नाहीं, मी आकाश नाहीं, मी काल नाहीं, अर्थात् मी द्रव्य द्रव्यांत असून मी नाहीं, जसें सूर्याचें प्रतिबिंब जलकुंभांत दिसते परंतु दिसण्याला मात्र आहे. तसेंच मी केवलज्ञानी आहे. करितां षट्

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

द्रव्यांत मी असून नाहीं, षट्द्रव्य, नवपदार्थ, सात-तत्व, मनुष्य, देव, पशु, नारकी, स्त्री, पुरुष, नपुंसक. तन, मन, धन, वचन, तूं, मी, हें, तें, लोक, अलोक, विधि, निषेध, आस्ति, नास्ति, शून्य, अशून्य, सर्व नाम, अनाम, सर्वरूप, अरूप, आकार आणि निराकारादिकापासून अग्निउष्णते प्रमाणें एकरूप झालो व होणार ही नाहीं तेंच सोहं. जसें सूर्यापासून अमावस्याचा अंधार भिन्न आहे. तद्वत सर्वांपासून मी पृथक् आहे. तसेंच मन, बुद्धि, या तन, मन, धन, वचन, सोहं कोहं, तूं मी हा तो समजणें समजावणें ऐकणें बोलणें सांगणें इत्यादि कांहीं ही शुभाशुभ संकल्प विकल्प विधि निषेध अस्ति नास्ति शून्य अशून्य असत नाहीं.

प्रश्न— तर कोठें आहे 'हें' ?

उत्तर— हें, षट्द्रव्याचा गार्भित आहे.

प्रश्न— तुम्ही षट्द्रव्य गार्भित आहात ना ?

उत्तर— मी द्रव्यांत असून नाहीं. जसें—काष्ठांत अग्नि आहे. परंतु काष्ठास अग्नि जाळीत नाहीं म्हणून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

काष्ठांत अग्नि नाहीं तसें. जसें—पाण्याच्या घागरींत आकाश दिसतें परंतु आकाश आकाशांत आहे घागरींत नाहीं तसें. किंवा जसें—पृथ्वीवर सूर्याचा प्रकाश पडलेला दिसतो परंतु प्रकाश सूर्यांत आहे, तसेंच षट्द्रव्यांत मी दिसतो परंतु निश्चयानें षट्द्रव्यापासून भिन्न आहे तोच मी आहे.

००० हे बिंदु एक अंकावाचून प्रमाण संख्येंत येत नाहीं आणि हा बिंदु एक संख्येंत असा मिसळून गेला आहे कीं, जसें दुधांत घृत गुप्त असतें, तिळांत तेल, फुलांत सुगंध असतो. तसेंच—एकामध्यें हा बिंदु मिसळलेला पहा. निशाणी ०००० प्रथम बिंदु लिहिला आहे नंतर १ लिहिला आहे. पहा येथें प्रथम १ लिहिला आहे नंतर बिंदु लिहिला आहे. आतां, विचार करा कीं, बिंदुपासून एक झाला कां एकापासून बिंदु झाला.

षट्द्रव्यांत ज्ञानगुण आहे. तो तर एक बराबर आहे. सहा द्रव्याच्या प्रथक् आहे. तो सातवा बिंदुबराबर आहे. त्या परब्रह्म निकलपरमात्माचा केव-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ल एक (१) ज्ञानसमुद्रांत असा मिळाला आहे. जसें—निर्मल पाण्याच्या समुद्रांत कल्लोल अथवा मिठाचा खडा फार काय सांगू.व फार काय समजूं.

चौपई

धर्मदासक्षुल्लक यो नाम । पुद्गलपिंडतनो है जाम ।
सर्वनामके वार न पार । सर्वनामसैं रहित अपार ॥
ऐसो सोहं सो हमसार । धर्मदास ध्यावें निरधार
सोही सोहं सोहं सार । पूरण कर देख्यो अवतार

इति

अथ स्वानुभवमनन प्रारंभ ।

दोहा

मै वंदू मुनिराजकूं, भावभक्ति उरधार ।
धर्मदास सो नाम है, क्षुल्लकव्रतजूसार ॥

वार्तिकः—श्री सद्गुरूंच्या उपदेशानें मला माझा केवलज्ञानरूप स्वानुभव मला माझा होता तो जसा-चा तसा झाला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रश्नः—तुम्हाला स्वानुभव काय झाला तो कांहीं तरी सांगा.

उत्तरः—काय सांगू. त्या केवलज्ञानस्वरूप परमात्मस्वरूपाची आणि माझी असी एकता झाली आहे कीं, जसें मिठाचा खडा खाऱ्या समुद्रांत टाकला असतां गुप्त एकमेळ एकतां होऊन जातें तसें त्या केवलज्ञान परमात्म्याचा आणि माझा एक मेळ झाला आहे. तो वचनानें सांगता येत नाहीं.

प्रश्नः—कांहींतरी सांगा ?

उत्तरः— जितकें संगीन तितक्यापासून तूं, त्या केवलज्ञानस्वरूप परमात्मास भिन्न मान.

प्रश्नः—ठीक आहे. भिन्नच मानतो.

उत्तरः—हो ऐकून घे,लोक, अलोक, जगत, जुगत, योग्य, अयोग्य, विधि, निषेध, बंध, मोक्ष, जन्म, मरण, नाम, अनाम, सुख, दुःख, रूप, अरूप, आकार, निराकार, तन, मन, धन, वचन, शून्य. अशून्य, आस्ति, नास्ति, जीव, अजीव, चेतन, अचेतन, वगैरे ज्ञानापासून अज्ञानापर्यंत हें जें आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तें पहिल्यापासूनच पृथक् आहेत. आणि तूं, मी, हे, तें, हे चार आहेत ते दुग्धघृतवत् किंवा तिळ तेलवत् किंवा फूल सुगंधवत् एक रूप आहे. आणि हे पूर्वी सांगितल्या प्रमाणें मूळ-पहिल्यापासून वेगळे च वेगळे आहे ते आहेच आहे.

प्रश्न—परमात्मा आणि तुम्ही एक आहा कीं, भिन्न आहा ?

उत्तर—काय सांगू, मी आणि परमात्मा ह्या दोघांमध्यें तिसरा तूं प्रश्न करणारा आहेस ह्या करितां सांगतो. तूं चित्त देऊन श्रवणकर. जसा परमात्मा तसा च मी आणि जसा मी तसाच परमात्मा आहे अंतर येवढा आहे कीं, जसें—सोनें आणि सोन्याचा दागीना.

प्रश्न—तुम्ही कोण आहा. ?

उत्तर—तूं, मी, हें, तें, हें चार आहेत ह्यांच्या आदि अंत मध्यांत जो आहे तो मी नव्हें. परन्तु मी न होणारा होउन मी सांगतो. 'मी' च्या प्रथम कोणी आहे तो मी मूळापासून नाहीं. तुला समजाविण्याक-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रितां न होणारा होऊन तुला समजावितो तूं समजून तुझें स्वरूप ग्रहण कर.

प्रश्न—आपण आपले स्वरूप काय ग्रहण केलें. ?

उत्तर—मीच्या प्रथमाच्याही प्रथम आणि तुझ्याही प्रथम, ज्या प्रथमाच्या प्रथम कोणी नाहीं बाकी जो कोणी आहे तोंच मीं आहे आणि माझ्या पासून जो पृथक्-परद्रव्य आहे. तें परच आहे.

प्रश्न—आपणापासून भिन्न परद्रव्य कोण आहे.

उत्तर—जितकी रचना माझ्या दृग्गोचर व अगोचर आहे ह्या दोन्हीपासून असा मी भिन्न आहे जसें सूर्य आणि अंधार. मी परद्रव्य नाहीं आणि परद्रव्य आहे तें माझ्या स्वरूपाचे नाहीं. मी तर मीच आहे आणि परद्रव्य आहे. तें परद्रव्यच आहे. किंवा हें परद्रव्य माझें नव्हे. आणि मी परद्रव्याचा नाहीं. माझा मी आहे. परद्रव्य परद्रव्याचे आहे. किंवा मी ह्या परद्रव्याचा पूर्वी झालो नाहीं. आणि द्रव्य माझें पूर्वी झालें नाहीं. पूर्वी पासून माझा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मीच आहे. व पूर्वीपासून परद्रव्य परद्रव्याचें आहे तसेंच पुढें हें परद्रव्य माझें होणार नाहीं. व मी ही पुढें परद्रव्याचा होणार नाहीं. पुढें माझा मीच राहीन व परद्रव्य परद्रव्यच राहील.

प्रश्नः—परद्रव्य कोण आहे.

उत्तरः—तन मन धन वचनादिक आहे. तें ज्ञानस्वरूपीपरमात्मापासून भिन्न आहे आणि मूळापासून जड आहे.जसें—सूर्य आणि अंधार याचा मेळ नाहीं. तसेंच जडाचा व चेतनाचा मेळ पूर्वी कधी झाला नाहीं. व पुढें ही कधी होणार नाहीं. भ्रमानें मेळ दिसतो परंतु मेळ नाहीं.

ॐ नमः सिद्धेभ्यः ।

निकलपरमात्मने नमः । अहं बीजं । सोहं शक्तिः ॐ ह्रीं कीलकं ॥

परमाणूपेक्षां लहान आहे व आकाशापेक्षा मोठा आहे. तो मी आहे. समजणें व समजविणें ह्या पासून सर्वथा भिन्न आहे. तो मी आहे, देह आहे. तो मी नव्हे. आणि देहाच्या आंत बाहेर व मध्यां-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त आहे तो मी नव्हे. लोक व अलोक आहे. तें मी नव्हे. आणि लोक व अलोकाच्या आंत बाहेर व मध्यांत आहे तो मी नव्हें बाकी राहिलें तेंच सोहं, तेंच सोहं.

अथ भेदज्ञान प्रारंभ ॥ चौपाई ॥

प्रथमहि भेदज्ञान जो भावै । सोही शिव सुंदर पद पावै ॥ तातै भेदज्ञान मैं भाऊं । परमातम-पद निश्चै पाऊं ॥ १ ॥ क्षुल्लक धर्मदास अब बोलैं। देस वचानिका मैं नित खोलै। वाचो पढो भाव मनलाई । तातें मिले मोक्ष ठकुराई ॥ २ ॥

दोहा

भेदज्ञान ही ज्ञान है, बाकी बुरो अज्ञान ।
धर्मदास साची लिखे, भेमराज तूं मान ॥ १ ॥

निश्चयानें एक द्रव्याचा दुसऱ्या द्रव्यांशी कांहीं संबंध नाहीं. म्हणून द्रव्य आहे. तें पृथक् पृथक् प्रदेशरूप आहे. करितां द्रव्याची एक सत्ता होणें अशक्य आहे.द्रव्य द्रव्याची सत्ता पृथक् पृथक् आ-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हे. आणि एकसत्ता नसल्यामुळें अन्य द्रव्याशीं आधार आधेय संबंध ही नाहीं करितां द्रव्याचा आपल्या स्वरूपामध्येंच प्रतिष्ठारूप आधार व आधेय संबंध राहतो. तेणें करून ज्ञान आधेय आहे तर जाणपणारूप आपल्या स्वरूप आधारता मध्यें राहतें. ह्मणून जाणणेंपणा आहे तो ज्ञानापासून अभिन्न भाव आहे भिन्न प्रदेशरूप नाहीं. करितां जाणणें क्रियारूप ज्ञान आहे तें ज्ञानामध्येंच आहे. तसेंच—

क्रोधादिक आहे तें क्रोधारूपक्रिया जो क्रोधपणा तो आपल्या स्वरूपांतच राहतो. करितां क्रोधपणारूपक्रिया क्रोधादिकापासून अपृथक्—अभिन्न प्रदेश आहे. क्रोधरूपक्रिया क्रोधादिकांतच होते आणि क्रोधादिकांत किंवा कर्म नोकर्मांत ज्ञान नाहीं. ह्मणून ज्ञानाचा आणि क्रोधादिकाचा व कर्म नोकर्माचा अत्यंत भेदपणा आहे. त्यांची एकता होत नाहीं म्हणून परमार्थरूप आधारआधेय संबंधाचा शून्यपणा [अभाव] आहे जसें—ज्ञानामध्यें जाणपणाक्रियारूप स्वरूप आहे. आणि क्रोधादिकांत क्रोधपणारूप क्रिया स्वरूप आ-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हे. परंतु क्रोधांत जाणपणा नाहीं. कोणते प्रकारे ज्ञानावर क्रोधादिक क्रियारूप परिणामाचें स्थापन होत नाहीं. म्हणून ज्ञानरूप क्रियेचा व क्रोधरूप क्रियेचा स्वभाव भेद प्रगट पणें दिसतो आणि स्वभावच्या भेदामुळें वस्तूचा भेद होतो हा नियम आहे. करितां ज्ञानाला व अज्ञानस्वरूप क्रोधादिकाला आधारआधेयभाव नाहीं.

दृष्टांत:—जसें आकाश द्रव्य एकच आहे. असें आपल्या बुद्धीमध्यें स्थापन करावें आणि आतां आधेयभावाची कल्पना करावी. तेव्हां आकाशाशिवाय अन्य द्रव्याचा अधिकाररूप आरोपणाचा—स्थापनेचा निरोध झाला म्हणून बुद्धीच्या पृथक् आधाराची अपेक्षा राहिली नाहीं. आणि जर आधाराची अपेक्षा राहिली नाहीं तर बुद्धींत हेंच ठरलें कीं, आकाश आहे. तें एकच द्रव्य आहे. आणि तें आकाशांत प्रतिष्ठित आहे. आकाशास आधार—अन्यद्रव्य नाहीं आपण आपल्याच आधारावर आहे. अशी भावना करणाराला अन्यास अन्याचा आधारआधेयभाव

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिसत नाहीं. तसेंच—जेव्हां एक ज्ञानाला आपल्या बुद्धीमध्यें स्थापन करून आधारआधेयभावाची कल्पना केली तेव्हां अन्यद्रव्याचा अधिरोपण करण्याचा निरोध झाला. करितां बुद्धीच्या पृथक् आधाराची अपेक्षा राहिली नाहीं. आणि भिन्न आधाराची अपेक्षाही बुद्धींत राहिली नाहीं. तेव्हां एक ज्ञानच ज्ञानामध्यें प्रतिष्ठित आहे असें ठरलें. यामुळें अशी भावना करणाराला अन्याचा अन्यास आधार आधेय भाव आहे असें दिसत नाहीं. करितां ज्ञान आहे तें ज्ञानमध्येंच आहे. आणि क्रोधादिक आहे तें क्रोधादिकांतच आहेत. असें ज्ञानाचे. क्रोधादिकाचे आणि नोकर्मांचे भेद करणारे भेदज्ञान आहे. हें सिद्ध झालें.

भावार्थ—उपयोग आहे. तो चेतनाचें परिणमनज्ञानस्वरूप आहे. आणि क्रोधादिक भावकर्म, ज्ञानावरणादिक द्रव्यकर्म आणि शरीरादिक नोकर्म हें सर्व पुद्गलद्रव्याचें परिणाम—जड आहेत. ह्यांचें आणि ज्ञानाचें प्रदेशभेद आहेत. करितां ह्या उभ-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यतांत [जमीनआसमानचा] अत्यंत भेद आहे म्हणजे उपयोगांत क्रोधादिक भावकर्म नोकर्म नाहींत आणि क्रोधादिकांत कर्मांत उपयोग नाहीं. ह्याप्रमाणें ह्यांच्यात परमार्थ स्वरूप आधारआधेयभावं नाहीं. आपलें आपलें आधार व आधेय भाव आप आपल्यांत आहेत. असा भेद जाणणें त्यालाच भेद विज्ञान म्हणतात हें उत्तम प्रकारें सिद्ध झालें

॥ दोहा ॥

परमातम अर जगतका, बडो भेद सुणसार ।
धर्मदास औरु लिखै, वाच करो निरधार ॥ १ ॥
जैसे सूरज विखैं तम, नहीं नहीं सुणबीर ।
तैसे ही तमके विखै, सूरज नहीं रे धीर ॥ २ ॥
प्रकास सूर्य एक है, जड चेतन नहिं एक ।
धर्मदास साची लिखे, मनमें धारि विवेक ॥ ३ ॥

८ स्पर्श, ५ वर्ण, ५ रस, २ गंध ह्यांत आत्मा नाहीं करितां हें स्पर्शादिक पुद्गल अचेतन–जड आहेत म्हणून आत्म्यांत आणि अचेतन–पुद्गलांत भेद आहे. तसेंच शब्द, सूक्ष्म, स्थूल, संस्थान, भेद,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तम, छाया, आताप, आणि उद्योत हेंही आत्मा नव्हें. हें शब्द बंधादिक पुद्गलांचे पर्याय आहे. करितां आत्म्यांत आणि शब्द बंधादिकांत भेद आहे. तन, मन, धन आणि वचन हेंही आत्मा नव्हें.

॥ दोहा ॥

तनता मनता वचनता, जडता जडसै मेल ।
लघुता गुरुता गमनता, येह अजीवका खेल॥१॥

आत्मा अजीव नव्हे. करितां आत्म्याला आणि तन मनादिकांत भेद आहे. जसें—सूर्याला आणि अमावश्याचें मध्यरात्रीच्या अंधकाराला अत्यंत भेद आहे. तसेंच आत्म्याला व अनात्म्याला भेद आहे. तनमन धन वचन कांहीं पृथक् चीज आहे व आत्मा कांहीं और चीज आहे. तूं, मी, हें, तें, हं हं सोहं ही कांहीं और चीज आहे आणि आत्मा कांहीं और चीज आहे. लोक, अलोक, जोग, जुगत, जगत, बंध, मोक्ष, पाप, पुण्य कुल और चीज आहे आणि आत्मा कांहीं और चीज आहे. जैन, वैष्णव, शिव, बौद्ध, नैयायिक, मीमांसकादि कांहीं और चीज

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे आणि आत्मा और चीज आहे तेरापंथ, वीसपंथ, गुमानपंथ, नानकपंथ, दादूपंथ, कबीरपंथ हें सर्व पृथ्वीच्या पाठीवर आहेत ती पृथ्वी और आहे आ–णि आत्मा और आहे. हें सर्व मतवाले ज्या मदास पिऊन मत्त झालें आहेत. तो मद और आहे. आणि आत्मा और आहे.

दोहा–भेदज्ञानतैं भ्रम गयो, नहीं रही कुछ आ-स। धर्मदास क्षुल्लक लिखैं, अब तोड मोहकी पास ॥ १ ॥

इति संपूर्ण ।

ॐ नमः सिद्धेभ्यः ।

सिद्धवस्तुवचोभक्त्या सिद्धान् प्रणमतःसदा ।
सिद्धकार्यात् शिवं प्राप्ताःसिद्धिं ददतु नोऽन्ययाम्।

मला श्रीगुरूच्या द्वारें उपदेश मिळाल्यामुळें व काललब्धि प्राप्त झाली ह्या मुळें असा निश्चय झा-ला कीं, मी तन धन मन वचन नव्हें. आणि तन, मन, धन, वचनाची जितकी रचना–चेष्टा आहे तो मी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नव्हें. पूर्वी बहिरात्मदशांत होतो तेव्हां तन, मन, धन, वचनास अग्निउष्णताप्रमाणें माझें मानीत होतो. आतां, गुरूच्या उपदेशद्वारें मला निश्चय झाला जसें—अंधारांत प्रकाश नाहीं. तसें तन मन वचनांत ज्ञान नाहीं. जसें— जल भरलेल्या कलशांत सूर्याचें प्रतिबिंब दिसतें. परन्तु भेदज्ञान झालें आहे त्याला सूर्य आकाशांत दिसतो-तसेंच मी ह्या घटांत देहरूपी शरीरांत झालो नाहीं.

येथें केवलज्ञानयुक्त वस्तु आहे. त्यांत व्याप्तपणाचा अव्याप्तपणाचा गुण आहे. विशेष असें आहे कीं, परवस्तु जें-तन मन वचन जगतरूप संसारांत ज्ञानवस्तु व्याप्त आहे. परन्तु तनमनवचनादिकांत तत्स्वरूप होत नाहीं. कां म्हणाल तर आकाशवत् अलिप्त आहे. उदाहरण कलस—फुटला म्हणजें कलशांतील सूर्य आकाशांतील सूर्यास जाऊन मिळतो.

भावार्थः—ज्याची वस्तु त्यांस जाऊन मिळतें—जातीस जात मिळतें सूर्यप्रतिबिंबाच्या दृष्टांतद्वारें मला असा निश्चय झाला कीं, तीन लोकाच्यावर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असलेला केवलज्ञानस्वरूपी स्वयंसिद्ध परमात्मा ह्या देहरूपी घटामध्यें मी आहे. तो सिद्धपरमात्मा पासून भिन्न नाहीं.

जसें—घागरी मध्यें सूर्याचें प्रतिबिंब आहे. तें सूर्या पासून भिन्न नाहीं.तसेंच मी स्वयंसिद्धपरमात्मा पासून भिन्न नाहीं. जसा सिद्ध आहे. जसें सोन्याच्या कडयातील सोनें आणि अंगठीतील सोनें भिन्न नाहीं. तसें, पुनःजसें सूर्य आणि सूर्याचा प्रकाश भिन्न नाहीं. तसेंच सिद्ध आणि मी भिन्न नाहीं. तो सिद्ध ही अजीव नाहीं.आणि मी अजीव नाहीं. जीव आहे तो सिद्धही स्वयंसिद्ध आहे आणि मी जीवही स्वयंसिद्ध आहे. अंधार सूर्याचा कर्ता हर्ता नाहीं, आणि सूर्य ही अंधराचा कर्ता हर्ता नाहीं. तसेंच जीवाचा कर्ता हर्ता अजीव नाहीं जीवाचा आणि अजीवाचा परस्पर विरोध आहे, प्रदेशभेद आहे, लक्षणभेद आहे निश्चयानें कोणी कोणाचा कर्ता हर्ता नाहीं. जीव व अजीव जो एक मानतो व एक जाणतो. तो बहिरात्मा—मिथ्यादृष्टी आहे. आणि त्या बहिरात्म्याला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जेव्हां असा निश्चय होईल कीं, जीव व अजीव हे केव्हां ही एक झाले नाहींत व केव्हांही एक होणार नाहींत तो अंतरात्मा आहे. आतां मी देहरूपी घटांत बसून देहापासून सर्वथा भिन्न असा जो सिद्ध आहे त्याच्या गुणाचें वर्णन करतो. जसें सिद्ध आणि सिद्धाचें गुण आहेत. तसेंच माझेही आहेत-परंतु माझे न सांगता सिद्धाचें गुण वर्णन करतो. सिद्धाच्या गुणाची महिमा सांगतो. अनंत आकाशांत लोक व अलोक आहे त्यांत चोहींकडे ज्याचें ज्ञान व्यापक झाले आहे. निद्रा, आलस, भय, भ्रांति, राग, द्वेष, पीडा, संशय वगैरह सर्व दोष रहित आहे. क्षुधा, तृषा खेद, मद, उन्माद. मूर्छा, मत्सरभाव वर्जित आहे. वृद्धि व हानि रहित आहे. कल्पना रहित आहे वैभव ज्याचें, निःकलंक—शरिररहित आहे इंद्रियरहित व मन जनित विकल्परहित आहे. ज्यास नवीनकर्माचा उत्पाद नाहीं. निरंजन आहे. अनंतवीर्य युक्त आहे. नित्य आनंद युक्त सुखी आहे परमपदांत राहणारा व परमज्योति आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञानप्रकाशरूप आहे, परिपूर्ण आहे, सनातन आहे, नित्य आहे, संसारचेष्टा रहित आहे, कृतकृत्य आहे, अचल आहे, अप्रदेशी आहे. तृप्त आहे. तृष्णारहित आहे, लोक शिखरावर तिष्ठत आहे, गमनागमन नाहीं, उपमारहित आहे, तीन लोकांत उपमा देण्यासारखा पदार्थच नाहीं. तर त्यास उपमा कशाची द्यावी. उपमानोपमेयभाव आपला आपण आहे. जसें कालाचा व आकाशाचा अंत नाहीं. तसें सिद्धपरमेष्ठीच्या गुणांचा अंत नाहीं. आकाश, मेघ, सूर्य, धरणेंद्र, चंद्र, मेरु, पृथ्वी, अग्नि पवन, समुद्र, कल्पवृक्ष ह्या सर्व पदार्थांच्या गुणांचा समूह एके ठिकाणीं केला तरी सिद्धपरमेष्ठीच्या गुणांचा पासंग ही लागणार नाहीं, सिद्धाचे गुण वचनातीत आहेत. अनंत ज्ञान युक्त आहे. वैभव युक्त आहे. सर्वज्ञ गोचर आहे. परन्तु हें विशेष आहे. सर्वज्ञ सिद्धपरमेष्ठीच्या गुणास जाणतात तथापि वचनानें सांगता येत नाहींत, त्यागुणांचा अंत लागत नाहीं, वचनाची संख्या अल्प आहे आणि सिद्ध

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परमेष्ठींच्या गुणांची संख्या अनंत आहे. तो सिद्ध परमेष्ठी देव आहे. त्रैलोक्य तिलक आहे. समस्त विषय रहित आहे, निर्द्वंद्व आहे, प्रतिपक्षी रहित आहे, नित्य अविनाशी आहे, अतींद्रिय स्वाद स्वरूप आहे, स्वभावानेंच उत्पन्न झाल्या आहे,पराधीन नाहीं, छेदराहित आहे. शोभायमान आहे. ज्ञान आणि सुखामृत भोगीत तीन लोकाच्या अग्रभागी विराजमान आहे. दर्शन, ज्ञान, सुख, ह्या तीन रत्नांनी परिपूर्ण आहे. संसाररूप अंधकार दूर करून सूर्यवत् प्रकाशमान आहेत, आणि अप्रतिहत आहे महिमा ज्याची, विकल्परहित निरंतर आनंदाचे स्थान आहे. असा भगवान् सिद्ध परमेष्ठी शाश्वत मोक्षस्थानांत विराजमान आहे. इति ॥

हे भगवन् ! सिद्धपरमेष्ठी परमात्मा माझी विनंती श्रवण कर, जसें—घागरीत आकाश दिसते ते महाकाशाच्या पृथक् नाहीं तसेंच-मी ह्या देहरूपी घागरींत आहे परन्तु हे प्रभु परमात्मा सिद्धपरमेष्ठी तुमच्यापासून मी पृथक् नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

देहांत मी आहे परंतु जसा देह आहे. तसा मी नाहीं आणि जसा मी आहे. तसा देह नाहीं. देहाला मी जाणतो परंतु देह मला जाणत नाहीं. आणि देह मला जाणत नाहीं तर देहधर्म जन्म, मरण, नांव वगैरे हे ही मला जाणत नाहींत. आणि ज्या वस्तूमध्यें देह झाला ती वस्तु ही मला जाणत नाहीं. तसेंच ज्या वस्तूपासून ह्या देहाचा नाश होऊन परमाणूरूपानें पृथ्वी आकाशादिकांत मिळून पसरेल ती वस्तु ही मला जाणत नाहीं. जेथें अज्ञानाचा अधिकार आहे त्याच्यावर ज्ञानाचा अधिकार संभवतो. आणि जेथें केवलज्ञानाचा अधिकार आहे त्याच्यावर कोणाचाही अधिकार संभवत नाहीं. आणि निश्चयानें सूर्यास अंधकार ठाऊक नाहीं व अंधकारास सूर्य ठाउक नाहीं. तसेंच निश्चयानें हे प्रभु परमात्मा तूं केवलज्ञानरूपी सूर्य आहेस. तुला हे जगत संसार जाणीत नाहीं. आणि तूं ह्या मिथ्या भ्रमजाळ्यानें भरलेल्या संसारास कसे जाणशील. जसें ज्येष्ठ महिन्यातील मध्यान्हीच्या सूर्यासमोर अमावस्याच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मध्यरात्रीचा अंधार नाहीं. तसेंच हे परमात्मा सिद्ध परमेष्ठी तुझ्या समोर जगत संसार नाहीं. जसें आ-काशांत सूर्य आहे त्याचें प्रतिबिंब पाण्यानें भरले-ल्या घागरीत दिसते. तसेंच तूं तीन लोकावर केवल-ज्ञानस्वरूपी सूर्य आहेस. तुझेंच प्रतिबिंब ज्ञानस्वरू-पी मी ह्या देहरूपी घागरींत आहे. तो निश्चयानें तुझ्याहून अलग भिन्न नाहीं. आतां जरी तुझा वि-चार—चिंतवन—ध्यान करीत नाहीं. तरी ही, सोहं सोहं सोहं ह्या करितां ह्या देहरूपी घटांत वर स्वा-स जातो आणि पुनः खाली स्वास येतो व पूर्ववत् पुनः वर स्वास जातो. हेंच सोहं सोहं आहे ते न क-रतां तुझें जाप ध्यान आहे.

इत्यलम् ॥

ॐ नमः सिद्धेभ्यः।

अथ मनन प्रारंभ ॥

जसें— अग्नीमध्यें उष्णतेचा गुण आहे. तसेंच ज्या वस्तूमध्यें ज्ञानगुण आहे.तेंच मी होय जें स्थू-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ल व सूक्ष्म पुद्गल आहे. तें मी नव्हे.
जसें–सूर्य तो अंधार नाहीं आणि अंधार तो सूर्य ही पण नाहीं. तसेंच–केवलज्ञानी लोकालोक नाहीं. तोंच मी केवलज्ञानी आहे.अज्ञानी अजीव अचेतन मूळापासून नाहीं, न कोणी माझी निंदा करीत आहे व न कोणी माझी पूजा स्तुति करीत आहे. निंदा, पूजा आणि स्तुति देहाची व नांवाची आहे मी देह आणि नावही नव्हें. कां म्हणाल तर देहाला मी जाणतो परंतु देह मला जाणीत नाहीं. जन्म, मरण, नांव वगैरे बालपणा, तरुणपणा, वृद्धपणा, स्त्री, पुरुष आणि नपुंसकादिक हें देहाचे आहेत तेंच मीं देह नाहीं आणि देहास जाणतो परंतु देह मला जाणीत नाहीं. देह मला जाणत नाहीं तर देहांत जितके राग, द्वेष, संकल्प, विकल्प, क्रोध, मान, माया, लोभादिक आहेत.तेंही मला जाणत नाहींत. जें जें पाहाण्यांत येतें तें सर्व ज्ञेय आहे. आणि त्यांस जाणणारा मी ज्ञान आहे. मी ज्ञानस्वरूपी आहे अन्य प्रकार नाहीं. पांच इंद्रियें आणि पांच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

इंद्रियांचे जितके विषय आहेत त्यांस मी जाणतो परंतु ते मला जाणीत नाहींत. करितां मी कोणा-बरोबर वचनालाप करूं. भावार्थ—मूर्तीक पदार्थ आहेत तें तर इंद्रियांनीं ग्रहण करण्यासयोग्य आहेत तें जड आहेत. जड वस्तूंत पाहण्याचा जाणण्याचा गुण नाहीं ह्या करितां जड कांहीं जाणत नाहीं. आणि मी ज्ञानमूर्ति आहे. ते जितके मूर्तिक (आ-कार)वस्तु पदार्थ आहेत त्यापासून मी भिन्न आहे. तें पांच इंद्रिय आणि त्या पांच इंद्रियाचे विषय मला ग्रहण नाहींत करीत आणि मला जाणतही नाहींत करितां मी परस्पर वार्तालाप कोणाबरोबर करूं. मला आदि नाहीं, मला अंत नाहीं, मला मध्य नाहीं, मला बंध नाहीं व मुक्ति ही नाहीं.

कां म्हणाल तर, वस्तूच्या स्वभावांत बंध व मुक्तपणा संभवत नाहीं. जसें—सूर्य आपला प्रकाश स्वभा-वास सोडीत नाहीं ग्रहण ही करीत नाहीं. तसें स-मजावें.

मी जंत्र तंत्र मंत्र नाहीं, कां कीं, हें अचेतन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहेत. आणि मी चेतन आहे. चेतन व अचेतना-चा मेळ सूर्यप्रकाशाप्रमाणें नाहीं चेतन व अचेतन ह्या दोहोंत इतका अंतर आहे कीं सूर्य आणि अंधारात जितका अंतर आहे, तितका. 'अहं' आहे तो मी नव्हें परन्तु अहं (मी) म्हटल्यावाचून व्यवहार चालत नाहीं. दोहोंत अहंपदद्वारा माझा मला आणि माझ्यांत अनुभव होतो.लोक मला संबोधतात—समजावतात आणि मी लोकांला संबोध देतो व समजावितो असे हें दोन्हीं भाव भ्रमाचे घर आहे करितां मी तर पाप पुण्यापासून सर्वप्रकारें दूर आहे. कां कीं, अजीव—अचेतन जडवस्तू मध्यें मूळापासून ज्ञानगुणाचा लेश नाहीं.

आणि जीव— चेतनांत ज्ञानगुण असा भरला—एकवटला आहे कीं, जसें अग्नींत उष्णता अथवा सूर्यांत प्रकाश एकवटला आहे. करितां समजणें हें दोन्ही भ्रमाचें घर आहे. जसें—सूर्यापासून अंधार दूर आहे. तसें—माझ्यापासून जितके पदार्थ दूर आहेत त्यांना मी ग्रहण करूं.जसें सूर्यापासून प्रकाश दूर नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तसें माझ्यासून जीव चेतना ज्ञानादिगुण भिन्न नाहींत. त्यास मी काय त्यागूं व काय ग्रहण करूं. एक आपल्यास जाणणें योग्य आहे, आतां मी कोणाशी देण्याघेण्याचा व्यवहार करूं. शरीर तर मूळचेंच अशुद्ध आहे. ते केव्हांही शुद्ध व्हावयाचें नाहीं. आणि मी शररिास पाहणारा व जाणणारा ज्ञाता दृष्टा आहे.

जसें--शररि आहे. तसें मी नाहीं. आतां, मी कुणाला शुद्ध करूं आणि कुणाला अशुद्ध करूं. सूर्यत्तर अंधार प्रमाणें नाहीं, व अंधार सूर्याप्रामाणें नाहीं. कारितां शुद्ध अशुद्ध करणें मानणें हा भ्रम आहे.

मुडदातर जीवताला मारीत नाहीं. आणि जींवत आहे तो मुडद्याला काय मारतो. करितां मी कुणाला मारूं आणि कुणाला जगवूं. जो मारण्या जगण्याचा जसा संकल्पभाव करतो. तो तसेंच फल भोगतो. मी तर मारण्या जगण्यापासून असा दूर आहे कीं, जसें—सूर्यापासून अंधार भिन्न आहे. ही स्त्री आहे, हा पुरुष आहे, हा नपुंसक आहे, हा एक आहे,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हे दोन आहेत, हे बहुत आहेत. अशा लिंग आणि संख्याच्या बुद्धीचे घर मी नाहीं. करितां मी तर आपण आपल्याला आपणांत जाणतो.

हे तन मन धन शरीरादिक माझ्या ज्ञानस्वरूपाला जाणत नाहीं व पाहातही नाहीं. ह्या करितां न कोणी माझा मित्र आहे. न कोणी माझा शत्रू आहे. आणि जसा मी ज्ञाता दृष्टा आहे तसाच कोणी माझ्या सारखा दुसरा असेल, तोही माझा मित्र नाहीं, आणि तोही माझा शत्रू नाहीं सूर्याचा सूर्याशीं न विरोध न मित्रता. कमीपणांत व ज्यास्तपणांत विरोधतादिकाचा संभव आहे. ज्या वस्तूपासून परमात्मप्रकाशस्वरूप ज्ञानज्योतीचा मला शोध लागला तो तर मीच आहे. कां कीं, जसें सूर्याच्या प्रकाशानें सूर्य दिसतो. तसेंच परमात्म्याच्या प्रकाशानें परमात्मा दिसतो. हा माझा निश्चय आहे. जसा मी आहे. तसा दुसरा नाहीं. आणि जसा दुसरा कोणी आहे. तसा मी नाहीं. जसा सूर्य आहे तसा अंधार नाहीं. आणि जसा अंधार आहे तसा सूर्य

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीं. जसें—अंधाराच्या अपेक्षेनें प्राकाश आहे. आणि प्रकाशाच्या अपेक्षेनें अंधार आहे. तसेंच बंधाच्या अपेक्षेनें मोक्ष आहे आणि मोक्षाच्या अपेक्षेनें बंध आहे. अपेक्षा रहित केवलज्ञानस्वरूपी परमात्मास पाहिले तर न बंध आहे न मोक्ष आहे.

जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल ही सहा द्रव्यें आहेत. त्या सहाची सात होत नाहींत, व पांच होत नाहींत आणि होणार नाहींत व झाली ही नाहींत. हयास्तव बंध व मोक्ष हें भ्रम च आहे. मी तर बंध मोक्षापासून सर्व प्रकारें भिन्न आहे. कोणी परिविद्या पदारूढ नांवाचा पंडित बंध मुक्त मानीत असेल तर मानू दे. मी तर अमूर्तिक—निराकार मूळापासुन आहे मला केव्हां ही कदाचित् बंध मोक्ष नाहीं. मी सर्वांची नांवें सांगणारा आहे तरीपण मला नांव नाहीं. मी काय सांगू अर्थात् जितकी नांवें आहेत तितकी आकार निराकार वस्तूची आहेत. आणि मी आकार निराकारापासून सर्वथा भिन्न आहे. सद्गुरूच्या उपदेशद्वारा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असा निश्चय झाला आहे की, तन,मन,धन, वचन लोकालोक आणि लोकालोकांत जितके पदार्थ आहेत तें मी नव्हें.ह्या शिवाय बाकी जे आहे तेंच मी होय. जसें सिद्ध आत्माचें स्वरूप आहे. तसेंच मी परमात्मा परमेश्वर स्वरूप आहे.बोलण्यांत सांगण्यांत मात्र सिद्ध आणि मी असे दोन भेद आहेत.निश्चयदृष्टींनें सिद्ध आणि मी अभेद वस्तु आहे.जसें--सोने आणि सोन्याचें कडे हे बोलण्यांत मात्र दोन भेद आहेत परंतु दोन्हीं सोन्यापासून निराळा कांहीं पदार्थ नाहीं ह्या करितां मी कोणाची उपासना-भक्ति करूं आणि माझी कोणी उपासना भक्ति करावी. जसें सूर्यापासून अंधार भिन्न आहे. तसेंच माझ्या पासून कोणी ही भिन्न आहे. त्यांचें मी काय नाम स्मरण करूं. आणि जसें सूर्य व प्रकाश भिन्न नाहीं. तसेंच माझ्या पासून कोणी भिन्न नाहीं. तर त्याचे तरी नांव काय स्मरण करूं. आणि जर मी आत्मा आहे तर पर वस्तु ग्रहण करण्याचे कारण नाहीं. करितां मला परक्यास संबोधन करण्याचा उद्यम आहे.तो वृथा आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आत्मा आत्म्याकडून जाणला जातो. परक्याचे सांगणें व ऐकणें निमित्त—कारण मात्र आहे करितां ह्यांत आग्रह करणें वृथा आहे. कां कीं, जो तन,-मन, धन, वचनापासून सर्वथा भिन्न आहे. तर त्यास कोणी समजवावें. तन, मन, धन, वचनाचा आणि शुद्ध परमात्माचा सूर्य व अंधार इतका अंतर आहे-न तो त्याला मिळतो-न तो त्याला मिळतो.जो ज्यापासून पृथक आहे तो त्यापासून पृथक आहे.

कवित्त—

लालवस्त्र पहरेसे देह तो न लाल होय,
लालदेह भये हंस लाल तो नं मानिये ।
वस्त्रके पुराणा भये देह न पुराणी होय,
देह पुराणी भये हंस जीरण न जानिये ॥
वस्त्रके नाश कछु देहको न नाश होय,
देह नाश भये हंस नास न वखानिये ।
देह सर्व पुद्गलकी चिदानंद ज्ञानमई,
दोहूं भिन्न भिन्नरूप भया उर आनिये ॥१॥

जसें—ज्या घरास आग लागेल तर तें जळेल.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परन्तु घरांत व घरांच्या बाहेर जे आकाश आहे ते-तर भस्मीभूत—जळणार नाहीं, तसेंच मी ज्ञानस्वरूपी परत्मामा आहे तो देहांत व देहाच्या बाहेर पाहणारा व जाणनारा आहे. करितां त्या देहाचा नाश झाला तरी माझा नाश झाला नाहीं आणि होणार ही नाहीं. मला जात नाहीं तर माझे जन्म मरण कोठून होणार ? मी प्राण नव्हें. तर मला क्षुधा तृषा कोठून होणार ? मी चित्त नव्हे. तर मला शोक, मोह कोठून होणार ? मी अजीव—अचेतन वस्तूचा कर्ता नाहीं. तर मला बंध व मोक्ष कोठून होणार ? मला मरणच नाहीं, तर भय कोठून होणार ? मला रोग नाहीं तर दुःख कोठून होणार ?

मी बालक नाहीं, मी तरुण नाहीं आणि मी वृद्धही नाहीं करितां हे बालपण वगैरे पुद्गलाचें आहे. माझे नव्हें.

मी मूळापासून नाहीं. परन्तु न होण्यास्तव मी होऊन माझा अनुभव ज्ञान आहे. तें तन, मन, धन वचनातींत आहे त्याची स्वभावना भावतो. माझा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हा उपकार आहे तो माझ्या द्वारा माझे मनन प्रत्यक्ष आहे. तें होत आहे. मी ओह त्यांस अर्हत पदांत लावावें. आणि मीच्या प्रथम अंत आणि मध्यांत आहे त्यास सिद्ध पद लावावें.

नव तत्वरूपी मी अरूपी महाधाम आहे.

श्लोक

साकारंच निराकारं सरसं विरसं परम् ।
परंपरैः परातीतं परंपरपरापरम् ॥ १ ॥

चिंतवन, विचार, भाव, संकल्प, विकल्प, तन, मन, धन, आणि वचन ह्यापासून जो सर्वथा भिन्न आहे तो सोहं [मी] शरीर आणि शरीराच्या आंत व बाहेर आकाशादिक आहे. त्यापासून मी असा पृथक आहे. जसे सूर्यापासून अंधार पृथक आहे.

दोहा

तनता मनता वचनता, जडता जडसैं मेल ।
लघुता गुरुता गमनता, येह अजीवका खेल ॥ १ ॥

तेच अजीव व अजीवाचा खेळ, मी मुळापासून नाहीं. मी तर अजीव व अजीवाच्या खेळापासून अ—

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्मा पृथक आहे कीं, जसें—अंधारापासून सूर्य पृथक आहे. जन्म, मरण आणि नांव वगैरे आहे तें देहाचे आहे, माझें नव्हें. क्षीणपणा, पुष्टपणा ही शरीराचा आहे, माझा नव्हें. संकल्प, विकल्प, हर्ष, शोक, राग, द्वेष, सुख, दुःख हें मनाचें आहे, माझें नव्हें.

वचनादिक अजीवाचेच आहे माझें नव्हें, अजीवाचा मेळ अजीवाशीच आहे. लघु, गुरु, गमनादिक हा अजीवाचा खेळ आहे. माझा नव्हें.

जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल ही सहा द्रव्यें आहेत—त्यांत प्रथम जीव द्रव्य आहे. बाकी पांच अजीव आहेत. जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा आणि मोक्ष. ही सात तत्वें आहेत—त्यांत प्रथम तत्व जीव आहे. बाकी सहा अजीव आहेत. जीवाचा व अजीवाचा सूर्य व अंधार ह्याप्रमाणें अंतर आहे. अजीववस्तु जीवास जाणींत नाहीं व पाहातही नाहीं. जीवांत पाहण्याची व जाणण्याची शक्ति आहे. जसें—

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सूर्यामध्यें प्रकाशादिकाची शक्ति आहे.तशी शक्तीला व व्यक्तीला सूर्यप्रकाशाप्रमाणें मेळ आहे. जसें-जें द्रव्य तसेंच त्याचें गुण व पर्याय आहे.

'हम न किसीका कोई न हमारा' ह्या निश्चयानें पहा. जितके पाहाण्यांत येत आहे. व ऐकण्यांत येत आहे. तें सर्व स्वप्नाप्रमाणें नाशवंत आहे. आणि मी जाग्रत, स्वप्न, सुषुप्ती आणि तुर्या ह्या चार अवस्थेपासून सर्वथा पृथक् आहे. तसेंच तन, मन, धन आणि वचनाची रचना वगैरे जें मला दिसत आहे तें सर्व मृगजलवत् किंवा आकाशातील मेघढगाप्रमाणें क्षण--भंगुर दिसत आहे.

परमात्म्यामध्यें व आपल्या स्वतःच्या आत्म्यामध्यें जो भेद मानतो. तो मूर्ख-बहिरात्मा आहे.

जसें—सूर्य हा अंधार नव्हें व अंधार हा सूर्य नव्हें,तसेंच परमात्मा हा लोकालोक नव्हे व लोकालोक हा परमात्मा नव्हें.जसें—अग्नीपासूनउष्णता पृथक् नाहीं. तसेंच माझ्या आत्मस्वरूपापासून ज्ञान पृथक् नाहीं. जसें— जिथपर्यंत दूध पसरले आहे. तिथ-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पर्यंत घृत--तूप आहे. तसेंच जिथपर्यंत लोकालोक पसरलेला आहे.तिथपर्यंत माझ्या केवळ ज्ञान गुणा-चा प्रकाश पसरला आहे.

जसें—सूर्याचा प्रकाश सर्व पृथ्वीवर फैलावतो. तसें, जसें- सूर्यापासून अंधारीरात्र पृथक् आहे. तसेंच माझ्या स्वरूपाहून पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर चारी दिशा, चार कोणें, आकाश आणि पाताळ वगैरे सर्व भिन्न आहे.दहा दिशा व त्यांच्या आंत जितकी रचना आहे ती कांहीं और आणि मी और आहे-अनोखी, अनुपम, अपूर्व, अव्यंत, आणि अनाम-वस्तु आहे.

मंत्र,तंत्र, जंत्र, तन, मन, धन आणि वचन ह्या सर्व वस्तु अचेतन आहेत.जसें सूर्य अंधारांत नाहीं. तसेंच अचेतनवस्तूंत ज्ञानगुण नाहीं. मी, तूं,हें, तें, आणि तन, मन, धन, वचनादिकावाचून जे पृथक् आहे. तेंच 'सोहं' होय हा सोहं सांगण्यांत आला म्हणून शब्द झाला परंतु सोहं शब्द नव्हें.शब्द अ-चेतन. पुद्गल आहे. व पुद्गलांत ज्ञानगुण नसतो. हें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

समजुन ध्यावें सोहं शब्द आहे तो निराळा आहे. आणि शब्दातीत सोहं द्वारा जो अनुभव येतो तो सोहं कांहीं निराळा आहे. विस्तव चुलींत आहे येवढें तोंडांत शब्द बोलल्यानें विस्तव तोंडांत येत नाहीं. ज्यास विस्तवाची गरज आहे. तो जर तोंडांत विस्तव पाहूं लागला तर त्यास काय विस्तव मिळेल? कदापी मिळणार नाहीं. तसेंच केवलज्ञान स्वरूप ही वस्तु कोणाच्या वचनांत नाहीं. कारण ज्ञानही वस्तु कांहीं वचन नव्हे.—पद्मनंदी आचार्यांनी पद्मनंदी पंच—विंशतिका मध्यें सांगितले आहे.

मनसोऽचिंत्यं वाचामगोचरं यन्महस्तनोर्भिन्नम् ॥

अर्थ—केवलज्ञान स्वरूपी परंज्योति परमात्मा म्हणून जी वस्तु आहे. त्याचे मनानें विचार—चिंतवन करतां येत नाहीं, वचनानें सांगता येत नाहीं. व हातानें धरतां येत नाहीं अशी अपूर्व आहे.

परद्रव्य, परक्षेत्र, परकाल, आणि परभाव ह्या चातुष्टय अपक्षेनें मी नाहीं. स्वद्रव्य, स्वक्षेत्र, स्वकाल, आणि स्वभाव ह्या चतुष्टय अपेक्षेनें माझा मी आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

एकच वेळीं स्वचतुष्टय--परचतुष्टय अपेक्षेनें मी अवक्त आहे.

एकाच्या अपेक्षेनें अनेक आहे. आणि अनेकांच्या अपेक्षेनें एक आहे. इत्यादि जितके नय विवक्षा विकल्प (भेद) आहेत. तितके सर्व वाद विवाद आहेत. आणि जितके वाद विवाद आहेत तितके सर्व मिथ्यात्व आहे. करितां स्थिररूप स्वरूपवस्तूचा तर असा निश्चय आहे–

तन, मन, धन, वचन ही निराळी वस्तु आहे. आणि ह्यांच्या सर्वथा भिन्न 'सोहं' आहे. हे माझे खरें ज्ञान असेंच आहे. जीव व अजीव ह्या दोन वस्तूंचा हा सर्व खेळ आहे. जीवाच्या अपेक्षेनें अजीव आहे व अजीवाच्या अपेक्षेनें जीव आहे अपेक्षा रहित वस्तूस पाहिले तर न जीव आहे, न अजीव आहे. वस्तु आपल्या स्वभावाला अनुसरून जसी आहे. तसीच आहे.

दोहा

वस्तु विचारत ध्यावतैं, मनपावै विसराम ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रस स्वादत सुख ऊपजैं, अनुभव ताको नाम।१
कहना सुनना देखना, और बोलना बात।
यें सबही संसारमैं, तूं साच मानलै भ्रात ॥२॥
समझायो समझै नहीं, अब क्या कहना सार।
धर्मदास क्षुल्लक लियो, सर्व जगत्‌को पार ॥३॥

विसराम संतोष पूर्ण

इत्यलम्

मी आहे. तो शब्द आहे. तो शब्द अचेतन अजीव आहे. ह्यास्तव मी मूळापासूनच नाहीं. परन्तु 'मी' च्या द्वारें माझे मनन—अनुभव होतो. ह्या करितां न असणारा मी होऊन माझे मनन मी करतो.

'मी' आंत नाहीं, बाहीर नाहीं, दिशा विदिशा—मध्यें नाहीं, लोक अलोकांत नाहीं, सूक्ष्म—स्थूलांत नाहीं, स्त्री, पुरुष, नपुंसक नाहीं, लहान, मोठा नाहीं. हलका भारी नाहीं, मला नांव नाहीं, अनांव नाहीं, मी मंत्र तंत्र जंत्र गुप्त प्रगट मूर्ति अमूर्ति नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अमूर्तिक तर धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य,आकाशद्रव्य आणि कालद्रव्य आहे, तें अजीव—अचेतन आहे आणि मूर्तिक एक पुद्गल द्रव्य आहे तेंही अजीव—अचेतन आहे.

मी कर्म नव्हें, मी बंध—मुक्त नाहीं, मी शुद्ध—अशुद्ध नाहीं, मी सिद्ध—असिद्ध नाहीं, मी आदि—अंत मध्य नाहीं, मी पर नाहीं, मी शून्य—अशून्य नाहीं, मी वस्तु-—अवस्तु नाहीं, मी अस्ति—नास्ति नाहीं, मी स्त्री,पुरुष, नपुंसक नाहीं, वचनापासून आणि मौन्याहून मी भिन्न आहे विधि——निषेधापासून सर्वथा मी भिन्न आहे.लोका—लोकापासून मी भिन्न आहे. षट्द्रव्यापासून मी भिन्न आहे.

मी जीव-अजीव नाहीं,मी चेतन—अचेतन नाहीं मी भाव,अभाव नाहीं,मी पंडित--मूर्ख नाहीं,मी धनवान नाहीं,आणि मी-दरिद्री ही नाहीं,मी-गुरु शिष्य नाहीं मी ज्ञानी-अज्ञानी नाहीं.बाल,वृद्ध,तरुण नाहीं.आदि अंत मध्यापासून सर्वथा भिन्न आहे.दिसत आहे व दिसत नाहीं.ते जाग्रत अवस्थेंत स्वप्नावस्थेंत जितकी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रचना वस्तु मला दिसती ती सर्व रचना माझ्या प्रमाणें नाहीं. आणि मी ही त्यांच्या सारखा नाहीं. ती रचना वस्तु निराळीं आहे आणि मी निराळे प्रकारचा आहे. त्यांचा व माझा मेळ– एकतां सूर्यप्रकाशाप्रमाणे नाहीं. त्यांचा व माझा सूर्यअंधारा इतका अंतर आहे. पहिल्यापासून ती रचना–वस्तु आणि मी भिन्न आहे. जाग्रत अवस्थेमध्यें आणि स्वप्नावस्थेंत जो क्षुल्लक ब्रह्मचारी धर्मदास आहे. तो ही मी नव्हें. माझ्या बाहेर व आंत काहीं कांहीं रचना आहे. तो ही मी नव्हें. तें माझें जन्म मरण नांवादिक आहे. मला नांव वगैरे पहिल्यापासून नाहीं.

धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, आकाशद्रव्य, आणि कालद्रव्य ही चार द्रव्यें अमूर्तिक–निराकार निःक्रिय–स्वभावी आहेत. अचेतन—अजीव व ज्ञानलेश रहित आहेत. आणि पुद्‌गल द्रव्य ही अजीव अचेतन आहे. चेतनाचा व अचेतनाचा मेल–एक पणा अग्नीउष्णतेप्रमाणें नाहीं. कोणत्या प्रकारानें जीव व अजीवाचें तादात्म्य स्वरूप स्थापलें जात नाहीं. चेत-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाचा कर्ता हर्ता अचेतन नाहीं व अचेतनाचा कर्ता हर्ता चेतन नाहीं.जसें-सूर्य व अंधाराची एकता कधीही झाली नाहीं व कधीही होणार नाहीं.तसेंच जीव व अजीवाची एकता कधी झाली नाहीं व कधी ही होणार नाहीं. लोक अलोक व लोक अलोकाच्या आंत व बाहेर जितकी रचना वस्तु आहे. ती सर्व चेतन व अचेतन आहे. आणि मी आहे. तो लोकाकाश ही नाहीं आणि चेतन व अचेतनही नाहीं. मी आहे तो शब्द आहे आणि शब्द आहे तो अजीव--अचेतन आहे. करितां 'मी' शब्द नव्हें.

पूर्वी बहिरात्मदशामध्यें असें ऐकिलें होतें कीं, सदा जागती जोत आहे. तोच परब्रह्मपरमात्मा सिद्धपरमेष्ठी आहे. आतां श्री गुरूच्या उपदेशद्वारा मला काललब्धि प्राप्त झाली ह्यामुळें आणि स्वानुभव द्वारा माझे मला असा निश्चय झाला आहे. कीं, ज्या सदा जागती जोतीची महिमा पूर्वी बहिरात्म अवस्थेंत ऐकिली होती. तो मीच आहे. कां कीं, मी तर स्वप्नांतही जागृत जागती जोत आहे—

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जर मी झोंपी गेलो असतो तर स्वप्नाची खबर मला कशी लागली असती. स्वप्न कसें समजले असतें. माझ्या देखत निद्रा—झोंप येतें आणि जातें. ह्या करितां मला समजतें कीं— झोंप आली बाबा ! झोंप गेली बाबा. असें मी म्हणतों.

झोंपेत ज्ञानगुण नाहीं, चेतन—जीवांत ज्ञानगुण आहे. निजणाराला स्वप्न पडते जो सदाकाळ जागत आहे त्यास स्वप्न पडत नाहीं.

जागत असतो त्यासच स्वप्नाची रचना दिसतें-स्वप्न जाणतो. झोंपी गेलेल्यास स्वप्नाची रचना कशी दिसेल ? स्वप्नाची रचना जो जाणतो. तो साक्षीदाराप्रमाणें पाहणारा जाणनारा आहे. जागत्याला आणि स्वप्नाला अग्नीउष्णतेप्रमाणे एकता नाहीं. स्वप्नाची माया निराळी आहे आणि जागृत दशा निराळी आहे. जागणाराच्या संमुख स्वप्नाची माया होती आहे आणि विनाश ही पावती आहे. अशी वारंवार होती आणि वारंवार नाश पावती. आणि जागृत आहे तो तर कदापि होत नाहीं. व नाश पा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चत नाहीं. जसाचें तसा—जसाचें तसाच आहे तसा राहतो.

स्वप्नांत लिहितो, वाचतो, खातो, पीतो, बोलतो चालतो, भेतो, भय दाखवितो, मारतो, मार खातो, कामकुशलि घेणें, देणें, शुभ,अशुभ कर्मादिक करतो, करवितो, ह्या सर्वांस जागणारा जाणतो व पाहातो. आणि जागणारा आहे. तो आपणास ही जाणतो. जो जागत आहे त्याला ह्यापेक्षां जास्त आणखी काय जागावयाचें राहिलें आहे

स्वप्नात जें शुभाशुभ कर्म करतो करवितो. त्यास जो जागत आहे.तो फक्त पाहाणारा व फक्त जाणणारा आहे. ह्या वरून समजावे कीं, जागत आहे. तो स्वप्नांत न बोलत आहे.व न खात पीत आहे,न शुभाशुभ कर्म करीत आहे,न करवीत आहे. जागत आहे तो केवळ पाहाणारा व जाणणारामात्र आहे

तमाशा नाटक करणारास मजा वाटत नाहीं. परंतु जो नाटक पाहातो त्यांस वाटतें.नाचणारास मजा वाटत नाहीं. परंतु जो नाच पाहाणारास मजा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वाटते.

मी नाहीं परंतु मी अक्षराच्या द्वारे मनन करतो मी स्वप्न नाहीं. स्वप्नाची रचना नाहीं, निद्रित व जागृत नाहीं. ज्ञानाज्ञान, चेतन, अचेतन, नाहीं. द्वैत आहे तो संसार आहे.

आतां आणखी द्वैताचें स्वरूप स्पष्ट सांगतात.

उक्तंच–पद्मनंदी पंचविंशतिका श्लोक

बंधमोक्षौ रतिद्वेषौ कर्मात्मानौ शुभाशुभौ
इति द्वैताश्रिता बुद्धिरसिद्धिरभिधीयत ॥ १ ॥

अर्थ–बंध व मोक्ष, राग व द्वेष, कर्म व आत्मा शुभ व अशुभ ह्या प्रमाणें ज्याची द्वैताश्रित बुद्धि आहे. तो असिद्ध होय. आपल्या निज (आत्म) शुद्ध अद्वैत स्वरूपाला घातक आहे.

भावार्थ–बंध व मोक्ष वगैरे जितका द्वैतपणा आहे. तो सर्व संसार आहे. हा जो लोकालोक आहे व लोकालोकांत जितकी रचना दिसती आहे व न दिसणारी आहे. ती सर्व पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, आणि काल ह्या पांच द्रव्याची आहे. आणि हेंच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पर पंच आहेत. ह्या परपंचास आणि आपणांस [आत्म्यास] अग्निउष्णतें प्रमाणें एकरूप मानतो व जाणतो तो संसारी जीव आहे. आणि ज्याला असा निश्चय झाला कीं, हें पुद्गलादिक पांच द्रव्य अजीव-अचेतन-जड पदार्थ आहेत. त्यांत पुद्गल मूर्तिक व बाकी चार अमूर्तिक व अक्रिय आहेत ह्या पांच द्रव्याचा व आत्म्याचा अग्निउष्णते प्रमाणें न मेळ झाला आहे न होणार आहे. असा निश्चय ज्या जीवास झाला. तो जीव संसारी नाहीं म्हणजे मुक्त सिद्ध आहे.

सर्वच जीव सिद्ध आहेत. परन्तु जो पुद्गलादिक अजीव पांच द्रव्यास व आत्म्यास अग्नि उष्णते प्रमाणें एकरूप मानतात व जाणतात. ते तीळघाण्यांत पिळल्या प्रमाणें दुःखी संसारी जीव आहेत. आणि जे पांच द्रव्यापासून आपणास सूर्यअंधाराप्रमाणें भिन्न मानतात व भिन्न जाणतात. तें जीव आपण आपल्यांत लय होतात ह्यामुळें सदा सुखी सिद्ध आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जीव आहे तो केव्हांही अजीव नव्हे व अजीव झाला नाहीं व होणारही नाहीं. तसेंच अजीव आहे तोही केव्हां जीव नव्हे, जीव झाला नाहीं व होणारही नाहीं. जसे–अग्नि आणि उष्णपणा एकवट आहे. तसे जीव आणि ज्ञान एकवट आहे. जसें—मिठाचा खडा आणि खारटपणा एकवट आहे तसें जीव व अजीव हें मूळापासूनच भिन्न भिन्न आहेत. पाहणें व जाणेंण हा जीवाचा स्वगुण आहे. आणि अजीव वस्तूंत ज्ञान नाहीं.

स्वप्नांत दिसणारी न दिसणारी रचना, जागृत अवस्थेंत दिसणारी न दिसणारी रचना; पांच प्रकारची झोंप पांच प्रकारचें शरीर, आणि पुद्गलादिक अचेतन पांच द्रव्यें हें सर्व अजीव आहेत. कारण ह्या अजीवांत ज्ञान नाहीं. आणि जसें–सूर्य आणि प्रकाश एक आहे. तसेंच जिव आणि ज्ञान एक आहे.

भावार्थ–ज्या वस्तूंत ज्ञान आहे ती जीव वस्तु आहे. बाकी निश्चयानें सर्व अजीव आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मी अजीव नाहीं. बोलणारा व विचारणारा मी नव्हें. कोणाच्या सांगण्यांत, ऐकण्यांत, पाहण्यांत, जाणण्यांत, विचारण्यांत, चिंतवण्यांत, धरण्यांत मी आलो नाहीं. असा कोणी आहे. तो मी आहे. पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल हीं पांच द्रव्यें आहेत. ते माझे स्वरूपास पाहात नाहींत व जाणींतही नाहींत. आतां सांगा. ह्या पांच द्रव्यास सोडून माझ्या स्वरूपास कोण पाहणारा आहे व कोण जाणणारा आहे. तसेंच पाहणारा व जाणणारा असतो तो सूर्य व अंधाराप्रमाणें भिन्न नसतो. पाहणारा व जाणणारा असतो तोंच पाहतो व जाणतो च तो कर्माचा कर्ता नाहीं, सर्वांचा साक्षीदार आहे. तूं, मी, ही अक्षरें (शब्द) आहेत.

॥ दोहा ॥

तनता मनता वचनता, जडता जडसैं मेल ।
लघुता गुरुता गमनता, येह अजीवका खेल ॥ १ ॥

जीवाचें आणि अजीवाचें कोणतेंही प्रकारें लक्ष्य लक्षण स्वरूप एक नाहीं, एक होणार नाहीं, व एक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झालें नाहीं, परन्तु बहिरात्म जीवास हें कळत नाहीं, ह्या करितां तो मूढ आहे. ही गोष्ट खरी आहे. ज्याची जसी मती त्याची तसी गती. आणि ज्याची मती असी आहे कीं, मी मूळापासून जड—अजीव नाहीं व कदापि अजीव होणार ही नाहीं-तो अंतर आत्मा ज्ञानी आहे. आतां ज्ञानीचें विचार कसें असतात ते सांगतात.

मी, स्पर्श, रस, गंध. आणि वर्ण नाहीं. मी पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल नाहीं मी औदारिक, वैक्रियिक, आहारक, तैजस आणि कार्माण असा देहधारी नाहीं. मी शब्द, बंध, सूक्ष्म, स्थूल संस्थान, भेद, तम, छाया, आताप आणि उद्योत अशा पुद्गल आहे 'तो मी नव्हे'. आणि माझ्या शिवाय जें पर—अन्य आहे तें सर्व पर वस्तु आहे आणि मी (सोहं) अशा आत्मवस्तूला मोठमोठें महात्में, ऋषी, मुनि, गणधरादिक सिद्ध, परमेष्ठी, परमात्मा, परंज्योति, परमेश्वर अशी नावें घेऊन ध्यान धरतात. तो मी सिद्ध आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सिद्ध मूळापासून अजीव नाहीं. सिद्ध मूळापासून परपंच नाहीं. सिद्ध मूळापासून पुद्गल नाहीं. सिद्ध मूळापासून पुद्गलाची पर्याय नाहीं. सिद्ध मुळापासून देहधारी नाहीं. सिद्धजीव मूळापासून कर्मिष्ठ नाहीं. सिद्धजीव मूळापासून मूर्तिक नाहीं.

मला ही असाच निश्चय झाला आहे. कीं मी मूळापासून अजीव नाहीं. मी ही मूळापासून स्वयं सिद्ध–अकृत्रिम जीव आहे. षट्द्रव्यांत पांच द्रव्यें अजीव आहेत व एक जीवद्रव्य आहे. जीवद्रव्याची आणि ज्ञानगुणाची असी एकवटता झालीं आहे कीं, जसे–अग्नि आणि उष्णतेची एकवटता आहे, तशी.

पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल ही पांच द्रव्यें व ह्या पांच द्रव्याचा विलास आणि विस्तार जितका कांहीं आहे तो सर्व अजीव आहे. ह्या पांच द्रव्याला व आपणाला जो अग्नि व उष्णतेप्रामाणें एकता मानतो, एकता जाणतो. तो जीव बहिरात्मा–मिथ्यादृष्टी आहे. आणि ह्या पांच द्र-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्याला व आपणाला जो सूर्य व अंधाराप्रमाणें भिन्न मानतो. तो जीव अंतरात्मा—सम्यग्दृष्टी आहे तो सम्यग्दृष्टी निश्चयानें आपणाला जीव—आत्मा मानतो व सूर्यप्रकाशवत् पाहाणें जाणणें हा गुण अभिन्न मानतो व जाणतो तसेंच ज्याला असा निश्चय झाला आहे कीं,—ह्या अजीवादिक पांच द्रव्यांची व माझी एकता अग्नि उष्णतेप्रमाणें नाहीं. ज्ञानगुण माझ्यांत आहे. अजीवांत नाहीं. करितां अनादिकालापासून आदि, अंत, मध्यांत, अंतर्या—ह्यांत, लोकालोकांत, संसारी झालो न झालो तरी मी जशाचा तसाच ज्ञानस्वरूपी अमूर्तिक आत्मा आहे. तसाच आहे. आणि अनादिकालापासून ह्या आत्म्याच्या मागे ज्ञानावरणादिक आठ कर्में लागली आहेत. तरी पण मी ह्या कर्मस्वरूपाचा झालो नाहीं, त्या कर्मापासून ही भिन्न पृथक आहे. तसेंच आत्मा तीं कर्में ह्या दोन्हींच्या निकट संबध आहे ह्यामुळें जो विकार होत असतो. तोही माझ्यापासून भिन्न आहे. तो विकार मला चिकटला ना-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हीं व त्या विकारासारखा मी झालो नाहीं.

द्रव्य, क्षेत्र, काल, आणि भाव हेंही मज पासून पृथक् आहेत. तसेंच षट्द्रव्य आपआपल्या गुणाला व पर्यायाला अनुसरून आहेत, ते-स्वभाव-गुणही पृथक् पृथक् आहेत.

जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, आणि काल ही सहाद्रव्वें अनादिकालापासून स्वयंसिद्ध— अकृत्रिम अविनाशी [जसीची तसी] आहेत. ह्या सहा द्रव्याचे कधी सात किंवा पांच झाले नाहींत ह्या सहाद्रव्यापैकीं एक जीवद्रव्यांत अग्नीउष्णतें प्रमाणें ज्ञानगुण आहे. बाकीच्या पांच द्रव्यांत ज्ञानगुणाचा किंचित् लेशही नाहीं. ह्या करितां मी पुद्गल द्रव्य नाहीं.

दोहा

थोडीसी कथनीविषैं. बहुत बात है सार ।
धर्मदास क्षुल्लक लियो, निश्चय करि निरधार ॥

आत्मा सदाकाल अखंड जागतीजोति आहे. असें पूर्वी बाहिरात्मा होतो तेव्हां ऐकिलें होतें. तोच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सदाकाल अखंड जागतीज्योति स्वयंसिद्ध मी आहे कां कीं, जागतीजोति मी नसतो तर स्वप्नाची रचना कशी पाहिली असती व जाणली असती. आणि जेव्हां घोर झोंप आली होते तेव्हां स्वप्नही नव्हते त्यावेळीं ही मी जागृत होतोच. कां कीं, जागे झाल्यावर मजला समजले कीं, मोठी गाढ झोप मला आली होती ती गेली, मोठ्या आनंदांत निजलो होतो, वगैरे वगैरे समजलें त्यावेळीं जागृत नसतो तर ह्यावेळीं जागा झालो हे कसे समजले असतें. जागा होतो म्हणून पाहिलें व समजलें. पाहाणें व जाणणें हा आत्माचा स्वगुण आहे. तसेंच—सांगतात कीं, निगोदांत जीवाला अक्षराच्या अनंतवें भाग ज्ञान आहे. त्याचा येथें निश्चय झाला. ज्ञान आहे. तें पाहाणें जाणणें ही आहे. जो पाहात आहे. व जाणत आहे. तो जागृतही आहेच. ह्यास्तव मी कोण्याकाली ही झोपी गेलो नाहीं. व कोण्याकाली ही झोपीं जाणार नाहीं. मी सदाकाल अखंड जागतीज्योति आहे.

मी सूक्ष्मजीव आहे. व महानूही आहे. आणि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शून्य ही आहे. मी उत्पन्न होतो, नाश होतो, आणि नित्यही राहातो.

मी नास्तिरूप आहे व आस्तिरूप ही आहे. मी एकरूप आहे व अनेकरूपही आहे. अशा अनेक गुणांनीं युक्त मी आहे. तरीपण अनेकांत स्वरूप जो स्याद्वादनय आहे त्यानें दृढ प्रतीतीची प्राप्ति झाली आहे. ती अशी—

पुद्गल अचेतन—अजीव आहे. तें मूर्तिक आहे. आणि मी मुळापासून मूर्तिक नाहीं. ह्याकरितां मी अमूर्तिक असल्यामुळे इंद्रियानें समजला जात नाहीं. करितां मी सूक्ष्म आहे. आणि माझें केवलज्ञान लोकअलोकांत भरलेले आहे. करितां मी महान्ही आहे. जसें—घागर धरली पण घागरीतील पोकळी आकाश धरला जात नाहीं. किंवा पांच इंद्रियें आणि साहावें मन मला जाणीत नाहीं. म्हणून मी सूक्ष्म आहे.

प्रश्न:—सूक्ष्म कुणाला म्हणतात.

उत्तर:— जो कोणाकडून रोकला जात नाहीं व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जो आपण दुसऱ्यास रोकीत नाहीं. तो सूक्ष्म होय. करितां मी सूक्ष्म आहे. व जो आपण दुसऱ्या कडून रोकला जातो व आपण दुसऱ्यास रोकतो तो स्थूल मोठा आहे. करितां मी स्थूल आहे. जसा मी आहे. तसें हें पुद्गल द्रव्य नाहीं. करितां पुद्गलाचें जें स्पर्शादिक गुण तेणें करून रहित मी शून्य आहे. आणि मी माझ्या ज्ञानगुणांनीं युक्त पाहतो, जाणतो सुख, सत्ता, चैतन्य—जीवत्व सहित आहे. ह्यास्तव मी शून्य नाहीं. परिणमन स्वभावेंकरून अगुरुलघु-गुणाच्या अविभागप्रतिच्छेदे करून मी उपजतो व विनाश ही होतों आणि द्रव्य दृष्टीनें सदा शाश्वत एकरूप जसाचें तसा आहे. करितां मी नित्य आहे स्वद्रव्य, स्वक्षेत्र, स्वकाल, आणि स्वभावाच्या अपेक्षेनें अस्तिरूप आहे. आणि परद्रव्य, परक्षेत्र, परकाल, आणि परभावाच्या अपेक्षेनें नास्तिरूप आहे.

मी जीव आहे. माझा जीवत्वपणा माझा स्वरूपाला सोडून कधीही अन्यद्रव्याचें स्वरूप धारण करीत नाहीं. ह्या करितां मी एक आहे. माझ्या ज्ञान-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गुणामध्यें हे स्वप्न वगैरे आलजंजाल अनेक उत्पन्न होतात व विनाशही पावतात. ह्या करितां मी अनेकरूप ही आहे. असें स्याद्वादनयानें हें सर्व गुणधर्म माझ्या दृढ प्रतीतीत येतात. असा अमूर्तिक ज्ञानयुक्त सदा जागतीज्योति चिद्रूप जो आहे तो मीच आहे. तर मला कोण दुसरा कसा जाणणार. जाणण्याचा गुण ज्याच्या शक्तिपासून व्यक्तीरूप झाला आहे. तो मला निश्चयानें जाणील. आणि जितके नय, न्याय आहेत तितके वादविवाद आहेत. आणि जितके वादविवाद आहेत तेंसर्व मिथ्या आहेत. करितां पूर्णदशामध्यें नयन्याय मुळीच नाहींत काळजी करूं नका. अहंकाराचा त्याग केल्यावाचून स्वस्वरूप ज्ञानघनाचा अखंड—अचल स्वानुभव होत नाहीं.

प्रश्नः—अहंकार कसा सोडावा ?

उत्तरः—अहंकार त्यागण्याकरितां आणि जन्ममरणादिक भ्रमजालापासून सुटण्याकरितां प्रथम सप्तव्यसन पांच पांप, अन्याय, अभक्ष्य सोडून एकांत वनपर्वतादिकांत वसून मनाच्या द्वारें व आत्माच्या द्वारें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ईश्वर प्रणीत भावना करावी. मीच्या प्रथम कोणी आहे कां म्हणाल तर ? प्रथम कोणी नसता तर मी झालो नसतो.

जसें–घटाच्या प्रथम कुंभार आहे. प्रथम कुंभार नसता तर घट झाला नसता ह्या न्यायानें मीच्या पूर्वी निश्चयाने कोणी तरी आहे. आणि प्रथम कोणी तरी आहे तर मीच्या अखेर कोणीतरी पाहिजे. आणि अखेरीस कोणीतरी आहे तर मीच्या मध्यंतरी कोणीतरी आहे.

"मी" च्या आदि अंत मध्यांत कोणी आहे. तो मी नव्हे. आणि मी मुळापासून नाहीं. बाकी जे कोणी आहे. तेंच "सोहं" मी मुळापासून नाहीं परंतु मी नसता, मी होऊन मीच्या द्वारें माझें केवलज्ञान स्वस्वरूप–निराकाराचें मनन करतो

'मी' ला जितके पदार्थ चर्मनेत्रानें दिसतात. ते सर्व आकार आहेत आणि मीच आकार नाहीं. मी निराकार आहे. पंचकरण–पांचइंद्रीस आकार आहे.

प्रश्न– आकार आणखी कोणास कोणास आहे कां

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीं

उत्तर— जें कांहीं वचनानें सांगण्यांत येतें, कानानें ऐकण्यांत येतें, डोळयानें पाहाण्यांत येतें, हातानें धरण्यांत येतें, शरीरानें स्पर्श करण्यांत येतें, आणि जिभेनें चाखण्यांत येतें, तें सर्व आकार आहेत. तन, मन, धन, वचन, हें निराकाराबरोबर तत्स्वरूपी होत नाहींत, होणार नाहींत, आणि झालेही नाहींत. आकाराची व निराकाराची सूर्य प्रकाशाप्रमाणें एकवटता नाहीं. जसें— अग्नींत उष्णता आहे. तसें ज्या वस्तूंत ज्ञानगुण आहे तोंच मी आहे. पंचकरण (इंद्री) मी नाहीं. पंच करणाच्या आदि अंत मध्यांत कोणी आहे. तो मी नव्हे. बाकी जे राहिले. तेंच मी होय. स्थूलदेह पंचभूताच्या पंचवीस विभागास मिळून आहेत. ते आणि ह्यांच्या आदि अंत मध्यांत जें आहेत. ते ही मी नव्हे. बाकी जे आहे तेंच मी होय.

पृथ्वी, जल, अग्नि, वायु, आणि आकाश असा पंचभूत देह आहे. ते आणि ह्याच्या आदि अंत मध्यांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जें आहेत ते ही मी नव्हें. बाकी जे राहिले तेंच मी आहे.

पृथ्वीभूताचें पांच विभाग—केश, त्वचा, नाडी, मांस. अस्थि.

जलभूताचें पांच विभाग—लाळ, मूत्र, रक्त, घाम, वीर्य.

अग्निभूताचें पांच विभाग—क्षुधा, तृषा, आळस निद्रा, रति.

वायुभूताचें पांच विभाग—चालणें, पळणें, नि-रोधन, प्रसारण, संकोचन.

आकाशभूताचें पांच विभाग—काम क्रोध, लो-भ, मोह, भय.

असें पांच भूतात्मक स्थूलदेहाचें पंचवीस भाग आहेत. व त्यांच्या आदि अंत मध्यांत जें कांहीं आ हें. तेंही मी नव्हें.बाकी जें कांहीं तेंच मी आहे. त-सेंच सूक्ष्मदेह पंच भूतात्मकाचे पंचवीस विभाग आ-हेत. तें व त्यांच्या आदि अंत मध्यांत जें कांहीं आ-हें. तेंहीं मी नव्हें बाकी जें कांहीं राहिलें तेंच मी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे.

पृथ्वी सूक्ष्मभूताचें—शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हें पांच विभाग.

जल सूक्ष्मभूताचे—वाचा, हस्त, पाद, उपस्थ, गुद. हें पांच विभाग.

अग्नि सूक्ष्मभूताचें—श्रोत्र, त्वचा, चक्षु जिव्हा, घ्राण, हें पांच विभाग.

वायु सूक्ष्म भूताचें—व्यान, उदान, समान, प्रान अपान, हें पांच विभाग.

आकाश सूक्ष्म भूताचें—अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त, अहंकार हें पांच विभाग.

असें सूक्ष्मदेहाच्या पंच भूतात्मकाचें पंचवीस भाग आहेत. तें व त्यांच्या आदि अंत मध्यांत जें कांहीं आहे. तेंही मी नव्हें. ह्या शिवाय बाकी जें काहीं राहिलें आहे. तेंच मी होय. जसें अग्नीमध्यें उष्णता आहे. तसेंच ज्या वस्तूमध्यें ज्ञानगुण आहे. तोंच मी [सोहं] होय. सूक्ष्मदेह, स्थूलदेह, कारणदेह, महाकारणदेह. हें चतुष्टय देह आहे. तें व त्यां

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

च्या आदि अंत मध्यांत जें कांहीं आहे. तेंही मी नव्हे- ह्या शिवाय जें कांहीं बाकी राहिलें आहे. तेंच मी आहे. तसेंच स्थूलदेहाचें सातगुण–जाग्रतावस्था, विश्वाभिमानी, नेत्रस्थान, ज्ञानेंद्रियें स्थूलभोग वैखरीवाचा, रजोगुण, अकारमात्रा.

स्थूललिंग देहाचे सात गुण–सुप्नावस्था, तैजसाभिमान, कंठस्थान, शरीरांतर्गतप्रविविक्तभोग, मध्यमावाचा, सत्वगुण, उकार मात्रा.

कारण देहाचे सात गुण—सुषुप्तीवस्था, प्रज्ञाभिमान, हृदयस्थान, आनंद भोग, पश्यंतिवाचा, तमोगुण, मकारमात्रा.

महाकारण देहाचे सात गुण–तुर्यावस्था, प्रत्यगात्माभिमानी, मूर्ध्निस्थान, परमानंदभोग, परावाचा, शुद्धसत्वगुण, अर्धमात्रा. ह्या प्रकारें चार देहाचे २८ अठ्ठावीस गुण आहेत. तें व त्यांच्या आदि अंत मध्यांत जें कांहीं आहे. तेंही मी नव्हें. ह्याशिवाय बाकी जें राहिलें आहे. तेंच मी होय. जैनोक्त पांच देह औदारिक, वैक्रियिक, आहारक, तैजस, कार्माण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ही पांच शरीरें आहेत. ती व त्यांच्या आदि अं-त मध्यांत जें कांहीं आहे. तेंही मी नव्हें. ह्याशिवाय बाकी जें राहिलें तेंच मी सोहं होय.

गुणपर्ययवत् द्रव्यं ॥ उत्पादव्ययध्रौव्ययुक्तं सत् पुद्गलद्रव्य, धर्मद्रव्य,अधर्मद्रव्य आकाशद्रव्य आणि कालद्रव्य,ह्या पांच द्रव्याला जाणणारा मी ज्ञानयुक्त आहे.(तेंच साहावें द्रव्य मी आहे) मी नवीन कांही उत्पन्न झालो नाहीं व ह्या पांच द्रव्याला मी कांहीं उ-त्पन्न केलें नाहींत.भावार्थ• माझ्या ज्ञानमय स्वरूपाचा व पुद्गलादिक पांच द्रव्याचा सूर्यप्रकाशवत् तन्मयपणा कधी झाला नाहीं व कधीही होणार नाहीं. स्वच्या अपेक्षेनें परपक्ष आहे व पर अपेक्षेनें स्वपक्ष आहे करितां स्वद्रव्य, स्वक्षेत्र, स्वकाल आ-णि स्वभाव तसेंच परद्रव्य, परक्षेत्र, परकाल आणि परभावही मी नव्हे.अर्थात् स्व आणि पर पक्षाहून मूळापासून कोणी पृथक्च्या पृथक् जसाचे तसाच आ-हे. तोच मी होय. तन, मन, धन, आणि वचनास एक वटता होऊन जाणत नाहीं. तोंच मी आहे आ-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

णि तोंच मी आहे व तो मी नाहीं. ह्या दोन्हींशी तन्मय झाला नाहीं—व होणार नाहीं—तोंच मी सोहं आहे.

जितके कांहीं पाहण्यांत येत आहे. भोगण्यांत येत आहे. ऐकण्यांत येत आहे. आणि अनुभवांत येत आहे त्यामध्यें मूळापासून तन्मय नाहीं, तन्मय झालो नाही व तन्मय होणारही नाहीं. तोंच सोहं. जसें महा सूर्याच्या प्रकाशांत एक मोहरीचा पत्ता लागत नाहीं. तसेंच ज्याच्या प्रकाशांत हा लोकालोक अनंत ब्रह्मांड कोणीकडे पडलें आहें. हें समजत नाहीं असा कोणी आहे तोच सोहं होय. जसें—सूर्य प्रकाशाची व अंधाराची तन्मयता कधी झाली नाहीं व कधीही होणार नाहीं. तसेंच त्या स्वस्वरूपाची ज्ञानघनाची व लोकालोकाची एकवटता कधी झाली नाहीं व कधी होणारही नाहीं असा कोणी अपूर्व ज्ञानघन आहे तोच मी आहे, मी आहे. तूं, मी, हें, तें, ह्या चारासी मूळापासून तन्मय नाहीं. तोंच सोहं, मी, हें तें, तूं, ह्या चाराच्या आश्रयानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

किंवा 'तू' च्या द्वारें तूं आपल्याला समज. तन, मन, धन, वचनादिकाचा आणि तुझा सूर्य व अंधार ह्या प्रमाणें अंतर तूं समज व मान. जसें—जेंथें सूर्य आहे- तेथें अंधार नाहीं. व जेथें अंधार आहे. तेथें सूर्य नाहीं. तसेंच जेथें तूं केवलज्ञानयुक्त प्रकाशमान आहेस. तेथें तन, मन, धन, वचन नाहीं. नाहीं. तूं द्वारें तूं मान. जसें—सूर्य व अंधार हें मूळापासून पृथक् पृथक् आहेत- तसेंच—केवलज्ञानस्वरूपी सूर्यापासून हें ब्रह्मांड किंवा तन, मन, धन, वचनादिक भिन्न आहेत. केवलज्ञानाला हें ब्रह्मांड, लोकालोक, तन, मन, धन, वचनादिक तूं, मी, हें, तें तन्मय नाहीं. केवलज्ञान स्वरूपाचें नाहीं, झाले नाहीं व होणारही नाहीं. जगत, संसार, तन, मन, धन, वचन, तूं, मी, हें तें, जन्म, मरणादिक आहे. परंतु ज्ञानस्वरूप वस्तूशीं तन्मय नाहीं. विरोधी पदार्थ एकेकालीं, एकेठिकाणीं तन्मय होत नाहीं. झाला नाहीं, व होणारही नाहीं, हा नियम आहे.

दर्पणांत अनेक प्रकारच्या वस्तु तन्मय झाल्या—

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सारख्या दिसतात परन्तु त्या वस्तु दर्पणापासून पृथक् आहेत. तत्स्वरूप तन्मय नाहींत. त्वपद—तत्पद आहे तेही मी नाहीं. व तत्पदाच्या आदि अंत मध्यांत जो कोणी आहे. तो ही मी नव्हें बाकी कोणी आहे. तोंच सोहं. लोकालोकांत व्यापक आहे. व तोंच लोकालोकापासून अव्यापक आहे. असा कोणी अपूर्व चिद्रूप ज्ञानघन आहे. तोंच मी मूळापासूनच आहे. हें लोकालोक माझ्या स्वस्वरूप ज्ञानघनापासून असा भिन्न आहे कीं, जसें-सूर्यापासून अंधार भिन्न आहे असें समजणें.

प्रश्न:—तूं नाहीं, हें आश्चर्यरूप बडबडता ?

उत्तर:—

जैसै जैसौ खावै अन्न, तैसै तैसौ होवै मन ।
जैसै जैसौ पीवै पाणी, तैसै तैसौ बोलै वाणी ॥

ह्या न्यायाप्रमाणेंच माझ्या अंतःकरणांत स्वस्वरूप ज्ञानघनाची निश्चय अचल भावना होण्याजोगी होती. ती झाली, आतां, वृथा भ्रम, शंका, आणि तर्क उत्पन्न होत आहे. तो होवो न होवो ! मी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तर, भ्रम शंका तर्क यांच्याशी तन्मय नाहीं, झालो नाहीं व तन्मय होणार ही नाहीं. इति अलम्

सिद्ध भगवान् षट् द्रव्याहून पृथक् सातवें द्रव्य नाहीं कां कीं, सिद्ध भगवान् जीव द्रव्यच आहे. हें जीव ! तूं ही साहा द्रव्याहून पृथक् सातवें द्रव्य नाहीं. कां कीं, तूंही जीव द्रव्यच आहेस. तूं आपल्याला, सिद्ध भगवानाहून जर पृथक् समजशील व मानशील तर चौऱ्यासी लक्ष योनीमध्यें जन्म मरणाचें भयंकर दुःख—संकट पावशील. कर्माचा विधि व निषेध कर्माला कर्मच करीत असतें. अजीव-पुद्गल कर्माचा कर्ता हर्ता जीव नाहीं. व जीवाचा कर्ता हर्ता अजीव नाहीं. हें निश्चय तूं समज.

जीव आहे तो जीव आहे. व अजीव आहे. तो अजीव आहे.

प्रश्नः—जीव एकच आहे कां, अनेक आहेत.

उत्तरः—जीव एकही आहे व अनेकही आहेत.

प्रश्नः—तें कसें ?

उत्तरः—जसें एक जात, एकवर्ण, एक आकाश,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

एक ज्योतीची रत्नाची व रास हे दुरून अंतरावरून एक दिसती. परन्तु ती रत्नें, पृथक् पृथक् अनेक असतात. तसेंच जीव एक व अनेक आहेत. ह्यामध्यें जो जीव आपल्यास जीव मानीत नाहीं, जीव समजत नाहीं. तो जीव संसारी–मिथ्यादृष्टि बहिरात्मा आपल्या आत्म्याला न जाणणारा आहे. आणि जो जीव, गुरूच्या उपदेशानें आपण आपल्याला स्वतः जाणून निश्चयानें मी मूळापासून जीवच आहे असें समजतो व जाणतो. तो जीव अंतरात्मा (आपल्या आत्म्याला जाणणारा) आहे. करितां अंतरात्मपद उल्लंघून परमात्म पदाचा अधिकारी होवून आणि परमात्मपद प्राप्त झाल्यावर तो पुनः संसारांत येत नाहीं. जसाचे तसाच परमात्मपदांत निरंजन स्वरूप देहरहित राहतो. कां कीं, जसें– दुधांतून तूप निघालें म्हणजे तें पुनः दुधांत मिसळत नाहीं.

तूं भले कोटि-कष्ट सहन कर, कोटि तपस्या कर परन्तु तूं तर जसें चेतनज्ञानगुणांनीं युक्त आहेस तसेंच तसाच राहसील. केव्हांही अजीव झाला ना–

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हींस व होणारही नाहींस. मूळापासून तूं जसा आ-
हेस. तसाच आहेस. आणि अजीवही मूळापासून
जसें आहे. तसेंच आहे. तुझें व अजीवाचें एक स्वरूप
समजू नको.

इति ॥

एक विचार---

हें जीव, तूं, पूर्वी नव्हतास ? आतां, तूं नाहींस आणि पुढे राहणार नाहींस ? याचा तूं विचार कर. तूं तुझ्यामध्यें आहेस कां बाहेर आहेस ? किंवा तूं अंतर्बाह्य नाहींस ? याचा खरा विचार कर. तूं आस्तिक आहेस, कां नास्तिक आहेस, कां, सर्वस्वी यांचा पृथक् आहेस याचा तूं पूर्ण विचार कर.

'मी' आहे, हें अक्षर आहे. अक्षर अचेतन-अजीव आहे. अजीव व हें भिन्न नाहीं. करितां मी मूळापासून अजीव नाहीं न होता परन्तु 'मी' होऊन मीच्या द्वारें माझा मी जो निश्चय केला. तों जागृत सांगतो. तूं श्रवण कर,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जगत संसार होता तरी मी आहेच व जगत संसार नव्हता तरीही मी आहे. मी आहेच आहे. मी केव्हांही नव्हतो ? व केव्हांही नाहीं ? व केव्हांही होणार नाहीं. ? मी सदा शाश्वत आहेच आहे. माझ्या पासून मी कधी भिन्न झालो आहे ? माझ्या पासून मी कधी भिन्न होईन ? व माझ्या पासून मी केव्हा भिन्न आहे ? मी तर सदा शाश्वत जो आहे. तोंच आहे. माझ्या पासून जे भिन्न आहेत त्यांच्या मी कधी एकवट झालो होतो ? माझ्यापासून जें भिन्न आहेत. त्यांच्याशी मी कधी एकवट होईन ? माझ्या पासून जें भिन्न आहेत त्याच्याशी मी एकवट आहे. ? मी तर सदा शाश्वत आहे तोंच आहे. मी कधी झालो होतो ? मी कधी होईन ? मी कधी झाला आहे ? मी तर सदा शाश्वत आहे तोंच आहे. पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल हे पांच द्रव्य अचेतन आहेत. त्याप्रमाणें मी केव्हांही अचेतन झालो नाहीं व अचेतन होणार हीं नाहीं. आणि मी चेतन आहे. तसें तें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पांच अचेतन केव्हांही चेतन झालें नाहींत व चेतन होणार ही नाहींत. आतां, ह्या पांच द्रव्यांचें संक्षेपांत वर्णन करतो—पुद्गल द्रव्य मूर्तिक (आकार) आहे, बाकीचें चार द्रव्ये धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, आकाशद्रव्य, आणि कालद्रव्य, अमूर्तिक (निराकार)आहेत. स्पर्श,रस,गंध,वर्ण हे चार पुद्गल द्रव्यांत आहेत बाकीच्या चार द्रव्यांत स्पर्शादि हे चार गुण नाहींत. काळा, पांढरा, पिवळा, हिरवा, लाल. हे रंग पुद्गल द्रव्यांत आहेत. बाकी चार द्रव्यांत नाहींत. शब्द, बंध, सूक्ष्म, स्थूल, संस्थान, भेद, तम, छाया, आतप, उद्योत, हें दहा गुण पुद्गल द्रव्यांत आहेत बाकीच्या चार द्रव्यांत नाहींत.

पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, आणि काल हीं पांच द्रव्यें आहेत. म्हणून माझ्या ज्ञानगुणाचा उपयोग पाहणें, जाणणें रूप होतो. ही पांच द्रव्यें नसती तर मी कुणाला पाहिलें असतें व जाणलें असतें. आणि माझ्या पाहणें जाणणें ह्या गुणाचा मला कसा शोध लागला असता. हीं पांच द्रव्यें आहेत म्हणू-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नच माझी मला खबर लागली कीं, मी ह्या पांच द्रव्यांहून प्रथक् साहावें द्रव्य [जीव] पाहणारा व जाणणारा ज्ञानघन आहें.

ह्या पांच द्रव्यामध्यें प्रथम पुद्गलद्रव्य आहे. तें मला जाणीत नाहीं. व बाकीचे--धर्म, अधर्म, आकाश, आणि काल हीं चार द्रव्येंही मला जाणीत नाहींत. ह्या पांच द्रव्यामध्यें पाहण्याचा व जाणण्याचा ज्ञानगुण मुळींच नाहीं. आणि माझ्या पासून हें सर्वथा भिन्न आहेत.

भवार्थ—ही पांच द्रव्यें जर मजपासून मूळचेंच भिन्न आहेत. तर त्यांचा मी त्याग करूं शकत नाहीं व ग्रहणहीं करूं शकत नाहीं. आणि माझ्या पासून मी कधींच जर भिन्न झालो नाहीं, व भिन्न होणारही नाहीं व भिन्न नाहीं तर माझ्या स्वरूपाची मला प्राप्ति करून कसली ध्यावयाची राहिली आहे. अनंत कोटाकोटी उत्सर्पिणीकाल व अनंत कोटाकोटी अवसर्पिणीकाल व्यतीत झाला आहे. त्याच्या प्रत्येक कालाणूंत कां मी नव्हतो. व त्याच्या पूर्वी कां

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मी नव्हतो तात्पर्य-मी अनादिपूर्वीं सदाकाल शाश्वत होतो. तसाच वर्तमान कालाच्या अणूपर्यंत बराबर शाश्वत राहत आलो आहे.

प्रश्न: बराबर म्हणजे काय.

उत्तर:—प्रत्येक कालाणूंत मी आहे- अनंतानंत उत्सर्पिणी, व अवसर्पिणी व्यतीत होउन गेलें परंतु त्या कालाप्रमाणें मी व्यतीत—नाश झालो नाहीं. आणि जसा अनंतानंत काल व्यतीत होऊन गेला. तसाच अनंतानंतकाल पुढेंही होइल-तरीपण मी जसा होतो, तसा आहे. तसाच राहीन.

माझ्या समोर ह्या पांच द्रव्यांचा खेळ—जन्म, मरण, नांव, अनांव, पाप, पुण्य, निद्रा, स्वप्न, आल, जंजाल, चिंतवन, विचार, लिहिणें, वाचणें, बोलणें, चालणें, सांगणें, ऐकणें, दाखविणें, पाहणें, क्रोध, मान, माया, लोभ, ममकार, अहंकार, आकारादिक झाले, होत आहे, व होईल परन्तु मी जसाचें तसाच आहे.

जेंव्हांपासून मी (सोहं) शब्द उत्पन्न झाला आहे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याच्या स्थानाच्या प्रथमच्या प्रथम त्याच्याही अनंतानंत गुणाच्या प्रथम—मूळापासून जसा आहे. तसाच आहे. माझ्यांत ज्ञानशक्ति, दर्शनशक्ति, सुख, सत्ता चेतनशक्ति, जीवनशक्ति, वगैरे अनंतशक्ति असी मिसळली आहे कीं, जसी—अग्नीमध्यें उष्णता असा जो कोणी आहे. तो मीच आहे. कां कीं, मी आदि मध्य अंत पर्यंत आहे. मी नसतो तर सोंहं शब्द कोठून उत्पन्न झाला असतां व नाश होता. जसें—सूर्याचा प्रकाश नसता तर मृगजल कोठून उत्पन्न झालें असतें आणि नाश झालें असतें. सूर्याचा प्रकाशाचा व मृगजलाचा जसा मेळ आहे. तसाच माझा मी (सोहं) शब्दाचा मेळ-अमेळ आहे. आणि जो कदापि ही माझ्या ध्यानांत आला नाहीं, येत नाहीं, व येणार नाहीं अशाचें ध्यान काय करूं. आणि जो सदा शाश्वत ध्यानांत आहेच, ध्यानांत येतोच व ध्यानांत राहणारच अशाचें ध्यान काय करूं तसेंच जो कदापि केव्हांही दिसत नाहीं, दिसला नाहीं व अदिसणारही नाहीं. अशाचें ध्यान कसें करूं. व जो

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सदा शाश्वत दिसतो, दिसत आहे, दिसेल त्याचें ध्यान काय करूं. जसें—सूर्य व अंधार पृथक् पृथक् आहे. तसेंच माझ्या पासून जें पृथक् आहेत त्यांस कसें ग्रहण करूं व कसें त्याग करूं. जसें—सूर्य व प्रकाश पृथक् नाहीं तसेंच माझ्या पासून जें पृथक् नाहीं त्याचें ग्रहण काय करूं व त्याग कसा करूं.

॥ इति ॥

प्रश्न— तुम्हीं कोण आहा ?

उत्तर— मी, मीच आहे.

प्रश्न— तुमचें नांव काय ?

उत्तर— माझें नांव मी आहे.

प्रश्नः— खरें सांगा तुम्ही कोण आहा.

उत्तर- बोलणें, ऐकणें, दाखविणें, समजणें, समजाविणें वगैरे माझा धर्म[गुण]मूळापासून नाहीं. परंतु तू, प्रश्न केलास ह्यास्तव न बोलत असून ही मी बोलतो. तूं श्रवण कर-मीं पुरुष, स्त्री व नपुंसक नाहीं. मला नांव अनांव नाहीं, मी शून्य अशून्य नाहीं, मी अस्ति नास्ति नाहीं, मीं अविनाशी विनाशी नाहीं, मी ज्ञान अ-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञान नाहीं,मी एक अनेक नाहीं,मी जीव अजीव नाहीं, मी एक दोन अंक नाहीं, मी चेतन अचेतन नाहीं, मी आकार निराकार नाहीं, मी मूर्ति अमूर्ति नाहीं, मी लहान थोर नाहीं, मी जवळ दूर नाहीं, मी बंध मुक्त नाहीं,मी लोक अलोक नाहीं मी नीच उंच नाहीं, मी वर्ण अवर्ण नाहीं,मी रूपी अरूपी नाहीं मी भोगी अभोगी नाहीं, मी व्रती अव्रती नाहीं, मी लोभी निर्लोभी नाहीं, मी कर्म अकर्म नाहीं, मी जोगी अजोगी नाहीं, मी कांहीं घेतले ही नाहीं. व कांहीं त्यागिलें ही नाहीं.मी साधु भोंदु नाहीं,मी कुणाचा आई,बाप, मुलगा,मुलगी,बहीण,भाऊ नाहीं.मी नवरा बायको नाहीं. मी प्रिय दोषी नाहीं. मी सिद्ध संसारी नाहीं. मी शब्द अशब्द नाहीं. मी वचन मौन्य नाहीं. मी उत्तम मध्यम जघन्य नाहीं. मी आदि अंत मध्य नाहीं. मी आत्मा अनात्मा नाहीं. मी निश्चय व्यवहार नाहीं. मी मूर्ख पंडित नाहीं. कोणाच्या वचनाने माझें स्वरूप सांगता आलें नाहीं. व सांगता येणार ही नाहीं. असें जें आहे. तेंच मी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे.मी भ्रमी सुधी नाहीं.मी विचारी अविचारी नाहीं. मी लघु दीर्घ नाहीं. मीं जागृत निद्रित नाहीं. मी मागें पुढें नाहीं. मीं कुणाचा नाहीं. कोणी आमचें नाहीं. मी १, २, ३, ४, ५७५८ अनेक नाहीं. मी अंधार उजेड नाहीं. मी आंत बाहेर मध्यंतरी नाहीं. नाहीं. नाहीं.

मी तन,मन,धन,वचन नाहीं मी प्रगट गुप्त नाहीं. माझें स्वरूप कोणी पाहात नाहीं व मी कोणाचें स्वरूप पाहात नाहीं. मी कोणास जाणत नाहीं व कोणी मला जाणत नाहीं. मी काळा, पांढरा, पिवळा, हिरवा, लाल नाहीं. मी आहे,तो मीच आहे.मी आहे, तसा दूसरा कोणीही नाहीं,व दुसरा जसा आहे,तसा मीही नाहीं, जितके म्हणून नांवें आहेत, तो मी नव्हें, आणि जितके अनांव आहेत, तेंही मी नव्हें, मी,तूं,हें, तें,हें चार आहेत,तें निराळें आहेत,आणि मी कांहीं निराळा आहे, तोंच मी आहे, मीं, भाव अभाव, स्वभाव, विभाव, परभाव नाहीं, मी परद्रव्य, परक्षेत्र, परकाल, परभाव नाहीं. आणि मी स्व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

द्रव्य स्वक्षेत्र, स्वकाल व स्वभावही नाहीं ह्या स्वचतुष्टयापासून व परचतुष्टयापासून सर्वथा भिन्न आहे. तोंच मी आहे. तोंच मी आहे.

प्रश्न:–तुम्ही पर नाहीं. हें संभव आहे, परंतु स्व नाहीं, हें कसें संभवेल,

उत्तर:--पराच्या अपेक्षेनें स्व आहे, व स्वच्या अपेक्षेनें पर आहे, अपेक्षाहित मीच्या द्वारें मी मूळापासून जसा आहे, तसाचें तसाच आहे,

मी पूज्य अपूज्य नाहीं,माझी निंदा व स्तुति केव्हां कोणी केली नाहीं केव्हां कोणी करणार नाहीं व केव्हां कोणी करीत ही नाहीं,कांकीं,निंदा,स्तुति आणि पूजा देहाची आहे.व नावाची आहे तो देह नांव मी मूळापासून नाहीं. देहाला मी जाणतो. पण देह माझ्या ज्ञानस्वरूपाला जाणत नाहीं. व पाहातही नाहीं. सर्वांची नांवें सांगणारा मी आहे. तर मीच्या द्वारे माझें नांव कसचें. अर्थात् निंदा, स्तुति आणि पूजा ह्यांच्या सर्व प्रकारें पृथक् आहे. तोंच मी होय. अलोकाकाशांमध्यें हा ३४३ राजुप्रमाण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तीन लोक आहे. ह्या तीन लोकामध्यें जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, आणि काल हें षट् द्रव्य व ह्या द्रव्यांची वचनातीत रचना आहे. ह्यांच्या भिन्न आहे. तोंच मी.

मी लोक अलोक नाहीं.व लोकालोकांत जितकी वस्तुरचना वगैरे आहे. तोही मी नव्हें.ह्या लोक अलोकांचा व माझ्या ज्ञानस्वरूपाचा मूळापासून दुग्धघृतवत्, फूलसुगंधवत् व तीळतेलवत् मेल आहे. परंतु सूर्य व सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें मेल नाहीं. लोकालोकाचा व माझ्या ज्ञानस्वरूपाचा सूर्यअंधारा-इतका अंतर आहे. व प्रदेशभेद आहे तो विरोध-भेद आहे.

प्रश्न:—तुम्ही लोक अलोकाच्या सर्वथा भिन्न कोण आहां?

उत्तर:—काय सांगू, कसें सांगू. जिथें तन नाहीं जिथें मन नाहीं. जिथें धन नाहीं.जिथें वचन नाहीं जिथें समजणारा समजविणारा नाहीं. जिथें सांगणारा ऐकणारा नाहीं. जिथें जीव, अजीव आस्रव,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बंध, संवर, निर्जरा, मोक्ष नाहीं. जिथें जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल नहीं. जिथें शून्याशून्य नाहीं. काय सांगू. कसें सांगू. माझें मी जाणतो, सांगण्यांत येत नाहीं. कसें सांगण्यांत येत नाहीं? जसें कानानें बहिरा, डोळ्यानें अंधळा, आणि जिव्हेनें गुंगा (मुका) असा एक मनुष्य त्याच्या तोंडांत साखरेचा खडा ठेवला. नंतर त्या मनुष्याला विचारिलें कीं, सांग गड्या, साखरेचा खडा कसा गोड आहे. त्या मिष्टतेच्या आनंदाची गोडी सांग. आतां तो मनुष्य त्या साखरेची गोडी समजतो. परंतु तो सांगू सकत नाहीं. कारण, सांगण्यांचा गुण पुद्गल देहाचा आहे. तसेंच—मी लोकापासून सर्वथा भिन्न आहे. त्या माझ्या भिन्नपणास मी जाणतो. परंतु सांगू सकत नाहीं. घायलाचें दुःख घायल जाणें-काय जाणें वेद विचारा.

॥ पद ॥

अब धू नाम हमारो राखै । सो परम महारस चाखै ॥ अब. ॥ ऐ आकडी ॥ ना हम पुरुषा ना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हम नारी । वरनन बात हमारी ॥ जाति न पाति न साधु न साधक । ना लघु ना हम भारी ॥ १ ॥ ना हम ताते ना हम सीते । ना दीरघ ना छोटा । ना हम भाई ना हम भगनी ना हम बाप न बेटा ॥ अव० ॥ २ ॥ ना हम मनशा ना हम शब्दा । ना हम तनके धरनी ॥ ना हम भेष भेषधर नाहीं । ना हम करता करता करनी ॥ ३ ॥ ना हम दरसन ना हम परसन रस न गंध कछु नाहीं ॥ आनंदघन चेतनमई सूरति । शेवक जिन बलि जाई ॥ ४ ॥

मला जितकी वस्तु दिसत आहे आणि दिसत नाहीं. ह्या दोन्हीं पासून सर्वथा मी भिन्न आहे. लोकालोकापासून सर्वथा जो भिन्न आहे तोंच सोहं. आणि सोहं नाहीं व सोहं आहे. ह्या दोन्हींपासून सर्वथा जो भिन्न आहे तोंच सोहं. ह्यास बिंदु मानूं नये. पूर्ण चिन्ह मानणें.

विचार चिंतवनाचा ही विचार चिंतवन आहे. व न विचार चिंतवनाचाही न विचार चिंतवन आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जसे--धोतऱ्यच्याही धोतरा आहे व आंब्याचा आंबा आहे. अर्थात्-विचार करण्यांत येतो. चिंतवन करण्यांत येतो. व विचार-चिंतवन करण्यांत येतही नाहीं. ह्या दोन्हींच्या सर्वथा भिन्न आहे. त्यास अनंत केवलज्ञान ही जाणत नाहीं दुसराही-ज्ञानी अज्ञानी जाणत नाहीं. असा कोणी आहे. तोंच मी आहे. दुसरा नाहीं.

जिथें तन, मन धन, वचन, ज्ञान, अज्ञान, जीव, अजीव, बंध, मोक्ष, लोक, अलोक, शून्य, अशून्य, विधि, निषेध, तूं, मी, हें, तें वगैरे कांहीं नाहीं, तिथें केवल मचि मी आहे.

मी मूळापासूनच आहे. नवीन नाहीं झालो

विचार- चिंतवन करणें, लिहिणें, लिहावयास लावणें, पढणें, शिकविणें, समजणें, समजाविणें, घेणें, देणें, बोलणें, दाखविणें, पाहाणें, न पाहाणें, जाणणें, न जाणणें, चालणें, हलणें, नाम, अनाम, आकार, निराकार, मूर्ति, अमूर्ति, लोक, अलोक, आणि लोक अलोकांत जितकी वस्तु रचना आहे. ती सर्व प्र--

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कारें माझ्यापासून भिन्न आहे. तोंच मी आहे. येथें दृढस्वानुभव मनन झालें–कीं मीच आहे. परंतु मीच हें शब्द वचन आहे. ह्या शब्दरूप वचनापासून सर्वथा जो भिन्न आहे. तोंच सोहं

॥ इति अलम् ॥

प्रश्नः– हे सद्गुरु मी कोण आहे ?

उत्तर– तूं जीव आहेस.

प्रश्न– मी जीव आहे तर माझ्या पासून वेगळें कोण आहे. ?

उत्तर– ॥ दोहा ॥

तनता मनता वचनता, जडता जडसैं मेल ।
लघुता गुरुता गमनता, येह अजीवका खेल ॥

स्पर्श, रस, गंध, सूक्ष्म, स्थूल, संस्थान, भेद, तम, छाया, आतप, उद्योग, हें सर्व पुद्गलाची पर्यायभेद आहेत. तें सर्व अजीव आहेत. जसा–तूं आहेस तसा ह्या अजीवाचा खेळ नाहीं. आणि जसा ह्या अजीवाचा खेळ आहे. तसा तूं नाहींस. ह्या अजीवाचा आणि तुझा आग्नी व उष्णता प्रमाणें एकमेल. नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मनन करणें. श्रवणकर---निश्चयानें अजीवाचा व तुझा सूर्य व अंधार इतका अंतर आहे. तूं आहे, तें तूं आहेस. आणि अजीव आहे. तें अजीव आहे. तूं, अजीवास जाणतोस परंतु अजीव तुला जाणत नाहीं.

जीव, अजीव आश्रव, बंध संवर निर्जरा आणि मोक्ष ही ७ तत्वें आहेत. त्यांत तूं प्रथम जीवतत्व आहेस. बाकीचें ६ अजीव तत्वें आहेत. जितके जीव आहेत. तितके सर्व तुझ्या सारेख आहेत.

जो जीव आपलें स्वरूप ज्ञायकस्वभाव जाणतो मानतो तो शुद्ध जीव आहे. आणि जो जीव, तन, मन, धन, वचनादिक अजीवास व आपल्यास एक स्वरूप--स्वभावलक्षणगुण असी व उष्णतें-प्रमाणें मानतो--जाणतो. तो जीव अशुद्ध मिथ्यादृष्टि आहे. तोंच संसारी आहे व तोंच जन्म मरणादिक अनंत दुःख भोगतो व भोगणार. आणि एक वेळ ह्या भ्रमजंजालातून निघून माझें मी ओळखून श्रद्धान करीन तर पुनः संसारांत रुळणार नाहीं. जसें--दह्यांतून लोणी काढून पृथक केलें म्हणजे पुनः

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दह्यांत मिसळलें जात नाहीं. तसें–

पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, आणि काल हीं पांच द्रव्यें अजीव--अचेतन आहेत. ह्या पांच द्रव्यांत ज्ञानगुणाचा लेश नाहीं. जसें–हें पांच द्रव्य अचेतन आहेत. तसा मी अचेतन नाहीं. आणि जसा मी ज्ञानगुणानें युक्त आहे. तसें तीं पुद्गलादिक पांच द्रव्यें ज्ञानगुणानें युक्त नाहींत. जसा–सूर्य आहे तसा अंधार नाहीं. व जसा–अंधार आहे, तसा सूर्य नाहीं ह्याप्रमाणेच माझा व ह्या अजीवादिक पांच द्रव्यांचा अंतर आहे.

मी, मी नाहीं, हूं हूं तेंही मी नव्हे. बाकी जें कांहीं राहिलें आहे. तोंच मी [सोहं]

विचार काय करूं. जो आपणाला बंधयुक्त मानतो जाणतो तो मिथ्यादृष्टि–बहिरात्मा आहे. व जो आपणाला बंधयुक्त मानीत नाहीं. जाणीत नाहीं, तोही मिथ्यादृष्टि बहिरात्मा आहे. कारण वस्तु स्वभावांत बंधयुक्त संभवत नाहीं. व स्वभावांत तर्काचा अभाव आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लोक अलोकापासून सर्वथा मूळापासून पृथक् आहे तो पृथक् आहेच त्यास नांव, रूप, आकार निराकार, बंध, मोक्षादि काय ? होऽहोऽहोऽ ज्याला केवलज्ञानीही जाणत नाहीं. व दुसरा-ज्ञानी अ-ज्ञानी कोणीही जाणत नाहीं. त्याला आकार निराकार कसला, रूप अरूप कसलें, नांव अनांव कसलें, बंध मुक्तता कसली. वोहो बाहो २२२. जसी मति, तसी गति, ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

आतां, ज्याची मति असी आहे कीं—मी अंत-र्बाह्य नाहीं, मी, पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर दि-शापासून सर्वथा मूळापासून पृथक् आहे. मी देव नाहीं, मी मनुष्य नाहीं, मी तिर्यंच नाहीं, मी नार-की नाहीं, मी स्त्री पुरुष नपुंसक नाहीं, मी एकेंद्री दोइंद्री, तीन इंद्री, चार इंद्री, पांच इंद्री नाहीं, मी लहान थोर नाहीं, मी हलका जड नाहीं, मी लोक अलोक नाहीं, मी बंध मुक्त नाहीं मी मुर्ति अमू-र्ति नाहीं, मी आकार निराकार नाहीं मी जीव अ-जीव नाहीं, मी चेतन अचेतन नाहीं, मी ज्ञानी अ-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञानी नाहीं, मी शून्याशून्य नाहीं, मी नाम अनाम नाहीं, मी अस्ति नास्ति नाहीं, मी कर्ता अकर्ता नाहीं, मी तन, मन, धन, वचन नाहीं, व तन मन, धन, वचन ह्यांचे जितके विलास आहेत. तेही मी नाहीं, मी मूर्ख नाहीं, मी पंडित नाहीं, मी दुःखी-सुखी नाहीं, वगैरे वगैरे व्यवस्था मन वचन कायाच्या द्वारें माझा मी पार करीन.

ऐकतो—'मी' हें अक्षर आकार वचन—शब्दरूप झालें. आकाराच्या अंतर्बाह्य व अकाराशीं तन्मय तें तो मी मूळापासून नाहीं. नाहीं. नाहीं. कदापि नाहीं, पूर्वी वर जें लिहिले आहे. त्यांच्या अंतर्बाह्य नाहीं, ह्याशिवाय जें राहिलें तेंच मी होय.

जसें—अमावश्याचा मध्य रात्रीच्या अंधकार व ज्येष्ठ महिन्यातील दोन प्रहर दिवसाचा सूर्य अलग पृथक् असतो. तसाच मी पूर्वोक्त लिहिलेल्या पासून पृथक् आहे. असा कोणी पृथक् आहे. तोंच मी [सोहं] आहे.

'मी' हें अक्षर आहे. त्या अक्षरांत जो मी आहे तो

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मी नव्हें. तो मी नव्हे. ह्याच्याही प्रथम जो कोणी आहे. तो मी नव्हे. कदाचित् कोणी असेल तर सांगणार कोण व ऐकणार कोण.

गुरु आज्ञाप्रमाणे पूर्वी लिहिलेलें जे आहे त्यास वाचा. अभ्यास करा. विचार करा. पूर्वी लिहिल्याप्रमाणें ज्याची मति आहे. त्याची काय गति होईल. ह्याचा सत्य विचार करा. परंतु गुरूशिवाय केवल वाचण्या पढण्यानेंच साक्षात् अनुभव होणार नाहीं. कां कीं, कोणी विचारले—तूं आंत नाहीं. बाहेर नाहीं. तर कसा तूं आंत नाहींस बाहेर नाहींस हें सांग. हें जर सांगता आलें नाहीं तर अज्ञानाचा मिथ्यात्वाचा बंध पडेल म्हणून गुरु शिवाय अनुभव येत नाहीं. गुरुवाचून जसें— अंधकारांत आरसा.

जसें—सूर्यप्रकाशाप्रमाणें किंवा अग्निउष्णतेप्रमाणें सदा सर्वदा त्याचा त्याग काय करूं जो माझ्या बरोबर मिळून आहे. तसेंच माझ्या बरोबर जो सूर्य अंधाराप्रमाणें सदा—सर्वदा भिन्न आहे त्याचें ग्रहण कसे करूं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मी सूर्य अंधाराप्रमाणें ज्याच्याशी मूळापासून पृथक् आहे तर तो ही माझ्याशीं मूळापासून प्रथक् असणार. आणि मी ज्याच्याशी मूळापासून मिळून आहे. तर तोही माझ्याशी मूळापासून मिळून राहाणार असा माझा निश्चय झाला आहे.

आतां जगत संसार, जन्म मरण, सुख दुःख पाप पुण्य, बंध मोक्ष, नाम अनाम असो किंवा नसो त्याचा मला काय संबंध. हें असल्यानें मी राहात नाहीं व नसल्यानें माझा नाश होत नाहीं. सहा द्रव्यांत केवळ पाहाणें जाणणेंचा गुण माझ्यांत अग्नीउष्णतें प्रमाणें आहे. साहा द्रव्यांत प्रथम मी आहे. माझ्या प्रथम कोणी झाला नाहीं व होणार ही नाहीं. सात तत्वांत प्रथम मी (जीवतत्व) आहे. माझ्यापूर्वी कोणी झालें नाहीं व होणार ही नाहीं. मी प्रथम आहे. ह्यास्तव हें सर्व मागाहून आहेत. मी प्रथम नसतो तर हें सर्व पुद्गलादिक माझ्या मागाहून कसें झालें असतें हें सर्व अजीव जड कसें झालें ह्याची खबर मला नाहीं. जसें—हें सर्व अजीव जड आहेत. तसा मी अजीव-जड नाहीं. व जसें मी चेतन—ज्ञान-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दर्शनगुणानीं युक्त आहे. तसें हे पुद्गलादिक ज्ञानदर्शन गुणांनीं युक्त नाहींत. ह्या पुद्गलादिक पांच द्रव्याला मी ग्रहण करूं शकत नाहीं, व ह्याचा त्यागही करू शकत नाहीं. आणि हें पुद्गलादिक पांच द्रव्य मला मिळू शकत नाहींत. व त्यागही करूं शकत नाहींत. जसें– सूर्य प्रकाशांत व अंधारांत अंतर आहे. तसें माझ्या ज्ञानदर्शनगुणांत व ह्या पुद्गलादिक पांच द्रव्यांत अंतर आहे. मी अभेद माझ्याशीं मिळून आहे व दुसऱ्याशीं न मिळणारा आहे. व परक्यांत आणि माझ्यांत भेद आहे. (पुद्गलांत) जसें– सूर्यप्रकाशाला ढग आड येतो तसें–मला ज्ञानावरणी कर्म आड येतें, परंतु कर्म आहे तें जडकर्म आहे आणि मी आहे तो केवलज्ञानयुक्त आहे. तें जडकर्म केवलज्ञानाचा नाश करूं शकत नाहीं. जसें-सूर्य आणि ढग अग्निउष्णतेप्रमाणें एकवट होत नाहींत. तसेंच माझें केवलज्ञान आणि ज्ञानावरणादि आठ कर्म हे माझ्याशी एकवट होत नाहींत,

तसेंच समुद्राला पाळ (बांध) बांधून कोणी बंद

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

केला नाहीं म्हणून समुद्र निर्व आहे. परन्तु समुद्राच्या किनाऱ्याला शहर, पुर, पट्टण वगैरे गांव असतात. ह्या अपेक्षेनें समुद्र मर्यादित आहे. तसेंच समुद्राप्रमाणें अपार, गंभीर, अथाह, अचल, अविनाशी मी आहे. मी हें अक्षर अचेतन—जड आहे. तसा मी जड नाहीं.

हें आत्मन्, आणखी एक समजून घे. तूं, तुजला 'मी' शब्दद्वारें असें समज—

लोक अलोक व त्या लोक अलोकांत जितकी वस्तु आहे. त्या पासून, शब्दवचनापासून विचार चिंतवनापासून, तन, मन धनापासून, अस्ति नास्ति पासून, शून्याशून्यापासून सर्व प्रकारें मूलापासूनच मी पृथक् आहे. पृथक् आहे. ज्याला ही भावना पक्की पटली तो धन्य आहे, धन्य आहे. तोंच परमात्मा परब्रह्मांतील लय होणारा तूं आहेस. तो तूंच आहेस. तुझ्या शिवाय दुसरा नाहीं. जों तुझ्याशिवाय दुसरा आहे. तो तूं नव्हेस. व तूं आहेस. तसा दुसरा नाहीं. व दुसरा आहे तसा तूं नाहींस. जिथें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जिथें तूं आहेस तो तूंच आहेस.

॥ दोहा ॥

इस जगतमें, समज करो विश्राम ।
धर्मदास यो नाम है, रूपि द्रव्यको जाम ॥ १ ॥
धर्मदास यो नाम है, सो शरीरको सार ।
अनुभव ले भवदधि तिऱ्यो, उतर गयो भवपार ॥ २ ॥
अब विचार तूं माति करै, पूरण तेरो काम ।
होणो थो सो हो गयो, क्षुल्लक तेरो नाम ॥ ३ ॥
तूं क्षुल्लक ऐलक नहीं, नांव नहीं तूं सार ।
सारासार विचारके, तूं उतऱ्यो भवपार ॥ ४ ॥
अब तेरे में तूं भलो, भलो भलो सुण जाण ।
भली भई या जगतमें, तूं समझ्यो निरधार ॥ ५ ॥
धर्मदास क्षुल्लक नहीं, नाहिं समझ्यो सबसार ।
समझ्यो सो क्षुल्लक नहीं, निश्चय करि निरधार ॥

अहं, सोहं, आम्हीं, मी, हें चार शब्द आहेत. शब्दांत दोन भेद आहेत—एक अक्षर शब्द, दुसरा अनक्षर—उच्चाररूप शब्द-शब्दांत सांगण्याचा गुण आहे. जसा अग्नींत उष्णतेचा गुण आहे. तसा दुसऱ्या-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ची व आपली हकीगत सांगतो. दुसऱ्यापासून अ-तत् स्वरूप होऊन सांगतो व आपल्या मध्यें तत् स्वरूप होउन सांगतो.

शब्दापासून भिन्न जीव, धर्म, अधर्म, आकाश, आणि काल द्रव्य आहे. आणि शब्द आहे तो पुद्गलाची पर्याय आहे. पुद्गलापासून शब्द भिन्न नाहीं. 'मी' आहे. तो शब्द आहे व शब्द अजीव अचेतन ज्ञानहीन आहे. शब्द आपली व दुसऱ्याची हकीगत सांगतो. परन्तु शब्दाला स्वपरज्ञान नाहीं. आणि मी शब्दाच्या द्वारें जाणतो, माझें तन, मन, धन, वचन, लोक, अलोक, नाम, अनाम, जीव, अजीव बंध, मोक्ष, वगैरे मूळापासून पृथक् आहे. असा कोणी आहे तो मीच्या द्वारें मी आहे व मी नाहीं. परन्तु मी नसून मी आहे. जसें—सूर्यामध्यें प्रकाश-गुण आहे तसें माझ्यांत पाहण्या जाणण्याचा गुण आहे. आपल्यास व दुसऱ्यास जाणतो आपल्यास व दुसऱ्यास पाहतो. परन्तु त्या (पर) स्वरूपाचा होत नाहीं. जसें—सूर्य व अंधार भिन्न आहे. तसें—

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मी व पर पृथक् आहे आणि मलाही मी जाणतो. जसें–सूर्य व प्रकाश भिन्न नाहीं. तसें–'मी' माझ्या पासून भिन्न नाहीं परन्तु दुसऱ्यापासून अतत्–भिन्न स्वरूपाचा आहे. मी केवलज्ञानयुक्त आहे. माझाशीं मी तत्–मिळालेला स्वरूपांत आहे.

॥ इति ॥

दोहा

पूरण परमातम, सदा अखंडित सार ।
धर्मदास क्षुल्लक, वंदन वारंवार ॥ १ ॥

॥ इति श्री स्वात्मानुभवमनन ग्रंथ संपूर्णम् ॥

समाप्त

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi